लोकप्रभा
११ सप्टेंबर २०२०
वीस रुपये
पृष्ठसंख्या ५२

# सरकारी हस्तक्षेपाची परीक्षा

VISIT…

"महत्त्वाच्या घटनांचा अन्वयार्थ उलगडून दाखवणारी लोकसत्ताची संपादकीय पानं भल्या सकाळी वाचणं यासारखा बौद्धिक आनंद नाही!"

- माधवी पेठे
(माजी प्राचार्य,
म.ल. डहाणूकर महाविद्यालय)

## दृष्टिकोनच देतो व्यक्तिमत्त्वाला आकार

माहितीच्या प्रदूषणातून ज्ञानाकडे जाण्याचा सोपा मार्ग – 'लोकसत्ता' संपादकीय पाने. ती वाचणे म्हणजे विविध तज्ज्ञ व अभ्यासक यांच्या लेखनातून स्वतःला मोठे करणे.

जाणत्या जनांसाठी

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

लोकप्रभा ■ लेखानुक्रम ■ ११ सप्टेंबर २०२० ■ वर्ष ४७ ■ अंक २५

कव्हरस्टोरी

०६ सरकारी हस्तक्षेपाची परीक्षा
चिन्मय पाटणकर



१० दानयज्ञाचा श्रीगणेशा
ठिकठिकाणच्या प्रतिनिधींकडून

२१ मानवतेचे स्वयंसेवक
अनुराधा मस्करेन्हस

२६ मजल मोठी, पल्लाही बाकी!
नितीन मुजुमदार

२८ कर्तृत्वाचा मनगटी मापदंड
आशुतोष उकिडवे

३१ मालिका वापसी
राधिका कुंटे

३२ आपण आणि ते
वैशाली चिटणीस

३४ कॅमेऱ्याची स्वामिनी
विजया जांगळे

३७ आंधळा डोळा, काजळाने साजरा
साधना गोरे

३८ अंटार्क्टिका आणि मिथेन
डॉ. किशोर कुलकर्णी

४० जनसंपर्काचा सुसंवाद
डॉ. गिरीश वालावलकर

४२ पाणी आणि आपण
प्राची साटम

४४ शब्दकोडे
सरिता वेंगुर्लेकर

४५ भविष्य
सोनल चितळे

४६ इम्फाळमधल्या डोंगरावर...
तोरा अगरवाल

५० दात्री दुहीता
वैभव भाल्डे

## वाचक पत्रे

### काँग्रेसचे जहाज बुडालेले नाही

**'अंधारपोकळी'** हा मथितार्थ वाचला. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन. एफ. केनेडी यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे 'यशाचे पितृत्व सांगायला अनेक जण पुढे येतात, मात्र अपयश अनाथ असते.' या वाक्याची प्रचीती सध्या काँग्रेसमध्ये जे काही चालले आहे त्यावरून येते. सोनिया गांधी यांनी बोलावलेल्या पक्षाच्या राज्यसभा सदस्यांच्या बैठकीत तरुण नेत्यांनी पक्षाच्या आजच्या हलाखीचे आत्मपरीक्षण करायचेच तर स्वतःपासून सुरुवात करायला हवी, असे खडे बोल जुन्या नेत्यांना सुनावले. त्यांनी पराभवाचे खापर यूपीएच्या दुसऱ्या राजवटीवर फोडले. तब्बल १५ वर्षांनंतर मध्य प्रदेशात काँग्रेस सत्तेवर आली होती. ती सत्ता अंतर्गत कलहाने गमावली. तशीच परिस्थिती राजस्थानमध्ये उद्भवल्यानंतरही काँग्रेसमधील सुंदोपसुंदी संपायची चिन्हे नाहीत. पिढ्यान्पिढ्या सत्ता उपभोगूनही काँग्रेसच्या वयोवृद्ध नेत्यांना सत्तापदे सोडवेनात, तर दुसरीकडे तरुण काँग्रेस नेत्यांना धीर धरवेना. तरुण नेते बंडाचा झेंडा हाती घेत आहेत. 'पक्ष एकजुटी'च्या नावाखाली गांधी घराण्यातील सदस्यांचा टेकू घेण्याची गरज या पक्षाला नेहमी भासते. आजच्या बदलत्या राजकीय परिप्रेक्ष्यात हा समज म्हणजे मूर्खांच्या नंदनवनात विहार करण्यासारखे आहे. अर्धवेळ राजकारण करणारे नेते राहुल गांधी यांची पक्षातील स्थिती असून अडचण नसून खोळंबा अशी आहे. काँग्रेसमधील ढुढ्ढाचार्यांची सक्तीने 'मार्गदर्शन मंडळा'त वर्णी लावून जनाधार असलेल्या तरुण नेत्यांना पुढे आणण्याची शस्त्रक्रिया पक्षाला करावी लागणार आहे. विरोधी पक्षाची उणीव प्रकर्षाने भासत असताना हे फार गरजेचे आहे. आज देशाची एकपक्षीय लोकशाहीकडे वेगाने वाटचाल होत आहे. परिस्थिती वेळीच नियंत्रणात आली नाही तर मोदी सरकार नक्कीच 'काँग्रेसमुक्त भारत'च्या दिशेने वाटचाल करत राहील.

**- बाळकृष्ण शिंदे,** बिबवेवाडी, पुणे

### गिरगावातील स्मृतींना उजाळा

**'भाईंची करामत'** हा माधव दामले लिखित लेख वाचला. अप्रतिम लिहिला आहे. मीही गिरगावात राहिलो असल्याने लेख वाचताना सर्व दृश्ये डोळ्यासमोर येत होती. गिरगावाला मूर्तिकलेची मोठी परंपरा आहे. बदलत्या काळातही ती टिकून आहे.

**- मकरंद वि. ठोसर,** दापोली.




### शाळेची ओढ

**'खरीखुरी शाळा** हवी' हा लेखिका भारती सावंत यांचा शिक्षणविषयक लेख वाचला. एरवी १५ जूनपासून सुरू होणाऱ्या शाळा अजूनही सुरू झालेल्या नाहीत. मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने ते योग्यच आहे. यावर शासनानेही ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय सुचवला आहे. शहरी भागात तसे शिक्षण सुरूही झाले आहे. मात्र खरी समस्या ग्रामीण भागातील मुलांची आहे. तिथे नेटवर्क नसणे, स्मार्टफोन नसणे, यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. खेड्यापाड्यांत शिक्षकांनी मुलांच्या घराजवळच जाऊन शिक्षण देण्याचाही विचार सुरू होता, मात्र शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांना संसर्ग होण्याचीही शक्यता असल्यामुळे हा पर्यायही नकोच! अभ्यासक्रमातून २५ टक्के भाग कमी करण्यात आला आहे. मोठी मुले स्वयंअध्ययन करतीलही, मात्र लहान मुलांसमोर मोठा प्रश्न आहे. ज्यांच्या पालकांना शिक्षणाचा गंधही नाही, अशा विद्यार्थ्यांची अवस्था बिकट आहे. त्यामुळे मुलांची शाळा लवकरात लवकर सुरू होणे आवश्यक आहे. मी शिक्षक आहे. रोज २-४ मुले शाळा कधी सुरू होणार, हे विचारण्यासाठी कॉल करतात. त्यातून त्यांची ओढ जाणवते. मीसुद्धा अधूनमधून फोनद्वारे मुलांशी संवाद साधतो. 'किशोर'सारख्या मासिकांच्या पीडीएफ पाठवतो. छंद, आवड जोपासण्याचे आवाहन करतो. शिक्षक, विद्यार्थी, पालकांना पूर्वीसारखी शाळा कधी सुरू होणार, याची ओढ लागली आहे.

**- दीपक अधिकारी,** पालघर.

### ऑनलाइन शिक्षणात अडथळे

**टाळेबंदीमुळे** शाळा बंद आहेत. मात्र ऑनलाइन शिक्षण सुरू आहे. त्यासाठी प्रत्येक मुलाकडे स्मार्ट फोन, इंटरनेटची सुविधा, वीजपुरवठा, संगणक इत्यादी सोयी आवश्यक आहेत. या सोयी शहरी, आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील विद्यार्थ्यांनाच उपलब्ध आहेत. ग्रामीण व आदिवासी कुटुंबांतील गरीब विद्यार्थ्यांना त्या उपलब्ध होत नाहीत. शिक्षण हा घटनेने दिलेला मूलभूत हक्क आहे व त्यापासून कोणीही वंचित राहता कामा नये. हे लक्षात घेऊन शासनाने त्यांच्यासाठी वेगळी उपाययोजना करणे अपेक्षित आहे. शाळेची वेळ जवळ आली की दप्तर घेऊन पळत सुटायचे, प्रार्थनेपूर्वी वर्गात हजर व्हायचे, मित्रमैत्रिणींबरोबर अभ्यास करायचा, सर्वांनी मिळून पाढे, कविता म्हणायच्या, सांघिक कवायत व खेळ खेळायचे, वेगवेगळ्या स्पर्धांत भाग घ्यायचा, बक्षिसे मिळवायची ही मजा घरात भरणाऱ्या आभासी वर्गात कुठून येणार! म्हणून ऑनलाइनपेक्षा खरी शाळा बरी.

**- बकुल बोरकर,** विलेपार्ले, मुंबई.


## वर्गणीदारांसाठी अर्ज

'लोकप्रभा'च्या वर्गणीदारांनी वर्गणीसोबत पुढील नमुन्यात सुवाच्य अक्षरात माहिती पाठवावी. रबर स्टॅम्प वापरू नये.

संपूर्ण नाव : _____

संपूर्ण पत्ता : _____

_____

पिन कोड क्र. : ☐☐☐☐☐☐

टेलिफोन क्र. : _____

**- वितरण व्यवस्थापक**

| अंकांची संख्या | वर्गणी | वर्गणीचे दर | | ऑनलाइन बुकिंगचे दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | पोस्टाने (देशांतर्गत) | एअरमेलने (परदेशातील) | देशांतर्गत | एअरमेलने |
| ५१ | वार्षिक | ₹ १,०७६ | ₹ ५,७२० | ₹ १,१०३ | ₹ ५,८६३ |
| २६ | सहामाही | ₹ ५३८ | ₹ २,८६० | ₹ ५५२ | ₹ २,९३२ |

♦ *वर्गणीचा धनादेश 'द इंडियन एक्स्प्रेस प्रायव्हेट लिमिटेड' या नावाने इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०' या पत्त्यावर पाठवावा.*

कार्यकारी संपादक
♦ विनायक परब

सह वृत्तसंपादक
♦ वैशाली चिटणीस

वरिष्ठ प्रतिनिधी
♦ विजया जांगळे

अंक सजावट आणि मांडणी
♦ संदेश पाटील

अंक-रचना साहाय्यक
♦ अशोक दळवी
♦ विशाल क्षीरसागर

कार्यालयीन समन्वय :
♦ नेहा नाकटे
दूरध्वनी : २७६३९९२५

♦ वितरण विभाग (महापे) :
दूरध्वनी : २७६२५८१५ *(वर्गणीदारांसाठी)*

♦ जाहिरात विभाग : राहुल महाले
दूरध्वनी : ६७४४०३९६

♦ ब्रँड मॅनेजर : सुपर्णा नायक
दूरध्वनी : ६७४४०३१६
suparna.nayak@expressindia.com

♦ मुखपृष्ठ रचना : संदेश पाटील

♦ संपादकीय विभाग पत्रव्यवहार :
लोकप्रभा, प्लॉट नं. ईएल/१३८,
टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे,
नवी मुंबई-४००७१०.
फॅक्स : २७६३३००८
ई-मेल : lokprabha@expressindia.com
वेबसाइट : www.lokprabha.com

© द इंडियन एक्स्प्रेस प्रायव्हेट लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशत: पुन:प्रकाशनास वा पुन:प्रसारणास मनाई.

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले.

■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका
■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार
■ कार्यकारी संपादक : विनायक परब *
(* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)
*R. N. I. Regn. No. 27792 / 74*

**मथितार्थ**

# जलमेव चिंता!

अमेरिकेचे संरक्षण मंत्रालय प्रतिवर्षी चीनच्या लष्करी सामर्थ्याचा आढावा घेणारा एक अभ्यास अहवाल तयार करते. यंदाचा अहवाल अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. स्वतः अमेरिका या अहवालात म्हणते की, आता अमेरिकेचे नव्हे तर चीनचे नौदल हे जगातील सर्वात मोठे नौदल ठरले आहे. आकडेवारी देताना हा अहवाल म्हणतो की, अमेरिकेच्या नौदलाकडे २९३ युद्धनौका तर चीनकडे ३५० युद्धनौका आणि पाणबुड्या आहेत. त्यांची विगतवारी टनावारी करायला गेले तर अमेरिकेचे नौदल सामर्थ्यशाली भासू शकते; मात्र वस्तुस्थिती तशी नाही. कारण चीनकडे असलेल्या युद्धनौका आणि पाणबुड्या या अत्याधुनिक आणि बहुपयोगी पद्धतीने युद्धात वापरता येण्याजोग्या आहेत. शिवाय येत्या काळात त्यांचे शस्त्रास्त्रसामर्थ्यही दुपटीने वाढविण्याचा चीनचा मनोदय आहे. एवढेच नव्हे तर शेजारील शत्रुराष्ट्र असलेल्या भारताला घेरण्याच्या उद्देशाने म्यानमार, पाकिस्तान आणि श्रीलंकेसोबत त्यांनी जवळीक साधली असून तिथे चीनच्या नौदलाचा तळ उभारण्याचे घाटते आहे.

अमेरिकच्या संरक्षण मंत्रालयाने हे आता म्हणजे २०२० साली सांगितलेले असले तरी त्याचे संकेत पार २००४ पासून मिळत होते. त्याच वेळेस म्यानमार, पाकिस्तान आणि श्रीलंकेशी जवळीक साधण्यास चीनने पद्धतशीरपणे सुरुवात केली होती. दुसऱ्या महायुद्धामध्ये नौदलाने बजावलेल्या कामगिरीनंतर आणि विशेषतः भारतीय नौदलातील आयएनएस विक्रांत आणि विराटच्या कामगिरीनंतर त्यातून धडा घेत चीनने विमानवाहू युद्धनौका बांधणीसाठी कंबर कसली होती. आपल्याला पूर्व-पश्चिम किनारपट्टीवर आणि शिवाय हिंदी महासागरात अशा एकूण तीन विमानवाहू युद्धनौकांची गरज आहे, असे असतानाही आज आपल्याकडे केवळ एकच आयएनएस विक्रमादित्य शिल्लक आहे. चीनला विमानवाहू युद्धनौकांची निकड जाणवायला विलंब झाला. मात्र त्यानंतर त्यांनी वेगात पावले उचलली. पहिली विमानवाहू युद्धनौका रशियाकडून घेतली. नंतर स्वतः तयार केली. आणि आता चीनची दुसरी स्वयंपूर्ण बनावटीची विमानवाहू युद्धनौका तयार झाली आहे. याशिवाय सहा अधिक विमानवाहू युद्धनौका बांधणीचा त्यांचा प्रयत्न आहे. आरमारी लढाईत पाणबुड्यांना स्वतंत्र महत्त्व असते. आपले पाणबुडीदळ जुनेपुराणे, वयोमान संपलेले आणि तुटपुंजे आहे. तर चीनचे संख्येत अनेक पटींनी अधिक आणि अत्याधुनिक आहे. स्कॉर्पिन पाणबुड्या प्रत्यक्ष भारतीय नौदलात दाखल होण्यास काहीसा वेळ लागणार आहे. खरे तर आताच्या घडीस पाकिस्तानचे पाणबुडीदळही प्रभावी वाटावे, एवढी आपली अवस्था दुर्दैवी आहे. अशा अवस्थेत आलेला हा अहवाल महत्त्वाचा ठरावा. हा अहवाल चुकीचा आणि दिशाभूल करणारा असल्याचे चीनने म्हटले असले तरी भारतीय नौदलाकडे असलेली माहितीही यापेक्षा वेगळी नाही. उघडपणे कुणी बोलत नाही इतकेच!

सर्वात महत्त्वाचे म्हणजे अमेरिकेच्या नौदलालाही आव्हान देणारी भाषा चीनने गेल्या अनेक वर्षांत केली असून हिंदी महासागर आणि अरबी समुद्रावर प्रभाव राखण्याचा मनोदय त्यांनी यापूर्वीच जाहीर केला आहे. त्यामुळे लडाखमध्ये गलवान येथे उद्भवलेल्या संघर्षासारखाच संघर्ष येणाऱ्या काळात या दोन्ही समुद्रांवर होणे तेवढेच अपेक्षित आहे. प्रत्यक्षात अशी परिस्थिती सागरावर उद्भवल्यास आपल्याकडील नौदल अधिकारी कितीही सक्षम असले तरी युद्धनौका आणि खासकरून पाणबुड्यांच्या संख्याबळात कमी पडणे आपल्याला परवडणारे नाही. सध्या लष्करीदृष्ट्या गलवानमध्ये आपण पाय रोवून उभे असलो तरी समुद्र हे पूर्णपणे वेगळे रणांगण आहे. इथे 'जलमेव यस्य बलमेव तस्य' म्हणजेच ज्याची सागरावर सत्ता तोच जगात सर्वश्रेष्ठ हे पूर्णपणे लागू आहे. वेदांतील हे विचार आपल्याहीपेक्षा चीननेच अधिक गांभीर्याने घेतलेले दिसतात. त्यामुळे आपलीच अवस्था सध्या 'जलमेव चिंता' अशी झालेली आहे!



@vinayakparab
vinayak.parab@expressindia.com

# सरकारी हस्तक्षेपाची परीक्षा

**कव्हरस्टोरी**

चिन्मय पाटणकर

राज्यातील विद्यापीठं स्वायत्त असताना आणि परीक्षेच्या नियोजनाचे सर्वाधिकार विद्यापीठांकडे असताना राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून झालेल्या सततच्या हस्तक्षेपामुळे अंतिम वर्ष परीक्षांचं कडबोळं झालं आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी सरकारला वाटणं वगैरे ठीक आहे, पण परीक्षांसाठी सर्व विद्यापीठांची एकत्र मोट बांधण्याची धडपड अनाकलनीय आहे. एकुणात सरकारी हस्तक्षेप हे अंतिम वर्षाच्या परीक्षांच्या गोंधळाचं कारण आहे.

शिक्षणाच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी शिकणं जितकं महत्त्वाचं आहे, तितकंच त्यांचं मूल्यमापनही... परीक्षा हे आयुष्याचं सर्वस्व असू शकत नाही हे मान्य केलं, तरी मूल्यमापनाला पर्याय असूच शकत नाही. विद्यार्थ्याने शिकलेल्याचं त्याला किती आकलन झालं याची चाचपणी करण्यासाठी परीक्षा प्रणाली आहे. गेल्या काही वर्षांत रोजगारनिर्मितीच्या टक्केवारीच्या तुलनेत पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केलं जात आहे. वेगवेगळ्या विद्याशाखांतून पदवी घेऊन नोकरीच्या बाजारात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहता मागणीपेक्षा पुरवठा जास्त अशी शिक्षणाची अवस्था झाली आहे. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगारीचं प्रमाणही सातत्यानं वाढतं आहे. एकीकडे ही परिस्थिती, तर दुसरीकडे करोना विषाणू संसर्गामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षांवरून निर्माण झालेला गोंधळ... वास्तविक अंतिम वर्षाच्या परीक्षांवरून इतका गोंधळ होण्याचं काहीच कारण नव्हतं. पण राजकीय नेत्यांचे अहं, परीक्षांच्या विषयात विद्यार्थी संघटनांकडूनही झालेलं राजकारण, विद्यापीठांच्या अधिकारात सरकारने केलेला हस्तक्षेप अशा अनेक कारणांनी अंतिम वर्षाच्या परीक्षाचं कडबोळं झालं. मे महिन्यापासून सुरू झालेल्या परीक्षांच्या गोंधळाला सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घेण्याचा निर्णय दिल्याने पूर्णविराम मिळाला आहे. अर्थात तो महाराष्ट्रात तरी पूर्णतः संपलेला नाही.

### सरकारचा हस्तक्षेप आणि परीक्षांचा गोंधळ

राज्यात करोना विषाणूचा संसर्ग मार्चमध्ये सुरू झाला. तेव्हा काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होत्या, तर काहींच्या परीक्षा एप्रिल-मेमध्ये होणार होत्या. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून टाळेबंदी जाहीर झाल्याने परीक्षा स्थगित कराव्या लागल्या. त्यानंतर विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षा कशा घ्यायच्या याची चर्चा सुरू झाली. एप्रिलमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाकडून पहिल्यांदा विद्यापीठांसाठी परीक्षेबाबतची मार्गदर्शक तत्त्वं जाहीर करण्यात आली. त्यानुसार मे महिन्यात परीक्षा आणि नव्या शैक्षणिक वर्षाबाबतचा आराखडा देण्यात आला होता. तसेच अंतिम वर्ष वगळता अन्य वर्षांच्या परीक्षा रद्द करण्याची सूचनाही करण्यात आली

> विद्यापीठांचे कायदे आहेत, विद्यापीठांना स्वायत्तता आहे. त्यांना अनुसरून कोणतेही शैक्षणिक निर्णय घेतले पाहिजेत. विद्यापीठांचे परीक्षा मंडळ, शैक्षणिक परिषदा सक्षम आहेत. त्यांनी निर्णय घेतले पाहिजेत. प्रत्येक विद्यापीठाची परीक्षा पद्धत स्वतंत्र असू शकते. विद्यापीठांना त्यांच्या अधिकाराप्रमाणे, कायद्याप्रमाणे परीक्षा घेण्यासाठी शासनाने मदत केली पाहिजे. परीक्षा घेण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. त्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार केलेला आहे. तसंच विद्यापीठंही परीक्षा घेताना विद्यार्थ्यांची काळजी घेणारच आहेत.
>
> **- डॉ. भूषण पटवर्धन,**
> उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

होती. राज्य शासनाकडून राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीने यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार परीक्षा घेण्याचा अहवाल दिला. त्यानुसार विद्यापीठांकडून अंतिम वर्षाच्या परीक्षांची आणि अन्य वर्षांच्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन करून निकाल जाहीर करण्यासाठीची तयारी सुरू झाली. मात्र करोना संसर्गामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, असे सांगत युवा सेनेकडून परीक्षा नको, अशी मागणी करण्यात आली. या मागणीला विरोध करत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने परीक्षा हवीच, अशी मागणी केली. मग उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी युवा सेनेची मागणी उचलून धरत यूजीसीला पत्र लिहून परीक्षा घेण्याबाबत असमर्थता दर्शवली आणि परीक्षा न घेता अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना श्रेणी प्रदान करण्याची मागणी केली. त्यावर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आक्षेप घेऊन परीक्षा घेण्याची स्पष्ट भूमिका मांडली. त्यानंतर राज्यातील अंतिम वर्ष परीक्षांचा गोंधळ खऱ्या अर्थानं सुरू झाला.

३१ मे रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा ऐच्छिक करण्याचा निर्णय घेतला. वास्तविक हा निर्णय घेताना अभियांत्रिकी, वास्तुरचना, वैद्यकीय, विधि आदी विद्याशाखांच्या शिखर संस्थांची मान्यता घेणे आवश्यक होते. ती न घेताच परीक्षा न घेण्याचा निर्णय झाला. मात्र शिखर संस्थांनी परीक्षा घेण्याची भूमिका सातत्याने स्पष्ट केली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून देशात परीक्षासाठी समान सूत्र ठेवण्याची मागणी केली. परीक्षा न देता पदवी घेतल्यास नोकरी मिळण्यातील अडचणीही उद्योग क्षेत्रातून मांडण्यात आल्या. तरीही राज्य शासनाने परीक्षा न घेण्याचीच भूमिका घेतली. त्यानंतर ६ जुलैला पुन्हा विद्यापीठ अनुदान आयोगाने परीक्षा घेण्याचे निर्देश दिले. जागतिक पातळीवर विद्यार्थ्यांची विश्वासार्हता राखण्यासाठी त्यांचं परीक्षेच्या माध्यमातून मूल्यांकन होणं आवश्यक आहे, असं यूजीसीनं सुधारित मार्गदर्शक तत्त्वांद्वारे स्पष्ट केलं. तसंच ऑनलाइन किंवा ऑफलाइन किंवा मिश्र पद्धतीने परीक्षा घेण्याची मुभा यूजीसीनं विद्यापीठांना दिली आहे. ३० सप्टेंबरपर्यंत विद्यापीठांनी परीक्षा घ्याव्यात, परीक्षा देता न आलेल्या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षेची संधी द्यावी, विषय राहिलेल्या (एटीकेटी) विद्यार्थ्यांच्याही परीक्षा घ्याव्यात, असंही यूजीसीनं स्पष्ट केलं. अखेर सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांवर सर्व बाजू ऐकून परीक्षा न घेता पदवी देणे अयोग्य असल्याचे सांगून न्यायालयानं यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार परीक्षा घेण्याचा निर्णय दिला. तसंच ज्या विद्यापीठांना ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणं शक्य नाही, त्यांनी यूजीसीकडून मुदत वाढवून घ्यावी, असंही नमूद केलं.

### विद्यापीठांच्या स्वायत्ततेचं काय?

राज्यातील विद्यापीठं स्वायत्त आहेत. अभ्यासक्रम, परीक्षा, प्रवेश अशी सर्व प्रक्रिया विद्यापीठं स्वतःच राबवतात. त्यात राज्य सरकारची काहीच भूमिका नसते. मात्र करोनाकाळात परीक्षा घेण्याविषयी सरकारने आपल्या अधिकारकक्षेत नसतानाही विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप केल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचं स्पष्ट होतं. राज्यातल्या

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर परीक्षा घेण्याचा अधिकार हा विद्यापीठांचा आहे. मात्र राज्य शासन सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करत आहे. परीक्षेचं स्वरूप ठरवण्यासाठी कुलगुरू आणि अन्य अधिकाऱ्यांची समिती नेमणं हा विद्यापीठ कायद्याचा भंग आहे. परीक्षा कधी होणार हे ठरल्यावर त्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांच्या सल्ल्यानुसार मार्गदर्शन करणं एवढीच सरकारची जबाबदारी आहे. सर्व विद्यापीठांच्या परीक्षा एकाच पद्धतीनं घेण्याचा अट्टहास शैक्षणिक अराजकता निर्माण करणारा आहे. परीक्षेचं स्वरूप ठरवण्याचा अधिकार विद्यापीठांच्या विद्वत परिषद, परीक्षा मंडळ, अभ्यास मंडळ यांचा आहे. मात्र राज्य सरकार विद्यापीठांची स्वायत्तता मान्य करत नाही, हे सरकारच्या कार्यपद्धतीवरून दिसून येतं.

**- डॉ. धनंजय कुलकर्णी,**
याचिकाकर्ते, माजी अधिसभा सदस्य

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर विद्यापीठांच्या कुलगुरूंनी आपापल्या विद्यापीठांच्या विद्या परिषदेची बैठक घेऊन परीक्षा कशी घ्यायची हे ठरवणं अपेक्षित होतं. कारण विद्या परिषद हे परीक्षेचा निर्णय घेणारं अधिकार मंडळ आहे. पण उच्चशिक्षणमंत्र्यांनी कुलगुरूंची बैठक बोलावली. विद्यार्थ्यांची सर्वतोपरी काळजी घेण्याचे निर्देश देऊन परीक्षांची जबाबदारी कुलगुरूंवर सोपवणं आवश्यक होतं. कारण अंतिमतः परीक्षा घेणं ही विद्यापीठांची जबाबदारी आहे. प्रत्येक विद्यापीठाचं भौगोलिक स्थान वेगळं आहे. संबंधित अधिकार मंडळांचं मत घेऊन, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेऊन कुलगुरूंनी परीक्षा घेणं अपेक्षित होतं.

**- डॉ. अरुण अडसूळ,** माजी कुलगुरू

राज्य सरकारकडून विद्यापीठांच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप झाला, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडूनही विद्यापीठांच्या अधिकारांवर अतिक्रमण झालं. कारण परीक्षा घेण्याचा, ती कशी घ्यायची, याचा अधिकार विद्यापीठांचा आहे. परीक्षा घ्यायलाच पाहिजे, परीक्षेविना पदवी कशी द्यायची याबरोबर परीक्षा न घेतल्यास परदेशी विद्यापीठांत प्रवेश कसा मिळणार, अशी मजेदार मांडणी केली गेली. परदेशी विद्यापीठांमध्ये आपल्या पदवीला काहीच किंमत नाही. केवळ पदवी आहे की नाही एवढंच पाहिलं जातं. ही सगळीच विधानं मला अनाठायी वाटतात, अशैक्षणिक वाटतात. नवीन शैक्षणिक धोरण येऊ घातलेलं असताना विद्यापीठ अनुदान आयोगालाही एक भूमिका घेण्याची संधी होती. अंतिम वर्ष परीक्षांच्या बाबतीत सुसंवादातून मार्ग काढणं शक्य होतं. ते झालं नाही. सगळीकडून दटावण्याचा प्रकार होतोय. कोणीच कोणाला विश्वासात घेत नाही. राज्य सरकारही विद्यापीठांना विश्वासात घेत नाही, दुसरीकडून विद्यापीठ अनुदान आयोगाही विश्वासात घेत नाही. या सगळ्या प्रकरणांत विद्यापीठाचं म्हणणं काय तेही कधी पुढे आलं नाही. खरं तर परीक्षेसाठी न्यायालयात जाण्याची गरजही नव्हती. राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग एकमेकांशी बोलले असते तर मार्ग निघणं शक्य होतं. राज्य सरकारची भूमिका चुकीची होती असं वाटत नाही. परदेशात गुणवत्ता असल्याचं सांगितलं जातं, पण तिकडची विद्यापीठंच परीक्षा घेतात, शिक्षकच मुलांची परीक्षा घेत असतात. परदेशातील विद्यापीठांनीही परीक्षा रद्द केल्या. त्यामुळे नव्या शैक्षणिक धोरणात विद्यापीठांना, शिक्षकांना, शाळेतल्या शिक्षकांनाही स्वातंत्र्य आहे. परीक्षाही नव्या पद्धतीने घ्यायच्या आहेत. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार परीक्षा घेतल्या जातील. पण परीक्षेचे सोपस्कार केले जातील. बहुपर्यायी परीक्षा कमी वेळाची, झटपट निकाल तयार करता येणारी असली, तरी त्यासाठी चांगले प्रश्न काढावे लागतात. पण तो चांगला पर्याय आहे आणि निकालही लवकर लावता येईल. परीक्षेच्या विषयात विद्यार्थी-पालकांची बाजूही समजून घ्यायला हवी. या सगळ्यात विद्यार्थ्यांचं आरोग्य, करिअर याच्याशी खेळ चाललाय. या वादात विद्यार्थ्यांचं नुकसान खूप झालं याचं वाईट वाटतंय. विद्यार्थ्यांचं होणारं नुकसान विचारात घ्यायला हवं. अभिनिवेश बाजूला ठेवून तोडगा काढायला हवा होता. आता परीक्षा घेताना विद्यार्थ्यांवर त्याचा ताण येणार नाही याचा विचार करावा लागेल. कारण विद्यार्थ्यांना परीक्षेचा ताण आणि करोना संसर्गाचाही ताण आहे. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत खबरदारी घेऊन परीक्षा घेता आली तर चांगलं होईल.

**- डॉ. हेमचंद्र प्रधान,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

कुलगुरूंनी परीक्षा घेण्याची भूमिका मांडूनही केवळ परीक्षा नको हे सरकारने ठरवल्यामुळे गोंधळ निर्माण झाला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षा घेण्याच्या कार्यपद्धतीचा आराखडाही सरकारला सादर केला होता. कुलगुरूंच्या बैठकीत परीक्षा घेण्यासाठी वेगवेगळे पर्यायही देण्यात आले होते. मात्र परीक्षा नको हीच सरकारची भूमिका होती. सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घेण्याचा निर्णय दिल्यानंतर विद्यापीठांनी स्वतंत्रपणे परीक्षेचं नियोजन करणं आवश्यक असतानाही सरकारकडून हस्तक्षेप सुरूच आहे. पुन्हा कुलगुरूंची समिती नेमून परीक्षा पद्धत ठरवण्यात येत आहे. परीक्षेसाठी प्रत्यक्ष परीक्षेसह बहुपर्यायी प्रश्नपत्रिका, ऑनलाइन परीक्षा असे काही पर्याय आहेत. एकीकडे मॉल, बाजारपेठ, सार्वजनिक वाहतूक हे सगळं सरकार सुरू करत असताना अंतिम वर्षाची परीक्षा मात्र विद्यार्थी घरातूनच देतील हा सरकारचा आग्रह आहे.

प्रत्येक विद्यापीठाचं भौगोलिक स्थान वेगळं आहे. प्रत्येक विद्यापीठाच्या मर्यादा आणि शक्तिस्थानं वेगळी आहेत. सर्वच विद्यापीठांमध्ये ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याइतकी सक्षम यंत्रणा नाही. त्यामुळे विद्यापीठं आपल्या क्षमतांनुसार, संसर्गाची परिस्थिती समजून घेऊन परीक्षा पद्धत, वेळ ठरवू शकतात. असं असतानाही सर्व विद्यापीठांसाठी एकच पद्धत ठरवण्याचा सरकारचा आग्रह चुकीचा आहे. आजवर सरकारने विद्यापीठांच्या परीक्षा कशा घ्यायच्या हे ठरवले नाही, तर आता करोना संसर्गाच्या काळात परीक्षा कशा घ्यायच्या हे सरकार का ठरवत आहे? परीक्षा कशा घ्यायच्या हे सरकार ठरवणार असेल, तर विद्यापीठांच्या स्वायत्ततेचा उपयोग काय, असाही प्रश्न निर्माण होतो. एका अर्थाने सरकारचा हस्तक्षेप हा दबावासमान आहे. त्यामुळे एकूण परिस्थिती पाहता सरकारचा हस्तक्षेप हाच परीक्षांच्या गोंधळाला कारणीभूत आहे, असे दिसते.

response.lokprabha@expressindia.com

# दानयज्ञाचा श्रीगणेशा

सर्वकार्येषु सर्वदा

बँकिंग पार्टनर

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!

करोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाचा गणेशोत्सव नेहमीपेक्षा वेगळ्या पद्धतीने साजरा झाला. भाविकांसाठी त्यांच्या भक्तीभावाचं प्रकटीकरण म्हणून गणेशोत्सव महत्त्वाचा असतो तसाच समाजातल्या जाणत्या, संवेदनशील व्यक्तीसाठी तो वेगळ्या कारणाने महत्त्वाचा असतो. ते कारण म्हणजे 'लोकसत्ता' पुरस्कृत 'सर्वकार्येषु सर्वदा' हा उपक्रम.

हा उपक्रम नेमका काय आहे, हे आता वाचकांना खरंतर नीट माहीत आहे. समाजात होत असलेल्या भ्रष्टाचार, अन्याय, अत्याचारांमुळे एक प्रकारचे निराशेचे वातावरण तयार होत असते. यंदा त्यात करोनामुळे मोठी भर पडली. याशिवाय घुसखोरीचे सावट आहेच. एकीकडे स्त्रियांचं सक्षमीकरण होत असलं तरी दुसरीकडे स्त्रियांवरील अत्याचारांनी उग्र स्वरूप धारण केलं आहे. या देशात काहीच चांगलं घडू शकत नाही, असा विचार करत बुद्धिमान तरुण मोठ्या संख्येने देशाबाहेर जाताना दिसतो आहे. असं सगळं असलं, काहीसे निराशेचे सूर उमटत असले, तरी या वातावरणाला दिलाशाची किनारदेखील आहे. सगळंच संपलेलं आहे आणि आता काही घडूच शकत नाही, असं नाही. समाजात विधायक कार्याचा वसा घेऊन अनेक व्यक्ती-संस्था निरपेक्षपणे समाजमन घडविण्याच्या कार्यात गुंतल्या आहेत. समाजाचा आधार होण्यासाठी धडपडणाऱ्या या संस्थांना समाजाकडूनही आधाराची गरज आहे. आपण उठून समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी काही करू शकत नसलो तरी ते करणाऱ्यांना हातभार लावायची, त्यांच्या पाठीशी जमेल तेवढी आर्थिक ताकद उभी करायची अनेकांची इच्छा असते. पण कुठेतरी जाऊन काहीतरी करणं त्यांना खरोखरच शक्य नसतं. त्यांची ही सत्कार्याची इच्छा आणि या संस्थांची गरज यांची सांगड घालण्यासाठी 'लोकसत्ता' हे व्यासपीठ आहे.

'सर्व कार्येषु सर्वदा' या उपक्रमातून या संस्थांची एक विधायक साखळी 'लोकसत्ता'ने बांधली आहे. या वार्षिक दानयज्ञाची आवृत्ती दरवर्षीप्रमाणेच या वर्षीही सादर झाली. वेगवेगळ्या क्षेत्रांत सामाजिक जाणिवेने काम करणाऱ्या दहा संस्थांची ओळख या उपक्रमातून लाखो वाचकांना झाली. या सत्कार्यात सहभागी होण्याची अनेकांची अतीव इच्छा असते. मात्र, व्यक्तिगत, कौटुंबिक किंवा अन्य अनेक कारणांमुळे त्यामध्ये थेट सहभाग शक्य होत नाही. अशा वेळी, कुणी तरी आपल्या मनातल्याच कामात झोकून दिल्याची माहिती मिळते, आणि इच्छापूर्तीचा क्षण जवळ येतो. 'लोकसत्ता'च्या या उपक्रमातून यंदा गणेशोत्सवकाळात दहा संस्थांचा परिचय करून दिला गेला.

दरवर्षाप्रमाणे यंदाही या संस्थांना लोकसत्ता परिवार व हितचिंतकांकडून मोलाचा आर्थिक हातभार लागेल आणि हीच समाजातील दुःख, विघ्ने दूर करणाऱ्या विनायकाची खरी आराधना ठरेल!

**धनादेश येथे पाठवा...** धनादेशामागे किंवा त्याबरोबर देणगीदाराने आपले संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी तसेच भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.

### मुंबई कार्यालय
**लोकसत्ता, संपादकीय विभाग,**
मफतलाल सेंटर, सातवा मजला,
नरिमन पॉइंट,
मुंबई - ४०००२१,
०२२-६७४४०२५०

### महापे कार्यालय
**संपादकीय विभाग,**
प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंड. एरिया, एमआयडीसी, महापे,
नवी मुंबई - ४००७१०.
०२२-२७६३९९००

### ठाणे कार्यालय
**संपादकीय विभाग,**
कुसुमांजली बिल्डिंग, दुसरा मजला, गोखले रोड, नौपाडा,
ठाणे.
०२२-२५३९९६०७

### पुणे कार्यालय
**संपादकीय विभाग,**
एक्स्प्रेस हाऊस,
प्लॉट नं. १२०५/ २/ ६,
शिरोळे रस्ता, पुणे - ४११००४.
०२०-६७२४११२५

### नाशिक कार्यालय
**संपादकीय विभाग,**
स्टेडियम कॉम्प्लेक्स नं. ६,
पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, नाशिक - ४२२००१.
०२५३-२३१०४४४

### नागपूर कार्यालय
**संपादकीय विभाग,**
प्लॉट नं. ३८, अँडिसन ट्रेड सेंटर,
अंबाझरी,
नागपूर - ४४००१०,
०७१२-२२३०४२१

### दिल्ली कार्यालय
**संपादकीय विभाग,**
द इंडियन एक्स्प्रेस बिल्डिंग,
बी१/ बी, सेक्टर १०,
नॉएडा - २०१३०१ उत्तर प्रदेश.
०१२०-२०६६९९५००

# स्वमग्नतेतून पुढे जाण्याचा 'आरंभ'

गोल फिरणाऱ्या पंख्याच्या पात्यांकडे तासन्‌तास पाहत राहणे किंवा एखादी दोरी हातात घेऊन खेळत राहणे, अशा गोष्टींनी ते कंटाळत नाहीत. हलणाऱ्या वस्तूंबाबत त्यांना कमालीची उत्सुकता असते. पण, अवस्था स्वमग्न. सुंदर चित्र काढतील, पण नैसर्गिक विधी कोठे आणि कसे करावेत, याचे भान मात्र नसते. अशा स्वमग्न मुलांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी 'आरंभ' ही स्वयंसेवी संस्था शाळा चालवते.

स्वमग्न स्थितीमधील मुलांना सांभाळणे हेच एकमेव काम अशी या मुलांच्या पालकांची अवस्था असते. त्यामुळे मूल आणि पालक या दोघांशी संवाद ठेवावा लागतो. या मुलांनी त्यांची दिनचर्या स्वतःहून पूर्ण करावी अशा पद्धतीचे शिक्षण शाळा देते. ही संस्था सुरू करण्यापूर्वी अंबिका टाकळकर यांना स्वतःलाही स्वमग्न मुलांना सांभाळतानाच्या मानसिक आणि शारीरिक ताणातून जावे लागले. औरंगाबादमध्ये या मुलांवर उपचाराची सोय नसल्याने दरवेळी पुणे – मुंबईला जाणे हे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हतेच, शिवाय मुलांचीही फरफट होई. त्यामुळे दोन मुलांसह त्यांनी २०११ मध्ये आरंभचे हे काम सुरू केले आणि सध्या ६७ मुले येथे शिकतात.

या मुलांची बुद्धिमत्ता कमी असते असे नाही. फक्त त्यांची बुद्धी शरीराच्या गतीशी जुळत नाही. आरंभचे काम येथे सुरू होते. संगीत, नृत्य, शारीरिक कसरत, मन आणि शरीर यांचा समन्वय जुळविणारे खेळ, त्यातून वाचाविकास, संवाद प्रक्रिया घडून यावी असे शब्द, वाक्य, नाटक असे नानाविध प्रकार उपचार पद्धतीचा भाग म्हणून वापरले जातात. प्रत्येक मुलाच्या दिनचर्येची आखणी करणे हे या कामाचे सूत्र. शून्य ते सहा वयोगटातील विद्यार्थ्यांची कृतिपत्रिका वेगळी आणि ६ ते १८ वर्षांच्या मुलांसाठी कृती कार्यक्रम निराळे. अशा मुलांसाठी शिक्षक मिळणे हे महाकठीण काम. त्यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीला प्रशिक्षित करण्याचे कामही 'आरंभ'ला करावे लागले.

ही मुले एका जागी बसू शकत नाहीत. नजरेला नजर देत नाहीत. ओळखीच्या लोकांनाही प्रतिसाद देताना त्यांना वेळ लागतो. ती एकच गोष्ट वारंवार करतात. मूल वयाने वाढते. मोठे दिसू लागते. पण त्याचा स्वतःवर ताबा नसतो. अशा मुलांना सांभाळणे अवघड होऊन बसते. अशा मुलांसाठी वसतिगृह सुरू करण्याचा 'आरंभ'चा मानस आहे.

शाळा सुरू झाली तेव्हा म्हणजे २०१२ मध्ये किरण जोशी 'आरंभ'मध्ये आला, तेव्हा त्याचे स्वतःवर नियंत्रण नव्हते. पण नंतरचा त्याचा प्रवास थक्क करणारा आहे. आठव्या वर्षी त्याला जेमतेम दोन बोटांत पेन पकडता येत होते. तो आता १९ वर्षांचा आहे आणि दहावीच्या परीक्षेची तयारी करतो आहे. तो आता दुचाकी चालवू शकतो. भ्रमणध्वनी, संगणक हाताळतो. अशा मुलांना आनंदाने, सन्मानाने सुरक्षित जगायला मदत करणे हेच संस्थेचे उद्दिष्ट असल्याचे व्यवस्थापकीय संचालक अंबिका टाकळकर सांगतात. सध्या १६ कर्मचारी या कामात आहेत.

स्वमग्नता वेळेवर लक्षात आली तर लवकर उपचार सुरू करता येतात. उपचार करताना दृक्–श्राव्य माध्यमातून शिक्षण दिले जाते. या मुलांमधील अतिचंचलता कमी करण्यासाठी संगीताचा उपयोग केला जातो. राष्ट्रीय मुक्त संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार या मुलांच्या प्रगतीचे मूल्यांकन केले जाते.

या मुलांकडून वेगवेगळ्या वस्तूंची निर्मिती आणि विक्री ही आता नित्याची बाब झाली आहे. या मुलांमध्ये वर्तनबदल करण्यासाठी शाळेतील शिक्षक सातत्याने काम करतात. रंगकाम, तबला किंवा इतर वाद्य वाजविणे, संगणकाचा वापर यातून मुलांमध्ये बदल होतात. या मुलांनी एखादे कौशल्य आत्मसात करावे, यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. आपले मूल स्वमग्न आहे हे स्वीकारायला पालकांची मानसिकता घडवावी लागते. एक मूल आठ महिने शाळेच्या प्रवेशद्वारात बसायचे. शेवटी त्याच्यासाठीचे सगळे कृती अभ्यास प्रवेशद्वारात घ्यायचे ठरले. तो मुलगा आता शाळेत रमला आहे. सगळ्या वर्गात हिंडत राहतो. पण हे सारे करताना मूल आणि पालक या दोघांशी सतत बोलावे लागते. समजून घ्यावे लागते. ही मानसिकता घडविण्यासाठी संयम ठेवावा लागतो. हे आता 'आरंभ'मधील मंडळीच्या अंगवळणी पडले आहे. त्यासाठी पालकमंचही चालविला जातो.

अशा मुलांच्या समस्यांवर काम करणाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळाही संस्थेमार्फत घेतल्या जातात. सध्या हे सारे उपक्रम भाड्याच्या जागेत सुरू आहेत. महिन्याला दीड लाख रुपयांपर्यंतचा खर्च ही शाळा सुरू ठेवण्यासाठी येतो. त्यातील सर्वाधिक खर्च हा इमारत भाड्याचा आहे. केवळ समाजाच्या मदतीने सुरू असणाऱ्या या शाळेला स्वतःची जागा घेण्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे. सध्या बजाज दुचाकी कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीतून काही मदत मिळत असल्याने डोलारा उभा आहे. पण, इमारत बांधण्यासाठी जागा नसल्याने सारे अडकून पडले आहे.

– सुहास सरदेशमुख

### संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?

*औरंगाबाद शहराच्या मध्यवर्ती बसस्थानकापासून रिक्षाने साधारणतः १५ मिनिटे अंतरावर शहानूरमियाँ दर्गा चौकातून संस्थेपर्यंत जाता येते.*

***Aarambh Society For Autism And Slow Learners Children* या नावाने धनादेश काढावा.**

# शिक्षण उपेक्षितांच्या दारी

घरोघरी शिक्षण कवडसे पोहोचावेत, यासाठी रजनी परांजपे आणि बिना शेठ लष्करी यांनी १९८९ मध्ये 'डोअरस्टेप स्कूल' ही संस्था सुरू केली. बिना या त्या वेळी समाजकार्याचे शिक्षण घेत होत्या. महाविद्यालयीन शिक्षणाचा भाग म्हणून त्यांनी कुलाबा पालिका शाळेतून शिक्षण अर्धवट सोडलेल्या मुलांना पुन्हा शाळेत आणण्याचे आव्हान स्वीकारले. यासाठी आंबेडकरनगर वस्तीत फिरत असताना मुले शाळेत न जाण्यामागची कारणे त्यांना सापडली. मत्स्य व्यवसायात काम करणाऱ्या मुलांच्या पालकांनी शिक्षणाविषयी दिलेल्या उत्तरांतून त्यांच्या जगण्यातील हतबलता दिसली. कधीच शाळेत न गेलेली काही किशोरवयीन मुलेही वस्तीत होती. काही मुलांची शिकण्याची इच्छा आहे, पण कामामुळे त्यांच्याकडे वेळ नाही, असे जाणवले.

मुले शाळेपर्यंत पोहोचू शकत नसतील तर शाळा त्यांच्यापर्यंत पोहोचवू या, या विचाराने १९८९ साली 'डोअरस्टेप स्कूल'ची स्थापना करण्यात आली. रजनी परांजपे आणि बिना यांनी वस्तीतच खेळांच्या माध्यमातून शिक्षण द्यायला सुरुवात केली. हळूहळू आजूबाजूच्या वस्त्यांमधील मुलांची स्थितीही त्यांना कळू लागली. संस्थेने ३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी वस्त्यांमध्ये बालवाडी सुरू केली. या वयोगटातील मुले काम करत नाहीत आणि त्यांच्याकडे लक्ष द्यायला पालकांना वेळ नसतो. त्यामुळे बालवाडीला चांगला प्रतिसाद मिळाला. १९९१–९२ या शैक्षणिक वर्षात प्रथमच संस्थेने २० ते २५ मुलांना शाळेत दाखल केले. आता दरवर्षी हजारो मुले शाळेत दाखल होतात.

मुले शाळेत दाखल झाली तरी नियमितपणे शाळेत जात नाहीत. पालक महिनोन्‌महिने मुलांना गावी घेऊन जात असल्याने शाळा बुडते. त्यामुळे शाळेत दाखल झाल्यानंतर सुरुवातीची काही वर्षे पालकांशी नियमित संवाद साधून त्यांचा मुलांच्या शिक्षणाला पाठिंबा मिळावा यासाठी प्रयत्न केले जातात. शाळेत दाखल होण्याचे वय निघून गेलेल्या मुलांना संस्थेतर्फे स्थानिक शिक्षक त्यांच्या वस्तीतच शिक्षण देतात.

शाळेबाहेर अनौपचारिकरीत्या शिक्षण घेऊन अपेक्षित कौशल्ये प्राप्त झाल्यानंतर मुले पालिका शाळांमध्ये दाखल होतात. शाळेत विद्यार्थ्यांच्या गर्दीशी, तेथील क्रमिक पुस्तकांशी आणि सतत शिक्षणेतर कामांमध्ये गुंतलेल्या शिक्षकांशी जुळवून घेणे विद्यार्थ्यांना जड जाते. ही परिस्थिती लक्षात घेऊन संस्थेने १९९२–९३ साली पालिका शाळांबरोबर काम करायला सुरुवात केली.

सध्या संस्था मुंबईत पालिकेच्या १० बालवाड्या, ४० शाळांबरोबर तर पुणे परिसरात २०० शाळांबरोबर करते आहे. संस्थेतर्फे पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी 'फर्स्ट स्टेप फॉरवर्ड' उपक्रम राबवला जातो. संस्थेचे शिक्षक विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन त्यांना लेखन, वाचन शिकवतात.

पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनाही शाळेतच अतिरिक्त मार्गदर्शन केले जाते. याशिवाय वस्ती पातळीवरही अभ्यास केंद्रे चालवली जातात.

एखाद्या 'कोचिंग क्लास'प्रमाणे ही केंद्रे विद्यार्थ्यांसाठी काम करतात. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागून त्यांचा भाषाविकास व्हावा, यासाठी शाळांमध्ये वाचन उपक्रम राबवला जातो. घरातील निराशाजनक वातावरणामुळे विद्यार्थी अबोल होतात, आपली आकलन क्षमता गमावून बसतात. काही विद्यार्थी चंचल, अस्थिर किंवा रागीट होतात. अशा विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी संस्थेने दोन समुपदेशकांची नियुक्ती केली आहे.

सध्या शाळा बंद असल्याने वस्ती शिक्षकांप्रमाणेच शाळा शिक्षकही वस्त्यांमध्ये जाऊन शिकवत आहेत. मुंबईत १५० वस्ती शिक्षक आणि शाळा शिक्षक आहेत. पुणे, पिंपरी–चिंचवड येथे १३५ वस्ती शिक्षक आणि ९२ शाळा शिक्षक आहेत. या सर्वांचे जवळपास गेल्या ६ महिन्यांचे वेतन रखडले आहे. कंपन्यांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी आणि वैयक्तिक देणग्या यांवर संस्था अवलंबून आहे. मात्र, टाळेबंदीमुळे सर्व आर्थिक स्रोत बंद झाले आहेत.

वस्त्यांमध्ये राहणाऱ्या मुलांपर्यंत संस्था पोहोचली, पण आझाद मैदानाजवळ किंवा रेल्वे स्थानकांच्या बाहेर अनेक मुले भटकताना दिसत. या मुलांसाठी संस्थेने जपानी राजदूतावासाच्या मदतीने बसमधील शाळा सुरू केली. ती चालवण्यासाठी 'आशा फॉर एज्युकेशन' या संस्थेने आर्थिक साहाय्य केले.

सध्या पुणे परिसरात ६ आणि मुंबईत ७ बसेस आहेत. प्रत्येक बस रोज चार ठिकाणी जाते. दोन–अडीच तास थांबते. मुले येऊन खेळ आणि कलेच्या माध्यमातून शिक्षण घेतात. त्यांच्या प्राथमिक शिक्षणावर अधिक भर दिला जातो आणि शक्य झाल्यास त्यांना शाळेतही दाखल केले जाते. ही चालती–फिरती शाळा पुढे सुरू ठेवण्याचे आव्हान संस्थेसमोर आहे. प्रत्येक बससाठी वार्षिक १२ लाख रुपये खर्च येतो.

डोअरस्टेप स्कूलने वंचित, उपेक्षित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारा पूल उभारला आहे. त्याआधारे शिकलेले विद्यार्थी विविध क्षेत्रांत काम करत आहेत. सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचा संस्थेचा मानस आहे. समाजातील दातृत्वशक्ती पुढे आली तर या वंचित मुलांचा शिक्षणप्रवास सुकर होईल.

– नमिता धुरी

**संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?**

*डोअरस्टेप स्कूल, खोली क्रमांक २५४, दुसरा मजला, जगन्नाथ शंकर शेठ पालिका शाळेची इमारत, लामार्ट विनार दुकानाच्या बाजूला, ग्रँट रोड पुलाच्या खाली, नाना चौक, ग्रँट रोड पश्चिम, मुंबई-४०००००.*

***THE SOCIETY FOR DOORSTEP SCHOOL*** *या नावाने धनादेश काढावा.*

# सांस्कृतिक संचित

भारताचा कारभार हाती घेतल्यानंतर येथील पारंपरिक शिक्षणव्यवस्था मोडीत काढून ब्रिटिशांनी इंग्रजीतून युरोपीय विद्या शिकविणारी शिक्षण पद्धती अमलात आणली. मात्र, वाईसारख्या परंपरासमृद्ध गावात तर जुन्या पद्धतीच्या पाच पाठशाळा त्या वेळी चालत होत्या. नारायणशास्त्री मराठे यांनी तिथे वेदान्त, न्याय, वेद, काव्य अशा अनेक शास्त्रांचे अध्यापन केले.

अनेक तरुण विद्यार्थी त्यांच्याकडे शिकायला येऊ लागले आणि 'प्राज्ञमठ' नावाची पारंपरिक शिक्षणाची संस्कृत पाठशाळा सुरू झाली. १९०५-०६ साली महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ जोर धरत होती आणि त्याच काळात तळेगावला समर्थ विद्यामंदिर नावाच्या राष्ट्रीय शाळेची स्थापना झाली. १९१० मध्ये इंग्रजांनी ही शाळा बंद केली तेव्हा तेथील विद्यार्थी, शिक्षक वाईतील प्राज्ञमठात आले. मग काही काळाने प्राज्ञमठ या खासगी पाठशाळेला 'प्राज्ञपाठशाळा' या सार्वजनिक संस्थेचे स्वरूप देण्यात आले. पारंपरिक पाठशाळेबरोबरच नवा माध्यमिक अभ्यासक्रम सुरू करायचा आणि त्यातून राष्ट्रीय चळवळीला वाहिलेले आणि आधुनिक विद्येने पारंगत विद्यार्थी तयार करायचे हा त्यामागील हेतू होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वासुदेवशास्त्री कोनकर, पांडुरंगशास्त्री गोस्वामी असे विद्वान येथेच तयार झाले. ३१ जुलै १९२० रोजी प्राज्ञपाठशाळा ही संस्था 'प्राज्ञपाठशाळा मंडळ' या नावाने नोंदविण्यात आली. या संस्थेने १०० वर्षे पूर्ण केली आहेत.

१९२० ते १९६० या कालावधीत प्राज्ञपाठशाळा मंडळाने अनेक समाजसुधारणांचे निर्णय घेतले. संस्थेचे महत्त्वाचे कार्य म्हणजे स्वामी केवलानंद सरस्वती यांनी सुरू केलेला 'धर्मकोश.' प्राचीन भारतीय संस्कृती, सामाजिक मानवशास्त्र, धार्मिक संकल्पनांची उत्क्रांती आदी ज्ञानविषयांचा एक मूलभूत साधनग्रंथ म्हणून धर्मकोशाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. आधुनिक ज्ञान, सामाजिक समता तसेच समताधिष्ठित न्यायासाठी परंपरागत हिंदू धर्म आणि समाजात सुधारणा करण्याच्या उपक्रमात प्राज्ञपाठशाळा मंडळ नेहमीच अग्रेसर राहिले. या उपक्रमाचे साधन म्हणून धर्मकोशाची योजना करण्यात आली आहे. धर्मशास्त्राच्या परंपरेप्रमाणे हिंदू धर्म नेहमीच मोकळा, गतिशील होता आणि काळाच्या ओघात, वैचारिक आणि नैतिक प्रगतीला अनुसरून, सतत परिवर्तनशील होता हे सिद्ध करणारा प्रमाण, व्यापक आणि निर्विवाद पुरावा संग्रहित करणे हे धर्मकोशाचे मुख्य प्रयोजन होते. अस्पृश्यता निवारणाला असलेल्या धर्मशास्त्रातील आधारासाठी महात्मा गांधी प्राज्ञपाठशाळेकडे वळाले, यावरूनच धर्मकोशाद्वारे झालेल्या सामाजिक कार्याचे महत्त्व स्पष्ट होते.

धर्मकोशाचे ११ कांड आहेत. प्रत्येक कांडात वेगवेगळे भाग आहेत. गेल्या ९० वर्षांत पाच कांडांतील २६ भाग प्रकाशित झालेले आहेत. पाचव्या कांडातील १ भाग आणि उरलेल्या ६ कांडांतील २० भाग मिळून २१ भाग तयार करून मंडळाला प्रकाशित करायचे आहेत.

प्राज्ञपाठशाळेचे दुसरे मोठे कार्य म्हणजे ७३ वर्षे सुरू असलेले 'नवभारत' मासिक. १९४७ सालच्या ऑक्टोबर महिन्यात शंकरराव देव यांनी हे मासिक सुरू केले. समाजाला विचारप्रधान साहित्य देणारे 'नवभारत' हे महत्त्वाचे मासिक आहे.

'परंपरेने चालत आलेल्या विद्यांचे अध्ययन आणि अध्यापन प्राज्ञपाठशाळा करत असली, तरी तेथील अभ्यासक परंपरेचे परिष्करणही करीत असतात. हिंदू धर्मात वेळोवेळी सुधारणा झाल्या असून आताही होणे आवश्यक आहे. यातूनच पाठशाळेतील विद्वानांनी 'धर्म निर्णय मंडळ' स्थापन केले. निरनिराळ्या संस्कारांत सोपेपणा कसा आणता येईल, त्यासंबंधीचे नियम तयार केले. अनेक कालबाह्य रूढी आणि रिवाज बंद व्हावेत, यासाठी प्रसार केला,' असे प्राज्ञपाठशाळा मंडळाचे सहसचिव अनिल जोशी सांगतात.

**मौलिक ग्रंथसंपदा**

पाठशाळेचा आणखी एक उपक्रम म्हणजे उत्कृष्ट ग्रंथांचे प्रकाशन. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या प्राज्ञपाठशाळा मंडळाने प्रसिद्ध केल्या. डॉ. सुमंत मुरंजन यांचा 'पुरोहितवर्ग वर्चस्व आणि भारताचा सामाजिक इतिहास' हा एक अजोड ग्रंथ आहे. 'बौद्धधर्माचा अभ्युदय आणि प्रसार,' हे प्रा. डॉ. प. ल. वैद्य यांचे पुस्तक, 'चार्वाक-इतिहास आणि तत्त्वज्ञान' हे सदाशिवराव आठवले यांचे पुस्तक आणि प्रा. मे. पुं. रेगे लिखित 'ईहवाद आणि सर्वधर्मसमभाव' पुस्तके, ही प्रकाशने मराठीतील वैचारिक लिखाणाचे मानदंड आहेत. तशीच आणखी दोन पुस्तके म्हणजे गंगाधर वामन लेले यांचे 'प्रस्थानभेद' आणि डॉ. म. अ. मेहेंदळे यांचे 'प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती'. पाठशाळेने भारतीय परंपरा, संस्कृती आणि वेगवेगळ्या ज्ञानशाखा यांची चिकित्सा करणारे अनमोल, मौलिक ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत.

संस्थेतर्फे दरवर्षी नवरात्रात 'सरस्वती-उत्सव' साजरा करण्यात येतो. तेथे तीन दिवस नामांकित अभ्यासकांची व्याख्याने होतात. तसेच पाठशाळेतर्फे दरवर्षी चर्चासत्र, अभ्यास शिबिरे आणि विशेष व्याख्याने आयोजित केली जातात.

- अविनाश कवठेकर

*सन १९१७ मध्ये लोकमान्य टिळक यांनी प्राज्ञपाठशाळेस भेट दिली होती. लोकमान्यांना प्राज्ञपाठशाळेचे अध्यक्ष स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या हस्ते मानपत्र देण्यात आले.*

**संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?**

***प्राज्ञपाठशाळा मंडळ***

*वाई (जि. सातारा) येथे मध्यवर्ती भागातील गंगापुरी परिसरात प्राज्ञपाठशाळेचे कार्यालय आहे. पुणे-कोल्हापूर महामार्गावरून सुरूर फाटा येथून वाईला जाता येते. पुणे-वाई एसटी सेवाही आहे.*

***PRAJNAPATHASHALA MANDAL** या नावाने धनादेश काढावा.*

# जीवनशाळा : लड़ाई, पढ़ाई साथ साथ...

नर्मदा नदीवरील सरदार सरोवर धरणामुळे या राज्यांतील आदिवासी मोठ्या प्रमाणात विस्थापित होऊन त्यांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला. या आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांच्या नेतृत्वाखाली १९८५ साली 'नर्मदा बचाव आंदोलन' सुरू करण्यात आले. आंदोलनाची दिशा निश्चित होत गेली तसतशी स्थानिक प्रश्नांची व्यापकता मेधाताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षात आली. त्यातील महत्त्वाचा प्रश्न म्हणजे नर्मदा खोऱ्यातील शिक्षणाचा अभाव आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या असंख्य समस्या!

नर्मदा खोऱ्यात शाळा होत्या, पण फक्त कागदोपत्री. सरकारला शाळाअस्तित्वाचे पुरावे दाखविण्यापुरती शाळेच्या पटावर खोटी विद्यार्थीसंख्या दाखवली जात असे. नर्मदा खोऱ्यातील लोकांपर्यंत शिक्षण पोहोचावे याबाबत ना सरकार उत्सुक, ना सरकारी अधिकारी, ना शिक्षक. हा गैरप्रकार लक्षात आल्यावर मेधाताईंनी त्याविरोधात गावकऱ्यांसोबत आंदोलन सुरू केले. त्यामुळे या शिक्षकांवर कारवाई करण्यात आली. परंतु शाळा सुरू करण्याबाबत मात्र सरकारी यंत्रणा उत्सुक नव्हत्या. नर्मदा खोऱ्यातील लोकांना अज्ञानाच्या गर्तेतून बाहेर काढायचे तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, या विचारातूनच 'जीवनशाळा' या संकल्पनेचा जन्म झाला.

जीवनशाळेची सुरुवात झाली ती १९९२ साली नंदुरबारमधील चिमलखेडीपासून! शाळा सुरू केली तेव्हा गावात दोन टक्केही साक्षरता नव्हती. पण काही वर्षांतच जीवनशाळेने हे चित्र पालटून टाकले. नदीकाठच्या माळावर शाळा सुरू झाली. आदिवासी समाजाकडून मेधाताईंना चांगला प्रतिसाद मिळाला. हळूहळू महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरात या तीनही राज्यांमध्ये जीवनशाळा उभ्या राहिल्या.

१९९३–९४ सालची गोष्ट. चिमलखेडीची पहिली जीवनशाळा जुगलाडाया यांच्या झोपडीत भरली होती, त्यात पाणी शिरले. पाणी गळ्यापर्यंत आले तशी ही मुले शाळेच्या छतावर जाऊन बसली, पण तिथून हटायला तयार नव्हती. शेवटी पोलिसांनी जबरदस्तीने त्यांना तिथून हलवले. ही मुले या जीवनशाळेशी खूप एकरूप झाली होती याचंच हे उदाहरण. ही शाळा बुडाल्यानंतर पुढे शाळेच्या नव्या जागेसाठी दोन महिने तहसीलदार कार्यालयासमोर धरणं धरलं. मग ती शाळा धरणापासूनचं पहिलं गाव मणिबेलीत भरवली गेली. जीवनशाळा चालवायची तर त्याचा नीट आराखडा हवा. म्हणजे मुलांच्या शिक्षणालाही एक शिस्त येईल, हे मेधाताई जाणून होत्या. त्यासाठी त्यांनी अनिल सदगोपाल, कृष्ण कुमार (एनसीआरटीचे प्रमुख) या दिल्ली विद्यापीठातल्या प्रोफेसरांना बोलावून शिक्षणाच्या आराखड्याबाबत चर्चा केली. यात स्थानिक ग्रामस्थांचाही सहभाग होता, हे विशेष! या चर्चेत स्थानिक गावाचा इतिहास, शिक्षणासाठीचे भाषेचे माध्यम, स्थानिक शेती, जंगल, आपल्या हक्कांसाठी आंदोलनातील सहभाग यावर विचार झाला. या शाळांसाठी दोन पुस्तकंही तयार करण्यात आली. आदिवासींच्या पौराणिक कहाण्यांवरचं- 'आमऱ्या काण्या' (आमच्या कहाण्या) हे पावरी भाषेतलं पुस्तक, 'अक्षरान् ओळखाण' म्हणजे अक्षरओळख- ज्यात 'क' कमळ असे न शिकवता 'क' - कुकडा म्हणजे कोंबडा असं स्थानिक ओळख सांगणारे शिक्षण दिले जाते. जीवनशाळांसाठी शिक्षणतज्ज्ञ लीलाताई पाटील, फलटणच्या मॅक्सिस्सन मावशी यांच्याकडून शिक्षकांना प्रशिक्षण दिले गेले. याकामी अक्षरनंदनसारख्या शाळांकडूनही खूप मदत झाली. आज महाराष्ट्रात सात आणि मध्य प्रदेशात दोन अशा एकूण नऊ जीवनशाळा आहेत.

या शाळांना सरकारी मान्यता मिळावी यासाठी खूप प्रयत्न केले गेले. अथक लढ्यानंतर २०१३ साली या शाळांना सरकारी मान्यता मिळाली खरी; पण विनाअनुदान या तत्त्वावर. 'स्वयं अर्थसाहाय्य' या नावाखाली ना मानधन, ना विद्यार्थ्यांसाठी माध्यान्ह भोजन, ना पाठ्यपुस्तके, ना शैक्षणिक साहित्य! तरीही जीवनशाळेचा आलेख चढाच राहिला आहे. मात्र योगिनी खानोलकर, गीतांजली चव्हाण, विजय वळवी, जीवनशाळेची संयोजिका लतिका राजपूत, चेतन साळवे, सियाराम, खेमसिंग, ओरसिंग पटले, शिक्षक, आदिवासी युवा यांच्या अथक मेहनतीशिवाय जीवनशाळेचा प्रवास शक्य नाही. हे सारे अपुऱ्या मानधनावर काम करतात. ही माणसे मेहनतीने सामाजिक बांधिलकी पार पाडतात. कविता भागवत, शिल्पा बल्लाळ जीवनशाळेसाठी तळमळीने मदत करतात. विश्वस्त विजया चौहान, परवीन जहांगीर यांचा इथे आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. या साऱ्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना साथ लाभते ती दात्यांची. सध्या शाळेत एकूण ९६५ मुले शिकत आहेत. ६६ शिक्षकेतर कर्मचारी आहेत.

हा भाग करोनाबाधित नसल्याने अलीकडेच जीवनशाळांमधील शिक्षण सुरू झाले आहे. या शाळेमुळे नर्मदा बचाव आंदोलनाला एक वेगळी दिशा दिली हेही मेधाताई मान्य करतात. गेल्या अठ्ठावीस वर्षांत जीवनशाळेतून आतापर्यंत पाच हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी 'जीवनशाळा'सारखे प्रयोग महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. अशा प्रयोगांना आर्थिक बळ मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

– लता दाभोळकर

**संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?**

*नर्मदा नवनिर्माण अभियान,*
*मैत्री निवास, टेंभेवाडी,*
*काकावाडीच्या मागे, तालुका धडगाव,*
*जिल्हा नंदुरबार- ४२५४१४.*

***Narmada Navnirman Abhiyan***
*या नावाने धनादेश काढावा.*

# लोकशाहीचा जागर

पालघर जिल्ह्यातील जव्हार, विक्रमगड, मोखाडा आणि नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सुमारे २०० आदिवासी पाड्यांवरील माणसं त्यांचं आयुष्य बदलू शकणारे कायदे समजून घेत आहेत. शासकीय यंत्रणांसमोर ठामपणे आपली बाजू मांडायला शिकत आहेत. कायद्याची भाषा आत्मसात करून शासकीय यंत्रणांशी त्याच भाषेत बोलत आहेत. हा बदल झाला तो तेथे १२ वर्षे सुरू असलेल्या 'वयम्' संस्थेच्या लोकचळवळीमुळे.

मिलिंद थत्ते आणि दीपाली गोगटे या दोघांनी जव्हारमधील आदिवासी पाड्यांवर २००८ च्या आसपास काम करायला सुरुवात केली. कोणतीही विचारधारा अथवा झेंडा खांद्यावर न घेता लोकशाहीने दिलेली ताकद पूर्ण क्षमतेने वापरणे हाच मूलभूत विचार त्यांनी मध्यवर्ती ठेवला. त्यामुळे 'वयम्' चळवळ या मातीत जन्माला आली, रुजली, फुलली. 'प्रश्न लोकांचे, शक्ती लोकांची आणि मार्ग चळवळीचे' हे सूत्र कार्यकर्त्यांना त्यातूनच सापडत गेले. विनायक थाळकर, प्रकाश बरफ या कार्यकर्त्यांच्या आधाराने चळवळ आता रुजलेली दिसते.

कायदे प्रभावीपणे अमलात आल्याचे अभावानेच दिसते. त्यामुळे ज्यांच्यासाठी कायदा झाला, त्यांनाच त्याची सर्वंकष माहिती देणे, सक्षम करणे आणि अडचणीच्या वेळी त्यातून वाट दाखवणे हाच मार्ग असल्याचे या कार्यकर्त्यांनी पक्के केले. त्यामुळे 'वयम्' ही संस्था न राहता आदिवासींची त्यांच्या विकासासाठीची त्यांची स्वतःची चळवळ झाली.

कायद्याने दिलेले हक्क वापरण्यासाठी छोटे छोटे टप्पे आखले. या टप्प्यांवर मिळालेले यश अनुभवताना पुढचे धडे दिले. हे ज्ञान सर्वांना मिळावे यासाठी दरवर्षी निवासी प्रशिक्षणे होतात. कायदे, संबंधित शासन निर्णय मुळातून शिकवले जाते. 'पेसा', वित्त आयोग यांनी दिलेला हक्काचा निधी, आमच्याच पाड्यावर, आमच्याच इच्छेने खर्च होतो की नाही, हे तपासण्यासाठी काही गावे प्रशासनाशी चर्चा करायला शिकली. सरकारी कचेरीत योग्य तो कागद नेला की काम होते याची जाणीव त्यांना चळवळीमुळे होऊ लागली. या प्रक्रियेत आदिवासींनी कमालीची चिकाटी दाखवत पाठपुरावा केला. त्यामुळेच 'लोकसहभागातून विकास' हे शब्द इथल्या पाड्यांवर प्रत्यक्षात साकारताना दिसतात.

पिढ्यानपिढ्या कसत आलेल्या वनजमिनीवर हक्क देणारा 'वनहक्क कायदा' २००६ साली आला. त्यासाठीचे दावे करायला शिकवणे हे किचकट काम होतेच; पण त्याहूनही अवघड होते शासन–प्रशासनाला कायदा शिकवणे. आदिवासींसाठी प्रशिक्षण वर्ग सुरू झाले. जिल्हास्तरापासून ते राज्यस्तरीय अधिकाऱ्यांपर्यंत थेट धडक मारत, तर कधी आंदोलनातून लोकशक्तीची जाणीव करून देत हा लढा सुरू आहे. एका आंदोलनात एकाच दिवसात २,०५१ दावे सादर करण्यात आले. या समन्वय आणि सहकार्यातून चळवळीची शासकीय यंत्रणांनाही मदत झाली. परिणामी एक वर्षात त्यातील चौदाशे दावे पूर्णतः मंजूर झाले. यातूनच मग पुढे पाच तालुक्यांतील चार हजारांहून अधिक आदिवासी शेतकऱ्यांपर्यंत वनहक्क कायद्याने हक्क पोहोचले.

जैविक संपदा सांभाळण्यासाठी जंगलाचे रक्षण व अभ्यास ग्रामसभांनी करावा यासाठी आदर्श अशा लोकजैवविविधता नोंदवह्या तयार झाल्या. रानभाजी महोत्सवातून जंगलाचा अभ्यास रंजक झाला. हा अधिकार आदिवासी स्वशासन (ग्रामपंचाय तरतुदी अनुसूचित विस्तारित क्षेत्र) कायद्याने डिसेंबर १९९६ साली मिळाला. त्याची नियमावली २०१४ मध्ये लागू झाली. ग्रामपंचायत स्तरावरची निर्णयप्रक्रिया अनुसूचित क्षेत्रात पाडास्तरापर्यंत नेणारा हा पेसा कायदा. पेसामुळे प्रत्येक पाड्याचे स्वतंत्र अस्तित्व जपले जाते. सध्या पाच ते दहा पाड्यांची एक ग्रामपंचायत आहे. पेसामध्ये प्रत्येक पाड्यात ग्रामसभा गठित करता येते. याच तरतुदीनुसार मग ४६ ग्रामसभा कार्यरत झाल्या. सुमारे अडीच हजारांहून अधिक लोकांनी तत्कालीन आदिवासी मंत्र्यांना 'आमचा कारभार आजपासून आम्हीच करणार.' असे प्रत्यक्ष निवेदन दिले. यापैकी २५ पाडे अतिशय सक्षमपणे गेली दोन वर्षे दरमहा ग्रामसभांच्या माध्यमातून पाड्यांचा कारभार सांभाळत आहेत.

इतके दिवस ग्रामपंचायत ठरवेल तेवढाच लाभ पाड्याला मिळत असे. पण आता 'पेसा' निधी थेट पाड्यांतील ग्रामसभांच्या बँक खात्यात येऊ शकत होता. पाड्यामध्ये त्याचा कसा वापर करायचा हेदेखील ठरविण्याचा अधिकार ग्रामसभेलाचा आहे. त्यामुळे निधीचा निगुतीने वापर होऊ लागला. उदाहरणच द्यायचे तर, केवळ ३३ हजार रुपयांच्या निधीत पाड्यासाठी दहापेक्षा अधिक महत्त्वाची कामे मार्गी लागली.

पंचायतीत आलेला इतर निधी कशासाठी वापरायचा हे सांगण्याचा हक्कदेखील ग्रामसभेला आहे. स्वतः पारदर्शी ग्रामसभा ग्रामपंचायतीला विचारू लागल्या, तुम्हीपण पंचायतीचा हिशोब जाहीर करा. त्याला प्रतिसाद मिळेना म्हणून मग थेट माहितीच्या अधिकाराचा सत्याग्रहच करण्यात आला. त्यासाठी १३ पाड्यांतल्या ३९२ आदिवासींनी तीन वर्षांपूर्वी माहितीचा अधिकार वापरला. यामुळे व्यवस्थेला, यंत्रणेला प्रश्न विचारण्याचा आत्मविश्वास आदिवासींमध्ये निर्माण झाला. वयम् संस्थेचे सर्व पदाधिकारीही पाड्यांवरील कार्यकर्तेच आहेत. गावोगावचे असंख्य कार्यकर्ते ही वयम्ची खरी संपत्ती आहे.

– सुहास जोशी

**संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?**

*'वयम्' लोकशाही जागर केंद्र,*
*जांभूळविहीर, ता. जव्हार.*
*जि. पालघर पिन ४०१ ६०३.*
*मुंबईहून सुमारे १४० किमी.*
*नाशिकहून ७९ किमी.*

*Vayam या नावाने धनादेश काढावा.*

# प्राणिमात्रांचे 'करुणाश्रम'

वर्ध्याजवळचे 'करुणाश्रम' हे भूतदयेचे आदर्श उदाहरण आहे. भूचर, जलचर, उभयचर अशा सर्व प्राणिमात्रांना आणि पक्ष्यांना तेथे आश्रय दिला जातो. वर्ध्यापासून पाच किलोमीटरवरील पिपरी या गावात पाच एकरावर वसलेल्या करुणाश्रमात आज ३००हून अधिक प्राणी सुरक्षित जीवन जगत आहेत. देशभरात प्राणिमात्रांच्या संरक्षणासाठी झटणाऱ्या 'पीपल फॉर ॲनिमल्स' या संस्थेच्या कार्याची प्रचीती करुणाश्रमातून येते. याच संघटनेचे आशीष गोस्वामी यांनी उपजत प्राणीप्रेमातून हे प्राणी आश्रयस्थान साकारले.

बेवारस, जप्त केलेल्या, अपघातग्रस्त, बेकायदा पाळलेल्या, कत्तलखान्याच्या वाटेवर जाता जाता वाचवलेल्या प्राण्यांची देखभाल करुणाश्रमात केली जाते. बाबा आमटे यांनी दिलेला प्राणीसुरक्षेचा सल्ला अंगिकारून गोस्वामी यांनी १९९९ मध्ये संस्था स्थापन केली. मनेका गांधी यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारामुळे पाच एकरचा पट्टा 'करुणाश्रमा'साठी मिळाला. पावणेदोनशे गायी–बैल, म्हशी, उंट, घोडे, बदक, मोर, ससे, कुत्रे, मांजरी, हरीण, माकड, सर्कशीतील पोपट अशा प्राण्यांचा सांभाळ करुणाश्रमात केला जातो. त्यासाठी दररोज दहा हजार रुपयांचा खर्च येतो. पशुखाद्य, उपचार, देखभालीचा खर्च कसाबसा भागवला जातो.

मुंबईच्या 'समस्त महाजन' या संस्थेतर्फे महिन्याला एक ट्रक चारा पाठविला जातो. फळ विक्रेते खराब झालेली फळे देतात. त्यातून पक्ष्यांसाठी लागणाऱ्या फळांचा प्रश्न सुटतो. भाजी विक्रेत्यांकडे शिल्लक भाजीपाला मिळतो. जातो. निर्मल बेकरीच्या लतादीदी दररोज दोन गोणी ब्रेड पुरवतात. प्राण्यांच्या उपचारांसाठी एका पशुवैद्यकास महिन्याला सात हजार रुपये मानधन द्यावे लागते. सेवकांना गरजेपुरते मानधन देण्याचा खर्चही आहेच.

आश्रमाचे उत्पन्न आणि खर्चाबद्दल गोस्वामी सांगतात, ''खर्च भागवण्यासाठी लोकवर्गणी–देणगीच्या स्वरूपात काही मदत मिळते. आश्रमात तयार होणाऱ्या खताची विक्री करून त्यातून वर्षाकाठी तीन लाख रुपये मिळतात. अलीकडे पिकांवर फवारणीसाठी 'गोमय' वापरले जाते. त्यामुळे आश्रमातील गोमूत्र साडेतीन रुपये दराने विकले जाते. त्यातून काही उत्पन्न मिळते. परंतु उत्पन्नाचे ठोस साधन नसल्याने प्राण्यांचा सांभाळ करणे ही मोठी कसरत आहे. दैनंदिन खर्च भागवताना अडचणी येतात.''

करुणाश्रमातील काही पाहुणे खर्चीक ठरले आहेत. नांदेड येथून मूनलाइट सर्कशीतून तसेच अमरावतीच्या अमर सर्कशीतून जप्त करण्यात आलेले १२ आफ्रिकन ग्रे प्रजातीचे पोपट इथेच वास्तव्याला आहेत. त्यांचा रोजचा खर्च दोनशे रुपये आहे. पक्ष्यांमध्ये अतिशय बुद्धिमान समजली जाणारी ही प्रजाती आहे. तीस हजार शब्द स्मरणात ठेवण्याची या पक्ष्यांची क्षमता आहे. त्यांना दैनंदिन खाद्यासह जीवनसत्त्वयुक्त द्रव द्यावे लागते.

प्राण्यांचा सांभाळ करणे यापलीकडेही 'करुणाश्रमा'चे कार्य अधिक व्यापक आहे. त्याविषयी गोस्वामी म्हणतात, ''गडचिरोली पोलिसांनी नक्षलवाद्यांना अटक केल्यानंतर त्यांचे घोडे जप्त करण्यात आले. या घोड्यांची जबाबदारी कुणीच घेतली नाही. हे घोडे अखेर करुणाश्रमात आले.''

कत्तलखान्याकडे जाणाऱ्या गायी जप्त केल्यानंतर त्यांचा स्वीकार करण्यास गोप्रेमी संस्थाही टाळाटाळ करतात. अशा वेळी पोलीस आणि पालिका प्रशासन करुणाश्रमाकडे धाव घेतात. काठेवाडीच्या आश्रयातून भरकटलेल्या उंटांचाही इथेच सांभाळ केला जात आहे. गेल्या वर्षी बोर अभयारण्यातील पशूंना पाण्याचा तुटवडा जाणवू लागल्यावर करुणाश्रमानेच लोकवर्गणीतून पैसा उभा केला आणि कृत्रिम पाणवठे तयार करून वन खात्याला मदत केली होती.

आपत्कालीन परिस्थिती असो की अपघाती परिस्थिती असो संस्थेचा चमू प्राण्यांना वाचविण्यासाठी धाव घेतो. संकटप्रसंगी प्रशासनही संस्थेच्या चमूला पाचारण करते. संस्थेच्या वन्य प्राणी बचाव केंद्राला केंद्रीय चिडीयाघर प्राधिकरण आणि महाराष्ट्र प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची मान्यता आहे. बेवारस प्राण्यांचा सांभाळ करण्यासाठी भारतीय जीवजंतू कल्याण मंडळाची मान्यता मिळाली आहे, मात्र अनुदान नाही.

प्राण्यांसाठी सुसज्ज रुग्णालय उभारण्याचा संस्थेचा संकल्प आहे. सध्या तात्पुरत्या स्वरूपाचे औषधोपचार, लहान शस्त्रक्रिया, निगा राखण्याची सोय संस्थेकडे आहे, मात्र प्राण्यांसाठी अतिदक्षता विभाग, अद्ययावत पिंजरे, मोठ्या शस्त्रक्रियेची सुविधा, क्ष–किरण यंत्रे, कृत्रिम श्वसन यंत्रणा इत्यादी सोयीसुविधांची आवश्यकता आहे. उकीरड्यावर मिळेल ते भक्षण करणाऱ्या बेवारस गायींच्या पोटातून शस्त्रक्रिया केल्यावर प्लास्टिक निघते. हात-पाय तुटलेल्या माकडाला उपचार साधनांअभावी अपंगावस्थेत जगावे लागते. त्यामुळे प्राण्यांसाठी सुसज्ज रुग्णालयाची गरज आहे. केवळ डोळ्यांतून, विव्हळण्यातून आणि ओरडण्यातून आपले दुःख, वेदना आणि भावना व्यक्त करणाऱ्या मूक जीवांचे जगणे सुसह्य करण्यासाठी सुसज्ज रुग्णालय उभे करण्याची धडपड संस्था करीत आहे. त्या धडपडीला समाजातून हात हवा आहे.

– प्रशांत देशमुख

**संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?**

*करुणाश्रम, पीपल फॉर ॲनिमल्स, पिपरी मेघे, जि. वर्धा, ४४२००१.*

***People for Animals, Karunashram, Wardha* या नावाने धनादेश काढावा.**

# बौद्धिक अक्षम मुलांचा आधार

बौद्धिकदृष्ट्या अक्षम मुलांकडे पाहण्याचा पालक आणि समाजाचा दृष्टिकोन बराचसा नकारात्मक असतो. अशा मुलांच्या पंखांना बळ देण्याचे काम पेणमधील 'सुहित जीवन ट्रस्ट' ही संस्था करते. शहरांमध्ये बौद्धिक अक्षम मुलांसाठी शाळा असतात, पण ग्रामीण भागात मात्र त्यांची वानवा असते. ही बाब लक्षात घेऊन पेण येथे २००४मध्ये डॉ. सुरेखा पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'सुहित जीवन ट्रस्ट'ची स्थापना केली. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी पेण तालुक्यातील गावागावात जाऊन मुलांचे सर्वेक्षण केले. त्यातून मानसिकदृष्ट्या अक्षम असलेली १७० मुले आढळली. त्यावेळी बौद्धिक अक्षम ही संकल्पना फारशी प्रचलित नव्हती. यामुळे अशा मुलांना 'वेडे' ठरवून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे संस्थेच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आले. त्याच क्षणी या मुलांसाठी विशेष शाळा सुरू करण्याचा निर्णय डॉ. पाटील यांनी घेतला.

पेण शहरातील महाडिक चाळीत दोन खोल्या भाडेतत्त्वावर घेऊन सुमंगल विद्यालय सुरू करण्यात आले. मानसिकदृष्ट्या अपंग आणि बहुविकलांग विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेली रायगड जिल्ह्याच्या निमशहरी भागातील ही पहिलीच शाळा होती. सर्वेक्षणात आढळलेल्या १७० बौद्धिक अक्षम मुलांपैकी केवळ १० मुलांनीच शाळेत प्रवेश घेतला. पण त्यांना शाळेत आणणे आणि परत घरी नेणे ही पालकांपुढील मोठी अडचण होती. ती लक्षात घेऊन शाळेने विद्यार्थ्यांसाठी मोफत बससेवा सुरू केली. गावागावांत जाऊन विद्यार्थ्यांना शाळेत आणणे सुरू झाले. त्यांचे प्रशिक्षणही सुरू झाले. हळूहळू विद्यार्थ्यांच्या वागण्या–बोलण्यात पालकांना फरक जाणवू लागला. त्यामुळे शाळेबद्दल आणि संस्थाचालकांबद्दल विश्वास दृढ होत गेला.

समाजाचा या विद्यार्थ्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. १५ ऑगस्टला झालेल्या एका सार्वजनिक कार्यक्रमात या शाळेतील विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा सहभाग घेतला आणि कार्यक्रम सादर केला. मानसिकदृष्ट्या विकलांग विद्यार्थी म्हणजे मनोरुग्ण नाहीत याची जाणीव त्यांना झाली. हळूहळू शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. आज अलिबाग, पेण, उरण, रोहा या तालुक्यांच्या ४४ गावांमधील १५० विद्यार्थी शाळेत नियमित शिक्षण घेत आहेत. संस्थेत १० विशेष प्रशिक्षित शिक्षक आणि १० कर्मचारी आहेत. ८० टक्के विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि प्रशिक्षण दिले जाते. एक वेळचे जेवणही शाळेतून मुलांना दिले जाते.

मंगलदास ठाकूर, विशांत नाईकडे, वरुण पाटील, श्रीकृष्ण गोडबोले, एम आर सुंदरेश्वर यांनी संस्थेच्या वाटचालीत मोठे योगदान दिले. भाड्याच्या दोन खोल्यांमधून सुरू झालेले संस्थेचे काम आज विस्तारले आहे. संस्थेच्या कार्याची दखल घेऊन शासनाने संस्थेसाठी पेण शहरातील चिंचपाडा येथे ३३ गुंठे जागा दिली आहे. 'एम्पथी फाऊंडेशन'ने शाळेसाठी भव्य इमारत बांधून दिली.

**संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?**

***सुहित जीवन ट्रस्ट***
*दामोदरनगर, चिंचपाडा,*
*आगरी समाज हॉलजवळ,*
*तालुका पेण, जिल्हा रायगड,*
*महाराष्ट्र. पिन कोड ४०२१०७.*

***Suhit Jeevan Trust***
*या नावाने धनादेश काढावा.*

संस्थेच्या एकलव्य व्होकेशनल केंद्रात १८ ते ४५ वयोगटातील विशेष युवक आणि युवतींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण दिले जात आहे. २०१० मध्ये सुरू करण्यात आलेल्या या प्रशिक्षण केंद्रात ७५ प्रशिक्षणार्थी आहेत. त्यांना राख्या, दिवाळीत पणत्या, शोभेची फुले, गणपती, कापडी पिशव्या, मेणबत्त्या, पापड इत्यादी उत्पादने तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. विद्यावेतनही दिले जाते. येथून प्रशिक्षित झालेले विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहिले आहेत.

विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षक घडवण्यासाठी संस्थेने लाइट हाऊस स्पेशल टीचर्स ट्रेनिंग सेंटर सुरू केले. 'रिहॅबिलिटेशन काऊन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली'च्या मान्यतेने तज्ज्ञ शिक्षक तयार करण्याचे काम सुरू आहे. आजवर १५६ शिक्षकांनी प्रशिक्षण घेतले आहे.

बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांवर लहानपणापासूनच उपचार करणे आवश्यक असल्याने ० ते ६ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी 'पालवी शीघ्र हस्तक्षेप केंद्र' सुरू करण्यात आले. तेथे मानसोपचारतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, स्पीच थेरपिस्ट, ऑक्युपेशनल थेरपिस्ट आणि फिजिओ थेरपिस्ट यांच्यामार्फत बालकांवर निःशुल्क उपचार सुरू करण्यात आले.

संस्थेचे सर्व उपक्रम शासन मान्यतेने राबविले जातात, एकाही उपक्रमाला शासनाकडून अनुदान वा मदत मिळत नाही. खासगी कंपन्या, सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींच्या मदतीवर संस्थेचे कार्य सुरू आहे.

करोनाच्या साथीमुळे देशभरात टाळेबंदी लागू झाली. परिणामी आर्थिक मदतीचा ओघ आटला. मुलांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांशी ऑनलाइन संपर्क आणि संवाद उपक्रम सुरू केला. आता इतर मुलांप्रमाणे ही मुलेही ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेत आहेत. या विशेष मुलांच्या शिक्षणाबाबत शासनस्तरावर अजूनही उदासिनता आहे. आजही सामाजिक संस्थाच्या मदतीने विशेष मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यांना शासनाचे पाठबळ मिळणेही आवश्यक आहे.

निरनिराळ्या क्षेत्रातील मंडळी एकत्र येऊन संस्थेसाठी निरपेक्ष भावनेने कार्यरत आहेत. तेच संस्थेचे मुख्य संचित आहे. ही मुले काहीशी दुबळी असली तरी ती परिस्थितीपुढे हतबल होत नाहीत. त्यांना सहानुभूतीची नाही तर प्रोत्साहन देऊन लढ म्हणण्याची आवश्यकता आहे.

– हर्षद कशाळकर

# संगीतसाधनेचा पारिजातक

भारतीय संगीतातील गंगोत्री समजल्या जाणाऱ्या ग्वाल्हेरला महाराष्ट्रातील अनेक कलावंत गेले. त्यांच्यापैकी परत आलेल्या पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांनी महाराष्ट्रात लावलेले संगीताचे झाड बहरले. त्याने संगीतसुरांना ज्ञानाची जोड दिली. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ संगीतसाधनेचे कार्य करणाऱ्या 'पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर संगीत साधना मंडळा'च्या वास्तुनिर्मितीची कहाणीही 'पुल'कित करणारी आहे.

इचलकरंजी येथे १९७४ साली झालेल्या सुवर्णमहोत्सवी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात पु. ल. देशपांडे यांनी इचलकरंजीत पं. बाळकृष्णबुवा यांचे स्मारक नसल्याची खंत व्यक्त केली होती. ती गोष्ट इचलकरंजीकरांनी मनावर घेतली आणि पाहता पाहता स्मारक उभारणीला वेग आला.

शं. बा. माळी मास्तर यांनी संगीत साधना मंडळाला जागा दिली. पु. मा. रानडे यांनी ५१ हजार रुपये वास्तू उभारणीसाठी दिले. त्यानंतर कलाप्रेमीच्या देणगी देण्यासाठी रांगा लागल्या. सकळांच्या प्रयत्नांना यश आले आणि संगीताची सेवा करणारे एक सुसज्ज – संपन्न दालन आकाराला आले.

पं. बाळकृष्णबुवा यांच्या ५२ व्या पुण्यतिथीनिमित्त ९ फेब्रुवारी १९७९ रोजी या वास्तूचे उद्घाटन झाले. स्वर आणि लयीचा पारिजातक 'पंडित बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर संगीत साधना मंडळा'त फुलला. तो वर्षानुवर्षे संगीतप्रेमींवर सुरेल स्वरांचा शिडकावा करीत आहे. पं. बाळकृष्णबुवा मूळचे इचलकरंजीजवळच्या चंदूर गावचे. वयाच्या दहाव्या वर्षी पोरक्या बाळकृष्णने संगीत शिकण्याच्या ध्यासाने मजल–दरमजल करत ग्वाल्हेर गाठले. तिथे हद्दु – हस्सु खाँ यांचे शिष्य पं. वासुदेवराव जोशी यांच्याकडे त्यांनी गुरुसेवा करून ख्याल गायकीचे ज्ञान मिळवले. त्यानंतर मुंबईला येऊन संगीत विद्यालय सुरू केले.

पं. बाळकृष्णबुवांनी मग सातारा, औंध, मिरजेत वास्तव्य केले आणि शेवटी १९०० सालापासून आयुष्याच्या अखेरपर्यंत सलग २५ वर्षे ते इचलकरंजीचे संस्थानिक श्रीमंत नारायणराव घोरपडे यांच्याकडे राजदरबारी गवई म्हणून संगीतसेवा करत राहिले. गायनाचार्यांनी म्हैसूर, मुंबई, कोलकाता, दिल्ली, लाहोर असे दौरे करून अस्सल गायकीच्या दिमाखाने दिग्गजांना दिपवले. भारतभर त्यांच्या नावाचा विलक्षण दबदबा निर्माण झाला होता. कलेचा अमोल ठेवा त्यांनी मुक्तहस्ताने शिष्यवर्गाला विनामोबदला दिला.

अखिल भारतीय कीर्तीच्या संगीत सम्राटाचे निर्वाण होऊन दीर्घकाळ लोटला होता. त्यांची पुण्यस्मृती चिरंतन ठेवण्याच्या दिशेने १९६५ सालादरम्यान पावले पडू लागली. संगीत क्षेत्रातील मंडळी पं. बाळुबुवा हजारे यांच्या घरी जमत असत. तेव्हा पं. द. वि. काणे बुवा यांनी पं. बाळकृष्णबुवांच्या नावाचे मंडळ सुरू करण्याचा विचार बोलून दाखवला. त्यानंतर १९६७ मध्ये पंडित बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळ स्थापन झाले. पुढे पु. ल. देशपांडे यांच्या सूचनेनुसार अमूर्त कल्पनेपासून सुरू झालेला बुवांच्या स्मारकाचा प्रवास स्मृती मंदिराच्या साकार शिल्पापर्यंत सुफळ झाला. अनेक उपक्रम या वास्तूमध्ये होत राहिले. नव्या उमेदीने कार्य करणारे सदस्य पुढे आले. ख्यातनाम गायक पं. द. वि. काणे यांनी आपल्या दरबारी गायकांच्या स्मरणार्थ बाळकृष्णबुवांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम सुरू केला. संगीत शिक्षक, कीर्तनकार प्रभाकरबुवा शेंडे यांनी आपले संगीत शिकवणीचे वर्ग बंद करून मंडळात विनामूल्य वर्ग सुरू केले. आज या शिक्षणवर्गात सुमारे १५० विद्यार्थी शिक्षण घेत असतात. तसेच परिसरातील तीनशे ते साडेतीनशे विद्यार्थी संगीत परीक्षा देतात.

प्रारंभी सदस्य ३५ रुपये वार्षिक वर्गणी काढून कार्य चालवत. इचलकंरजीतील सहकारी संस्थांही मदतीचा हात देतात. इचलकरंजीचे श्रीमंत आबासाहेब घोरपडे सरकार, दत्ताजीराव कदम, आबासाहेब खेबुडकर, कल्लाप्पाण्णा आवाडे आदी मंडळींनी आर्थिक अडचण भासणार नाही याची काळजी वाहिली. या वास्तूला आता चाळीस वर्षे होऊन गेली. कालौघात संस्थेच्या गरजा आणि लोकांची जीवनशैली बदलली आहे. त्यानुसार वास्तूमध्ये काही बदल करणे गरजेचे झाले आहे. वास्तू बांधताना वर्तुळाकार प्रेक्षागृह बांधले होते. त्यामध्ये भारतीय बैठकीनुसार दीडशे रसिक बसू शकतात. पण सध्या अधिक आसनव्यवस्था गरजेची आहे. त्यामुळे मोठे प्रेक्षागृह बांधण्याचा संस्थेचा संकल्प आहे. शिकवणी वर्ग अपुरे पडत आहेत. चार वर्ग खोल्या बांधण्याचा संकल्प आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या वाद्यांची आवश्यकता आहे. बालवाद्यवृंद तयार करण्याकरिता वाद्यांची आवश्यकता आहे. यासाठी ३५ ते ४० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. नियोजित बांधकामाचा आराखडा तयार आहे. करोनामुळे हे काम थांबले आहे.

संस्थेने आजपर्यंतचे सर्व काम वर्गणीतून केले आहे. आजवर शासकीय मदत, अर्थसाहाय्य मिळालेले नाही. इतकी वर्षं निरपेक्ष भावनेने काम करणाऱ्या या संस्थेला हाती घेतलेले संगीतविषयक उपक्रम पूर्णत्वास नेण्यासाठी, संगीताची साधना अखंड सुरू ठेवण्यासाठी आर्थिक मदतीची गरज आहे, असे मंडळाचे अध्यक्ष अशोक सौदत्तीकर यांनी सांगितले.

– दयानंद लिपारे

### संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?

*कोल्हापूर किंवा सांगली येथून इचलकरंजी अंदाजे २७ कि.मी. आहे. एसटीने प्रवास करता येतो. मुख्य पोस्ट कार्यालय, मंगलधाम रस्ता इचलकरंजी (४१६११५) येथे संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय आहे.*

***Pandit Balkrishna Buva Sangit Sadhana Mandal***
*या नावाने धनादेश काढावा.*

# भिक्षेकऱ्यांच्या स्वावलंबनाचा ध्यास

डॉ. अभिजित सोनवणे यांनी अडचणीच्या काळात एका भिक्षेकऱ्याने केलेल्या मदतीचे ऋण फेडण्यासाठी गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडली आणि शहरातील मंदिरे, मशिदी, दर्ग्यांबाहेर बसणाऱ्या भिक्षेकऱ्यांवर मोफत उपचार सुरू केले. त्यांच्यापैकी काहींना लघुउद्योग सुरू करण्यासाठी सहकार्य करून त्यांच्या जगण्याला नवी दिशा दिली. त्यांनी पत्नी डॉ. मनीषा सोनवणे यांच्यासह स्थापन केलेल्या 'सोहम ट्रस्ट'ची 'डॉक्टर्स फॉर बेगर' ही मोहीम भिक्षार्थींसाठी संजीवनी ठरली आहे.

माणदेशातील म्हसवड (जि. सातारा) या मूळ गावातून वैद्यकीय शिक्षणासाठी अभिजित पुण्यात आले १९९९ मध्ये टिळक आयुर्वेद महाविद्यालयातून बीएएमएस झाले. शिवाजीनगर भागात डॉ. अभिजित आणि डॉ. मनीषा यांचा छोटा दवाखाना आहे. सुरुवातीच्या काळातील अडचणींविषयी ते सांगतात, ''वैद्यकीय पदवी घेतल्यानंतर घरच्यांकडे मदत मागायची नाही असं मी ठरवलं. खेडेगावात वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. दिवसाकाठी जेमतेम ३५ ते ४० रुपये मिळत. आर्थिक अडचणी होत्या. एका भिक्षेकरी कुटुंबाने तेव्हा मला अन्न आणि पैशाची मदत केली. मानसिक आधार दिला. त्यानंतर मला एका आंतरराष्ट्रीय कंपनीत नोकरी मिळाली आणि आयुष्यच बदलले. या नोकरीने मला पैसे आणि मानमरातब दिला, परंतु त्या भिक्षेकऱ्यांच्या ऋणातून मुक्त होण्याची इच्छा स्वस्थ बसू देईना. त्यामुळे १५ ऑगस्ट २०१५ रोजी नोकरीचा राजीनामा दिला आणि पुण्यातील मंदिरे आणि मशिदींच्या बाहेर बसलेल्या भिक्षेकऱ्यांवर मोफत वैद्यकीय उपचार सुरू केले.''

अनेक भिक्षेकऱ्यांनी डॉ. अभिजित यांच्यावर घरातल्यासारखे प्रेम केले. त्यामुळे उपचारानंतर त्यांना त्याच अवस्थेत न सोडता त्यांच्यासाठी काही करता येईल का, असा विचार त्यांनी केला. 'भिक्षेकरी ते कष्टकरी' असे परिवर्तन घडवून आणताना अनेकांना छोटे व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले. शनी मंदिरासमोरील भिक्षार्थींना शनीला वाहायला तेलाच्या पुड्या करून त्यांची विक्री करण्यास प्रोत्साहन दिले. ज्यांना हात-पाय नाहीत त्यांना चाकाच्या खुर्च्या घेऊन दिल्या. या खुर्चीवर बसून विक्री करण्यासाठी वस्तूही घेऊन दिल्या. बसून भिक्षा मागणाऱ्यांना बसूनच फुलं, भाजी, रुमाल आणि स्कार्फची विक्री करण्यास सांगितले. वृद्ध महिलांना गृहसंकुलांमध्ये मुले सांभाळण्याची कामे मिळवून दिली. काहींना हॉटेलमध्ये पोळ्या करण्याचे आणि भाज्या निवडण्याचे काम मिळवून दिले. कुणाला दाढी करण्याचा व्यवसाय सुरू करून दिला. काहींना एटीएम केंद्रांबाहेर रखवालदाराचे काम मिळवून दिले. आतापर्यंत ८५ भिक्षेकऱ्यांनी भिक्षाटन सोडले आहे. त्यांची कुटुंबे स्वावलंबी झाली आहेत.

डॉ. अभिजित तीन बॅगांमध्ये औषधे घेऊन मंदिराबाहेर रस्त्याच्या कडेला पदपथावरच अकरा ते तीन या वेळेत भिक्षेकऱ्यांवर उपचार करतात. तपासणी करून औषधे द्यायची, जखमांना मलमपट्टी करायची आणि आजार गंभीर असेल तर रुग्णाला रुग्णालयात दाखल करायचे, असे त्यांचे काम चालते. त्यांनी गेल्या पाच वर्षांत पुण्यातील अकराशेहून अधिक भिक्षेकऱ्यांवर मोफत औषधोपचार केले आहेत.

शहरातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यासाठी भिक्षेकऱ्यांची 'खराटा पलटण' स्थापन करण्याचा संस्थेचा मानस आहे. संत गाडगेबाबा ही या उपक्रमामागील प्रेरणा आहे. या खराटा पलटणीत काम करणाऱ्यांना मानधनही देण्यात येणार आहे. टाळेबंदी संपल्यानंतर ही 'खराटा पलटण' कार्यरत होईल.

सोहम ट्रस्टतर्फे ५५० भिक्षेकऱ्यांवर मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. ५४ लहान मुलांना भिक्षेकरी वृत्तीपासून परावृत्त करून त्यांचे पालकत्व घेऊन त्यांचे शिक्षण सुरू केले. रस्त्यावर अनेक वर्षे भिक्षा मागणाऱ्या १६ आजी-आजोबांना संस्थेने महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या वृद्धाश्रमांमध्ये निवारा मिळवून दिला आहे. डॉ. अभिजित यांनी वृद्धाश्रमात निधन झालेल्या चार ज्येष्ठांवर मुलाच्या नात्याने अंत्यसंस्कार केले.

भिक्षेकऱ्यांसाठी सोहम ट्रस्टतर्फे लवकरच नोकरी महोत्सव भरवण्यात येणार आहे. टाळेबंदी शिथिलीकरणानंतर काही व्यवसाय सुरू झाले असले तरी कामगारांची टंचाई आहे. दुसऱ्या बाजूला रस्त्यावर भिक्षेकऱ्यांची संख्या वाढली आहे. कामगारांची गरज असणाऱ्या व्यावसायिकांना कामगार कसे मिळवावे हे समजत नाही, तर कामाची गरज असणाऱ्यांना ते कसे मिळवावे, हे कळत नाही. नोकरी महोत्सवात या दोन टोकांना जोडण्याचा प्रयत्न असेल.

आता भिक्षेकऱ्यांसाठी एक व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा 'सोहम ट्रस्ट'चा संकल्प आहे. या केंद्रामध्ये कागदी पिशव्या, मेणबत्त्या, भेटवस्तू तयार करणे, शिवणकाम इत्यादी कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाईल. प्रशिक्षणार्थी भिक्षेकऱ्यांना विद्यावेतन देण्याचे संस्थेचे नियोजन आहे. प्रशिक्षणानंतर स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांना सर्व तऱ्हेची मदत करणे हे संस्थेचे ध्येय आहे. त्यासाठी किमान पाच गुंठे जागेची गरज आहे आणि ती घेण्यासाठी संस्थेला मदतीची आवश्यकता आहे.

- विद्याधर कुलकर्णी

**संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?**

***सोशल हेल्थ अँड मेडिसिन ट्रस्ट (सोहम)***
*फ्लॅट नं. २, शालिनी हाईट्स, शिरोळे गल्ली, शिवाजीनगर, पुणे ४११००५.*

***SOCIAL HEALTH AND (SOHAM) MEDICINE TRUST*** *या नावाने धनादेश काढावा.*

# सार्थक : परिवर्तनाचा आगळा प्रयोग

सर्वच शहरांमध्ये रस्त्याच्या कडेला, कचराकुंड्यांच्या अवतीभोवती, पदपथांवर किंवा सिग्नलजवळ भटकणारी, हाणामाऱ्या करणारी, भीक मागणारी, कचऱ्यातील वस्तू वेचणारी मुलं दिसतात. केंद्र सरकारच्या नोकरीतील बदलीमुळे २००१ साली पुण्यात आलेल्या डॉ. अनिल कुडिया यांना ही मुलं अस्वस्थ करून गेली. त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची प्रबळ इच्छा कुडिया यांच्या मनात होती. त्यांनी या मुलांशी, त्यांच्या पालकांशी संवाद साधायला सुरुवात केली. अर्थात आधी प्रतिसाद मिळालाच नाही, उलट अनेकांनी त्यांच्यावर संशयही घेतला. तरीही कुडिया नाउमेद झाले नाहीत. काही समविचारी मंडळींशी चर्चा करून, एकत्र येऊन २००९ मध्ये 'सार्थक सेवा संघ' या संस्थेची स्थापना केली.

पुण्याजवळ हांडेवाडी येथे एक सदनिका भाड्याने घेऊन सार्थक संस्थेचे काम सुरू झाले. सुरुवातीला चार मुले होती. चारची अकरा मुले झाली. एकदा ती सगळी मुले पळून गेली. पुन्हा काही मुले परत आली. मग नंतर रहिवाशांच्या तक्रारींमुळे ती सदनिका सोडावी लागली. पुढे जागेचा शोध, नवी जागा मिळवणे यासाठीही खूप खटाटोप करावे लागले. कुडिया यांच्या लक्षात आले, की संस्थेला स्वतःची जागा हवी. त्यासाठी पुरंदर तालुक्यातील आंबळे या गावात त्यांनी स्वतःच ५० गुंठे जागा खरेदी केली आणि

संस्थेला दान केली. तेथे एक छोटेखानी घर बांधण्यात आले आणि वंचित, उपेक्षित मुलांचे एक मोठे कुटुंब कुडियांसह या घरात राहू लागले. मुलांची देखभाल करण्याची जबाबदारी कुमुदिनी खंडागळे ऊर्फ अक्का यांनी स्वीकारली. मुले रमली. शाळेची पायरीही न चढलेली ही मुले आणि मुली गावातील शाळेत जायला लागली. मुलामुलींची संख्या वाढू लागल्यानंतर वसतिगृहाची बांधणी करण्यात आली. मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच, वैद्यकीय सेवा, पोषक आहार, क्रीडा प्रशिक्षण, छोट्या स्वरूपात व्यवसायाभिमुख प्रशिक्षण, कौशल्य प्रशिक्षण असे अनेक उपक्रम संस्थेत सुरू आहेत. संस्थेच्या जागेत कबड्डीची दोन, क्रिकेटची दोन, फुटबॉलची दोन आणि खोखोचे एक अशी मैदाने आहेत. याशिवाय टेबल टेनिसची दोन टेबले आहेत. संस्थेच्या वसतिगृहात ४८ मुले आणि २८ मुली असे मिळून ७६ जण सध्या आहेत. साधारण पाच ते अठरा या वयोगटांतील मुले संस्थेच्या वसतिगृहात राहतात.

संस्थेत आलेली काही मुले फासेपारधी समाजातील आहेत, तसेच काही वेश्यावस्तीतील, तर काही झोपडपट्ट्यांमधील विस्कळीत कुटुंबातीलही आहेत. मुक्त जीवनातून संस्थेत आल्यानंतर साहजिकच काही जण पळूनही जातात. अशा वेळी कुडिया आणि संस्थेतील त्यांचे सहकारी या मुलांना परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात.

मुले उत्तमरीत्या फुटबॉल, क्रिकेट आणि अन्य खेळ खेळतात. याच उपक्रमाला पुण्यातील आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू सन्मय परांजपे याची कृतिरूप जोड मिळाली. त्यातून 'इंडिया खेलेगा' या उपक्रमात संस्थेतील आठ मुलांची निवड टेबल टेनिस प्रशिक्षणासाठी करण्यात आली. ही मुले पुण्यात टेबल टेनिसचे प्रशिक्षण अव्वल प्रशिक्षकांकडून घेत आहेत. या मुलांच्या निवासासाठी पुण्यात सदनिकेची वा घराची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी संस्थेने आवाहन केले आहे. खासगी स्पोर्ट्स क्लब सारख्या ठिकाणी या मुलांना भविष्यात क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यावर प्रशिक्षक, सहायक प्रशिक्षक, मदतनीस आदी अनेक प्रकारच्या नोकऱ्या मिळू शकतात. त्यासाठी खेळांचे प्रशिक्षण देणारी सुसज्ज क्रीडा अकादमी सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे.

वसतिगृहात अधूनमधून काही ना काही कामे होत असतात. त्यातून बांधकाम, प्लास्टरिंग, छोटे आरसीसी काम, कटिंग, ग्राइंडिंग, वेल्डिंग, लांबी भरणे, रंगकाम, प्लंबिंग, शेतीकाम अशा लहानसहान कामांचे शिक्षण ही मुले खुशीने घेतात. अशी कामे शिकता शिकताच मुलांनी संस्थेचे एक छोटे घर बांधले, त्यावर पत्रे बसवले, फरशा बसवल्या, रंगकामही केले. मुले शेतीकामही करतात. वसतिगृहात शिवणकाम प्रशिक्षण केंद्रही चालते. पाच शिवणयंत्रांवर मुलामुलींना शिवणकामाचे प्राथमिक धडे दिले जातात. त्यातून कापडी पिशव्या, फ्रॉक आणि अन्य कपडेही मुले शिवतात. काही मुले महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत. काहींनी छोटा व्यवसाय सुरू केला आहे, तर काही विद्यार्थी सार्थकमध्येच नोकरीस लागले आहेत.

संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान नाही. सरकारी मदतही नाही. संस्थेचे अगदी स्थापनेपासूनचे कार्य पूर्णपणे समाजाच्या मदतीवरच सुरू आहे. संस्थेचे अनेकविध नवे प्रकल्प आणि योजना सुरू करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे.

**संस्थेपर्यंत कसे पोहोचाल?**

***सार्थक सेवा संघ,***
*काळे मळा, आंबळे,*
*सासवड-यवत रस्ता,*
*पुरंदर, पुणे -४१२१०४.*

***Sarthak Seva Sangh,***
***Pune***
*या नावाने धनादेश काढावा.*

- विनायक करमरकर

response.lokprabha@expressindia.com

# मानवतेचे स्वयंसेवक

आरोग्य

अनुराधा मस्करेन्हस

कोविड १९ च्या महासाथीचा प्रादुर्भाव संपवण्यासाठी सगळ्या जगाच्या आशा ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या संभाव्य लसीवर आणि या लसीची चाचणी स्वतःवर करू देणाऱ्यांवर केंद्रित झाल्या आहेत. भारतात या कोविशिल्ड लसीच्या मानवी चाचण्यांचे स्वयंसेवक होण्यासाठी पुढे आलेल्या सहा जणांशी 'दि इंडियन एक्स्प्रेस'ने केलेली बातचीत –

तो दिवस होता २७ ऑगस्ट २०२०. तब्बल पाच महिने आणि चार दिवसांनंतर पुण्यातल्या एका फार्मास्युटिकल कंपनीचे ते ६४ वर्षीय वरिष्ठ अधिकारी त्यांच्या बंगल्याबाहेर पाऊल टाकत होते. इतक्या महिन्यांनंतर बाहेर जाताना घालतात ते कपडे त्यांनी घातले. हात स्वच्छ धुऊन मग हातमोजे घातले. एन ९५ मुखपट्टी चढवली. गॉगल घातला. त्यांची ५९ वर्षांची पत्नी, ४० वर्षांची मुलगी या दोघी आवरून तयार झाल्या. ते तिघेही जण त्यांच्या मोटारगाडीतून बंगल्याच्या गेटबाहेर पडले आणि पुण्यामधल्या भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज अँण्ड हॉस्पिटलच्या दिशेने निघाले. त्यांचा हा सगळा खटाटोप होता तो करोना विषाणूचा मुकाबला करण्यासाठी संशोधन सुरू असलेल्या लसीच्या मानवी चाचणीत सहभागी होण्यासाठी.

'अरे देवा, काय सांगू तुम्हाला? गेले कित्येक दिवस मी वाईट बातम्याच ऐकतो आहे.' ते वरिष्ठ अधिकारी सांगतात, 'माझ्या माहितीतले दोन आरोग्य कर्मचारी कोविडचा संसर्ग होऊन गेले. आत्ता इथे येताना आम्ही आमच्या गाडीमधला एसी बंद केला. सीट सॅनिटाइज केल्या. स्टीअरिंग व्हील निर्जंतुक केलं आणि एकमेकांचा स्पर्श होणार नाही असे लांब लांब बसलो.'

करोनाच्या महासाथीमुळे ते गेले काही महिने घरातच बसून असले तरी ऑक्सफर्ड- ॲस्ट्राझेनेका – कोविशिल्ड लसीच्या (कोविशिल्ड हे या लसीचे भारतातील नाव) दुसऱ्या तिसऱ्या टप्प्यातील चाचणीसाठी स्वयंसेवक हवे आहेत हे कळल्यावर त्यांना एक क्षणही घरी बसवलं नाही. आपण स्वयंसेवक व्हायचं याबाबत त्यांच्या मनात तिळमात्र संदेह नव्हता.

औषधनिर्मिती क्षेत्रातच काम करत असल्यामुळे त्यांनी अशा चाचण्या जवळून बघितल्या होत्या. त्यांच्या टीमने अशा अनेक संशोधन प्रकल्पांसाठी काम केलेलं होतं.

'मी ऑक्सफर्डच्या लसीसंदर्भात लॅन्सेटमध्ये प्रसिद्ध झालेलं संशोधन वाचलं आहे आणि त्यासंदर्भात

धोरणकर्ते तसंच डॉक्टरांशी बोललो आहे. हे सगळेचजण ऑक्सफर्डच्या लसीसंदर्भात आशावादी आहेत. त्याशिवाय परदेशात घेतल्या जाणाऱ्या अशा चाचण्या, त्यासंदर्भात पाळली जाणारी सुरक्षितता याबद्दल मी भरपूर वाचलेलं असल्यामुळे या लसीचा करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी उपयोग होईल असं मला वाटतं. त्यामुळे मी असा विचार केला की आपण ती टोचून का घेऊ नये?' ते सांगतात.

पत्नीला आणि मुलीलाही यासाठी तयार करणं त्यांना फारसं अवघड गेलं नाही. 'आता असं आहे की या सगळ्या प्रक्रियेत कुणीतरी पुढाकार घेणं, स्वतःहून लस टोचून घेणं गरजेचं आहे. आणि यामुळे मला घराबाहेर पडायला मिळणार असेल तर चला, टोचून घेऊ लस असा मी विचार केला.' टाळेबंदीमुळे त्यांच्याकडेच राहणारी त्यांची चाळिशीची मुलगी सांगते.

त्यांच्या आरटी- पीसीआर आणि रक्तचाचण्यांचे अहवाल एक दिवस आधीच आले. त्या तिघांच्याही शरीरात करोनाची प्रतिपिंडं तयार झालेली नाहीत, म्हणजे त्यांना आधीच करोनाचा संसर्ग होऊन गेलेला नाही

## मानवी चाचणीसाठी रांगा

- पुण्यामध्ये भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या तळमजल्यावर, नॉन कोविड विभागात, कान-नाक-घसा विभागात तसंच बालरोगतज्ज्ञांच्या ओपीडीजवळ कोविडच्या मानवी चाचण्यांचं केंद्र आहे. त्याच्या दारावर इंग्रजी तसंच मराठी भाषेत लावलेली नोटीस एवढंच सगळ्या देशाचं लक्ष लागून राहिलेल्या चाचण्यांचं हे केंद्र ओळखण्याची खूण आहे.
- ८३२ बेडची क्षमता असलेल्या भारती हॉस्पिटलमध्ये (त्यापैकी ३५० बेड्स कोविड रुग्णांसाठी राखून ठेवले आहेत.) आजवर ५० पेक्षा जास्त लसींच्या मानवी चाचण्या झाल्या आहेत. त्यांच्या या चाचण्या घेणाऱ्यांच्या १५ जणांच्या चमूमध्ये डॉक्टर्स, नर्सेस आणि वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश आहे. हे १५ जण या चाचण्या करणं, फोन घेणं, मेल पाठवणं, स्वयंसेवकांचं समुपदेशन अशी सगळीच कामं करताना दिसतात.
- अशा पद्धतीच्या मानवी चाचण्या घेणं आणि त्यासाठी भारती हॉस्पिटलकडे लक्ष वेधलं जाणं हे या संस्थेसाठी नवीन नसलं तरी या वेळी लोकांच्या अपेक्षा सगळ्यांनाच चक्रावून टाकणाऱ्या आहेत. हॉस्पिटलचे वैद्यकीय संचालक डॉ. संजय लालवानी सांगतात की समाजाच्या वेगवेगळ्या थरांतले, वेगवेगळ्या क्षेत्रांतले लोक मेल पाठवून आपल्याला या मानवी चाचणीत स्वयंसेवक म्हणून सहभागी व्हायचं आहे असं कळवत आहेत. हॉस्पिटलचे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते समीर पाटील सांगतात की सकाळी साडेनऊ वाजल्यापासून लस टोचून घेण्यासाठी लोक हॉस्पिटलबाहेर येऊन थांबले आहेत. त्यांच्यामध्ये एक ७५ वर्षांचे वृद्ध गृहस्थदेखील आहेत. हॉस्पिटलच्या बालरुग्ण विभागात दाखल झालेल्या रुग्णांच्या पालकांकडूनही चौकशी होते आहे.
- २००९ मध्ये एचवनएनवनच्या लसीसाठी हॉस्पिटलमध्ये मानवी चाचण्या घेतल्या गेल्या होत्या तेव्हा मुख्यतः डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी स्वयंसेवकांची तयारी करून घेतली होती, तसं आता नाही.
- पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी येथील माजी विषाणूतज्ज्ञ डॉ. मनदीप चड्ढा यांनी भारतातील करोना विषाणूविरोधी लढ्यात पहिल्यापासून पुढाकार घेतला आहे. ते सांगतात की कोविड १९ च्या विषाणूची संसर्ग पसरवण्याची क्षमता आणि इतर विषाणूंपेक्षा असलेलं त्याचं वेगळेपण या दोन गोष्टींमुळे त्याच्यावरची लस शोधण्यासाठी अधिक आणि वेगवान प्रयत्न करावे लागत आहेत. २००९ मध्ये आलेल्या एचवनएनवन विषाणूच्या महासाथीमुळे पुरेशी भीती निर्माण झाली होती. पण तेव्हा टॅमीफ्लू हे त्याच्यावरचं औषध बऱ्यापैकी वेळेत उपलब्ध झालं.
- गेल्याच महिन्यात लॅन्सेटने म्हटले आहे की

आणि त्यामुळे ते लसीसाठी स्वयंसेवक म्हणून योग्य आहेत हे निश्चित झालं. त्यांच्याकडे काम करणाऱ्या त्यांच्या गाडीच्या चालकाचीही करोना लसीच्या मानवी चाचणीत स्वयंसेवक म्हणून सहभागी होण्याची इच्छा होती. पण त्याच्या शरीरात करोनाची प्रतिपिंडं आढळल्यामुळे त्याला सहभागी होता आलं नाही. २७ ऑगस्ट रोजी या कुटुंबाने सकाळी साडेदहा वाजता घर सोडलं. लस टोचल्यानंतर त्यांना अर्धा तास निरीक्षणात ठेवण्यात आलं आणि अर्ध्या तासानंतरही सगळं नॉर्मल आहे हे पाहिल्यावर त्यांना तिघांनाही घरी जाण्यास सांगण्यात आलं. एक वाजेपर्यंत ते घरी परतलेही. 'लस टोचणारे लोक एकदम कुशल व्यावसायिक होते. त्यामुळे हे लसीकरण एकदम आरामात झालं,' असं ते सांगतात.

पुण्याहून २० किलोमीटरवर असलेल्या वडू येथील संशोधन संस्थेत आणि केईएम रुग्णालयातही ऑक्सफर्डच्या या करोना प्रतिबंधक लसीच्या क्लिनिकल ट्रायल्स घेतल्या जात आहेत. येथील प्रमुख डॉ. आशीष बावडेकर सांगतात की केईएममध्ये सुरुवातीला ३० स्वयंसेवकांना लस टोचली जाणार आहे.

कोविड १९ ची महासाथ आटोक्यात आणण्यासाठी सगळं जग ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या लसीच्या मानवी चाचणीकडे डोळे लावून बसलं आहे. या चाचणीत सहभागी होण्याची काहीजणांनी तयारी दर्शवली आहे. दि इंडियन एक्स्प्रेसने त्यांच्यापैकी सहा जणांची भेट घेतली. भारतातल्या कोविशील्डचं भवितव्य ज्यांच्यावर अवलंबून आहे अशांपैकी हे सहाजण... त्यांना या प्रकल्पात सहभागी व्हावं असं का वाटलं?

सुरुवातीला ज्यांचा उल्लेख केला आहे ते औषधनिर्मिती क्षेत्राचे प्रतिनिधी, त्यांचा निर्णय अर्थातच जाणीवपूर्वक, नीट विचार करून घेतलेला होता. त्यांनी भारती विद्यापीठाशी ईमेलवरून संपर्क साधून आपली या चाचणीत सहभागी होण्याची तयारी असल्याचं त्यांना कळवलं होतं. त्यांनी जवळपास आठ पानांचा मोठा फॉर्म भरून दिला. त्यात कोविड १९, लस, तिच्या साइड इफेक्ट्सची शक्यता, रक्ताच्या आवश्यक नमुना चाचण्या आणि इतर आवश्यक तपशील होते. रक्ताच्या नेमक्या कोणत्या चाचण्या करायच्या, त्यासाठी त्यांनी आधी पैसे खर्च करायचे आणि त्यांना ते नंतर मिळतील इत्यादी तपशील त्या फॉर्ममध्ये होते. त्यांना हेही कळवलं गेलं की त्यांना पहिला डोस दिल्यानंतर २९ व्या दिवशी दुसरा डोस दिला जाईल. असे दोन डोस देऊन पुढचे सहा महिने त्यांना निरीक्षणाखाली ठेवलं जाईल.

त्यांनी या काळात कशाकशावर लक्ष ठेवायचं आहे याची मार्गदर्शक तत्त्वं तपशीलवार देण्यात आली आहेत. त्यात सगळ्यात महत्त्वाचा आहे तो ताप. तो आला तर आणि त्याशिवाय इतरही काहीही समस्या असतील तर त्यांना देण्यात आलेल्या इमर्जन्सी नंबरवर ताबडतोब लस चाचणी चमूमधल्या डॉक्टरांशी संपर्क साधायचा आहे. या स्वयंसेवकांच्या दृष्टीने त्यांना सांगण्यात आलेली सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते त्यांचं दैनंदिन रुटीन सुरू ठेवू शकतात.

'आम्ही तेच केलं आहे', या औषधनिर्मिती क्षेत्रात काम करणाऱ्या गृहस्थांची मुलगी सांगते. 'लस टोचली तेव्हा मला जेमतेम सुई टोचल्याइतपतच जाणवलं. त्यानंतर मी घरी आले आणि नेहमीचं जेवण केलं.'

'मला बाहेर जाणं आणि लोकांना भेटणं गरजेचं आहे. खूप दिवस झाले, घरी बसलो आहे.' तिचे वडील सांगतात.

०००

ऑक्सफर्ड विद्यापीठ आणि ॲस्ट्राझेनेकाच्या करोनाविरोधी लसीचे सकारात्मक परिणाम दिसत आहेत. ही लस म्हणजे ॲडिनोव्हायरस या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नेहमीच्या तापाच्या विषाणूचे कमकुवत रूप आहे. शास्त्रज्ञांनी कोविड १९ च्या पृष्ठभागावर दिसणारी या विषाणू संसर्गाला कारणीभूत ठरणारी प्रथिनांची टोकं काढून घेतली आणि ती चिंपांझींमधून घेतलेल्या ॲडिनोव्हायरसमध्ये रुजवली आणि माणसाच्या शरीरात वाढू न शकणारा एक नवीन व्हायरस तयार केला.

- २ ऑगस्ट २०२० रोजी ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या पुणेस्थित जगातील सर्वात मोठ्या लसनिर्मिती संस्थेला करोनाविरोधी लसीच्या दुसऱ्या तसंच तिसऱ्या टप्प्यातील मानवी चाचण्या घेण्याची परवानगी दिली. या अभ्यासाला अधिकृतपणे ऑब्झर्व्हर, ब्लाइंड, रॅन्डोमाइझ्ड कंट्रोल्ड स्टडी टू डिटरमाइन द सेफ्टी ॲण्ड इम्युनोजेनिसिटी ऑफ कोविशील्ड इन हेल्दी इंडियन ॲडल्ट्स असं म्हटलं आहे.
- या चाचण्या सुरू असतानाच सीरम इन्स्टिट्यूटने ॲस्ट्राझेनेकाबरोबर भागीदारी केल्याचं जाहीर केलं असून ते दोघंही एकत्रितरीत्या गरीब देशांसाठी अब्जावधींच्या संख्येने डोसनिर्मिती करणार आहेत. हे लक्ष्य गाठण्यासाठी त्यांनी आपली उत्पादनक्षमता आणि सुविधा वाढवायला सुरुवात केली आहे.
- भारतातल्या मानवी चाचण्या किंवा क्लिनिकल चाचण्यांच्या नोंदणीसाठी १७ ठिकाणं निश्चित करण्यात आली आहेत. त्यातली १४ किंवा त्याहूनही कमी ठिकाणी कोविशील्ड चाचण्या घेतल्या जातील. सगळ्यात पहिल्यांदा पुण्यातील केईएम हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर या दोन ठिकाणी १०० स्वयंसेवक नोंदवले गेले. १८ वर्षं आणि त्यावरील वयाच्या १६०० लोकांना या अभ्यासात सहभागी करून घेतलं गेलं आहे.
- १०० सहभागींना कोविशील्डचा डोस दिल्याच्या सात दिवसांनंतर वैद्यकीय तसंच संख्यातज्ज्ञांचा समावेश असलेल्या डाटा सेफ्टी मॉनिटरिंग बोर्डासमोर माहिती सादर केली जाईल. या सात दिवसांच्या कालावधीत काही काळजी करण्याजोगं आढळलं नाही तर चाचण्या पुढे जातील.
- या चाचण्यांचे सगळे टप्पे पार पडले, त्यातून मिळालेल्या आकडेवारीची मांडणी करून झाली, निकाल हातात आले की ते ड्रग कंट्रोलर जनरल ऑफ इंडियापुढे मंजुरीसाठी ठेवले जातील. या चाचण्यांमध्ये सहभागी झालेल्यांना या निकालांची कल्पना दिली जाईल. ज्या सहभागींना प्लेसबो दिलेलं होतं त्यांना कंपनीकडून लस दिली जाईल. नियंत्रक यंत्रणेकडून लस, तिचं उत्पादन आणि इतर आवश्यक तपशिलांची पाहणी केली जाईल.

या स्वयंसेवकांमधली दुसरी ३२ वर्षीय व्यक्ती जैवसांख्यिकीतज्ज्ञ या नात्याने औषधनिर्मिती क्षेत्राशी संबंधित आहे. भारतातील कोविशील्ड लसीच्या मानवी चाचणीत सहभागी होणाऱ्या काही मोजक्या लोकांपैकी एक अशीही तिची ओळख यापुढच्या काळात असणार आहे. ही व्यक्ती विद्यार्थी असून पुण्यात एका खासगी संस्थेत संशोधन करते. तिने या लसनिर्मितीच्या प्रक्रियेबद्दल सातत्याने वाचन केले होते आणि तिची चाचणी पुण्यातच होणार आहे हे कळल्यावर त्यात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. 'करोनाचे हे दुस्वप्न संपवण्यासाठी या लसीच्या माध्यमातून लवकरच मार्ग निघेल अशी सगळ्यांनाच आशा आहे. त्यामुळे मी या मानवी चाचण्यांमध्ये स्वयंसेवक म्हणून सहभागी होण्याचा निर्णय घेतला.' हा विद्यार्थी सांगतो. 'या महासाथीने आपल्या जगण्यावर फार मोठा परिणाम केला आहे. अनेक लोकांचा रोजगार गेला आहे. मी तरुण आहे. त्यामुळे अशा चाचणीत सहभागी होणं हेच माझं समाजासाठी योगदान आहे.'

तो आधीपासूनच या सगळ्याबद्दल वाचत असल्यामुळे, सगळ्या घडामोडी, आकडेवारी, सुरू असलेलं संशोधन या सगळ्याशी संबंधित असल्यामुळे त्याला हा निर्णय घेणं अधिक सोपं गेलं. तो सांगतो, 'मी इंग्लंडमधल्या दुसऱ्या टप्प्यामधल्या चाचणीचे अहवाल वाचले होते. संख्यातज्ज्ञ म्हणून काम करत असल्यामुळे मला त्याचा अर्थ नीट समजून घेता आला आणि या लसीचे साइड इफेक्ट्स खूप कमी आहेत हेही समजलं.'

ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या संशोधकांनी स्पष्ट केलं आहे की या लसीच्या मानवी चाचणीच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात त्या व्यक्तींवरचा परिणाम पाहता लस सुरक्षित असल्याचं निदर्शनाला येत आहे.

तो सांगतो की त्याने स्वतःहून भारती विद्यापीठाशी संपर्क साधला आणि आपण लसीच्या मानवी चाचणीत स्वयंसेवक म्हणून काम करण्यासाठी उत्सुक असल्याचं सांगितलं. त्यांनी त्याला या अभ्यास प्रकल्पाची सगळी माहिती दिली आणि संमतीच्या फॉर्मवर सही करायला सांगितलं. त्याचा रक्तदाब आणि इतर आवश्यक गोष्टी तपासल्या गेल्या. त्याच्या शरीरात करोनाची प्रतिपिंडं नाहीत हे तपासलं गेलं आणि मग त्याला पहिला डोस दिला गेला.

२६ ऑगस्ट रोजी त्याचा दिवस नेहमीसारखा सुरू झाला. नाश्ता करून तो भारती हॉस्पिटलला गेला. लस टोचण्याची सगळी प्रक्रिया आटोपून परत आला तेव्हा त्याचे पालक त्याची उत्सुकतेने वाट बघत होते. आपला मुलगा भारतातल्या कोविशील्डच्या मानवी चाचणीत सहभागी झाला आहे याचा त्यांना वाटत असलेला अभिमान त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहात होता.

दुसऱ्या दिवशी त्याने रोजच्यासारखी त्याच्या कामाला सुरुवात केली.

## कोविशिल्ड तपशील

- ऑक्सफर्ड- ॲस्ट्राझेनेका लस म्हणजेच भारतातली कोविशिल्ड लसीच्या मानवी चाचण्यांमध्ये सहभागी होण्यासाठी १८ वर्षं आणि त्यावरील वयाच्या १६०० जणांनी नावनोंदणी केली आहे.
- त्यांची दोन गटांमध्ये विभागणी केली जाईल. एका गटाची प्रतिकारशक्ती आधीच तपासली जाणार नाही आणि त्याला लस दिली जाईल तर दुसऱ्या गटाची आधीच तपासणी करून त्याच्या शरीरात करोनाची प्रतिपिंडं आहेत का ते पाहिलं जाईल आणि ती नसतील तरच त्याला लस दिली जाईल.
- १६०० सहभागींपैकी १२०० सहभागी ३:१ असे विभागले जातील. काहींना कोविशिल्ड दिलं जाईल तर काहींना प्लेसबो (रुग्णांना औषध म्हणून साधंच काहीतरी देणं) दिलं जाईल. काहीजणांना ठरावीक अंतराने दोन डोस दिले जातील, पण त्यांचे रक्तनमुने घेतले जाणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या शरीरात करोनाची प्रतिपिंडं आहेत का ते तपासलं जाणार नाही. त्यांचं सहा महिन्यांसाठी निरीक्षण केलं जाईल.
- ज्यांच्या शरीरात प्रतिपिंडं आहेत का हे आधीच तपासलं गेलं आहे अशा उरलेल्या ४०० सहभागींना कोविशील्ड दिलं जाईल. तेदेखील ३:१ या प्रमाणात दिलं जाईल. (लस तीच पण आधी सीरम इन्स्टिट्यूटने आणि नंतर ॲस्ट्राझेनेकाने निर्माण केलेली) दुसऱ्या डोसनंतर सहा महिने या सहभागींचे रक्तनमुने घेतले जातील आणि त्यांच्या शरीरात करोनाची प्रतिपिंडं निर्माण झाली आहेत का याचा अभ्यास केला जाईल.

## काळाशी स्पर्धा

- देशात करोनावर उपचारासाठी लसनिर्मितीचे तीन प्रयत्न सुरू असून त्यातले दोन भारतीय स्थानिक कंपन्यांचे आहेत.
- आयसीएमआरच्या बरोबर भारत बायोटेकच्या कोवॅक्सिन या स्थानिक लसीच्या चाचणीचा पहिला टप्पा पार पडला आहे. झायडस कॅडिला लिमिटेडच्या yCoV-D या स्थानिक लसीच्या चाचणीचाही पहिला टप्पा पार पडला आहे.
- झायडसची दुसरी चाचणी सुरू झाली आहे. भारत बायोटेकची दुसरी चाचणी या महिन्यात सुरू होत आहे.
- ऑक्सफर्ड ॲस्ट्राझेनेका लसीचं काम या वरील लसींच्या तुलनेत अधिक प्रगत टप्प्यावर आहे. भारतात २५ ऑगस्टपासून त्यांच्या दुसऱ्या-तिसऱ्या टप्प्यांतील चाचण्यांना सुरुवात झाली आहे.
- लस सगळ्यांनाच वेळेत मिळावी यासाठी १७२ देश कोवॅक्स ही यंत्रणा उभी करण्यासाठी विचारविनिमय करत आहेत. मोडेर्ना या अमेरिकी कंपनीसह ९ आस्थापनांबाबत विचार सुरू आहे.
- अनेक शंकाकुशंका व्यक्त केल्या जात असल्या तरी रशियाने स्पुटनिक व्ही ही आपली लस वापरासाठी सिद्ध असल्याचे जाहीर केले आहे. तर चीनने तेथील सिनोव्हॅक बायोटेकने जुलैमध्ये तातडीच्या वापरासाठी करोना व्हॅक्सिन विकसित केल्याचं चीनने स्पष्ट केलं आहे.

करोना लसीच्या या मानवी चाचणीत भारतातून जे स्वयंसेवक सहभागी झाले आहेत, त्यात ४८ वर्षांचे हे स्त्रीरोगतज्ज्ञ वेगळे ठरतात. कारण त्यांच्या आयुष्यात ते दुसऱ्यांदा अशा प्रकारच्या मानवी चाचणीत सहभागी झाले आहेत. याआधी २००९ मध्ये ते आणि त्यांची तेव्हा ११ वर्षांची असलेली मुलगी भारती हॉस्पिटलच्या एचवनएनवनसाठीच्या लसीच्या चाचणीत सहभागी झाले होते.

नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोलच्या आकडेवारीनुसार तेव्हा म्हणजे २००९ मध्ये एचवनएनवनमुळे भारतात ९८१ मृत्यू झाले होते. त्यानंतरच्या दहा वर्षांमध्ये देशात १.५८ लाख लोकांना स्वाईन फ्ल्यू झाला आणि त्यातल्या दहा हजार लोकांचा मृत्यू झाला.

त्यानंतर पाच वर्षांनी त्यांची मुलगी पुन्हा भारती हॉस्पिटलच्याच सर्व्हिकल कॅन्सरवरील लसीसाठीच्या मानवी चाचण्यांमध्ये सहभागी झाली. दोन्ही वेळचा आपला अनुभव अतिशय चांगला, आश्वासक होता. हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टरांनी त्या दोघांचाही सातत्याने फॉलोअप घेतला असं हे स्त्रीरोगतज्ज्ञ सांगतात.

या वेळी त्यांनी आणि त्यांच्या मुलीने दोघांनीही कोविशील्डच्या मानवी चाचण्यांमध्ये सहभागी व्हायचं ठरवलं. त्यांची पत्नीदेखील स्त्रीरोगतज्ज्ञ आहे. पण तिच्या शरीरात कोविडची प्रतिपिंडं आढळल्यामुळे तिला या चाचण्यांमध्ये सहभागी होता आलं नाही. डॉक्टरांनी २६ ऑगस्ट रोजी ते काम करत असलेल्या खासगी हॉस्पिटलमधलं त्यांचं काम संपवलं आणि जाऊन लस टोचून घेतली, तर त्यांच्या मुलीला दुसरा दिवस म्हणजे २७ ऑगस्ट हा दिवस दिलेला होता. तिने तिचे इंजिनीअरिंगच्या दुसऱ्या दिवसाचे ऑनलाइन क्लासेस संपवले आणि मग जाऊन लस टोचून घेतली.

आता २१ वर्षांची असलेली त्यांची मुलगी सांगते, मी चौथी-पाचवीत होते तेव्हा माझ्या आईवडिलांनी एचवनएनवनच्या लसीच्या मानवी चाचणीत मी सहभागी व्हावं असं मला सुचवलं होतं. दुसऱ्या वेळी मी सर्व्हिकल कॅन्सरवरील उपचारांसाठीच्या लसीच्या मानवी चाचणीत सहभागी झाले होते. मला माझ्यावर कोणतेही लक्षणीय साइड इफेक्ट्स आढळले नाहीत. या मानवी चाचणीमध्येदेखील सहभागी व्हायचं हे आम्ही एकमताने ठरवलं होतं.

तिच्या वडिलांच्या मते अशा प्रकारच्या सहभागाचा निर्णय घेणं त्यांच्यासाठी फारसं अवघड नव्हतं. त्यांना शास्त्रीय पद्धतीने विचार करण्याची सवय आहे. त्यामुळे करोनाशी मुकाबला करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे काढे, वैद्यकीयदृष्ट्या सिद्ध न झालेले वेगवेगळे उपाय याविषयी समाजात सुरू असलेल्या चर्चेचा त्यांना वैताग आला होता. ते सांगतात, 'डॉक्टरांसह आरोग्य कर्मचारीदेखील करोनाबाधित झाले आहेत. या संसर्गामुळे झालेले मृत्यू मी पाहिले आहेत. त्यावर लस हाच उपाय आहे.'

**- संडे एक्स्प्रेसमधून**
**अनुवाद- वैशाली चिटणीस**

response.lokprabha@expressindia.com

क्रीडा

नितीन मुजुमदार

# मजल मोठी, पल्लाही बाकी!

जगज्जेत्या भारतीय बुद्धिबळ संघाचा कर्णधार विदित गुजराथीचे वय जेमतेम २५ वर्षे इतकेच आहे. बुद्धिबळ खेळाचे स्वरूप आणि इतिहास याचा अभ्यास केला तर क्रिकेटमध्ये साधारण याच वयाचा असताना सचिन तेंडुलकरने जशी कामगिरी केली होती त्याच स्वरूपाच्या कामगिरीची नोंद विदितने केलेली दिसते. मात्र अजून बराच पल्ला गाठायचा बाकी आहे हे विदितलाही ज्ञात आहे. त्याचे यापुढील ध्येय हे बुद्धिबळाच्या 'टॉप टेन' जागतिक वैयक्तिक रँकिंग्जमध्ये स्थान मिळविण्याचे आहे. २७०० यलो गुणांचे रेटिंग मिळविणे म्हणजे जागतिक स्तरावरील नामवंत खेळाडूंमध्ये गणले जाणे आणि ही कामगिरी विदितच्या नावावर बरोबर ३ वर्षांपूर्वी नोंदली गेली म्हणजे तेव्हा तो २३ वर्षांचादेखील नव्हता! ही कामगिरी करणारा आजवरच्या इतिहासातील तो सर्वात तरुण भारतीय बुद्धिबळपटू! विश्वनाथन आनंदनेसुद्धा २४ व्या वर्षी २७०० यलो रेटिंग मिळविले होते.



(छायाचित्र सौजन्य : विकिपीडिया)

बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये इतिहासात प्रथमच सुवर्णपदक जिंकलेल्या भारताचे नेतृत्व केलेल्या विदितशी या कामगिरीनंतर काही तासांतच बातचीत केली. विदितच्या कुटुंबीयांशीदेखील या वेळी संवाद साधला.

विदितला पहिला प्रश्न होता अर्थातच 'त्या' क्षणाचा! 'फिडे'ने (बुद्धिबळाची जागतिक संघटना) संयुक्त अजिंक्यपद रशियासह घोषित केले गेले तेव्हा नेमके काय वाटले हा! विदित प्रांजळपणे म्हणाला, ''माझ्यासाठी हा एक सुखद धक्का होता, मात्र अंतिम सामन्यात इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या अडचणीमध्ये भारतीय संघाचा काहीही दोष नव्हता. जागतिक स्तरावर सर्व्हर प्रॉब्लेम निर्माण झाला होता हे 'फिडे'ने लक्षात घेतले ही समाधानाची बाब आहे!''

''या स्पर्धेतील तू स्वतः खेळलेले संस्मरणीय सामने कोणते?'' या माझ्या प्रश्नाला उत्तर देताना विदितने दोन सामन्यांचा उल्लेख केला. तो म्हणाला, ''पोलंडविरुद्ध एका '४२३ ६ल्ल' परिस्थितीत तेव्हा मी माझा सामना जिंकू शकलो ही माझ्यासाठी आनंदाची बाब. दुसरा सामना रशियाविरुद्ध, त्या सामन्यात मी माझ्या रशियन प्रतिस्पर्ध्याविरुद्ध जोरदार आक्रमण सातत्याने केले; पण त्यानेही अतिशय चांगला बचाव केला व सामना अनिर्णित राहिला! हे दोन्ही सामने माझ्यासाठी अगदी लक्षात राहण्यासारखे.'' स्पर्धेत सांघिकदृष्ट्या आव्हानात्मक परिस्थितीबद्दल बोलताना विदित म्हणाला, ''मंगोलियाविरुद्धच्या पराभवानंतर मी काहीसा निराश नक्कीच होतो, कारण आमची काहीही चूक नसताना आम्हाला पराभव स्वीकारावा लागला होता; पण नंतर चीनविरुद्ध आम्ही अंतिम गट लढतीत आमची उसळी मारण्याची क्षमता सिद्ध केली. सलग तीन सामने जिंकून आम्ही चीनला ४.५ विरुद्ध १.५ अशा फरकाने पराभूत केले!'' विदित पुढे म्हणाला, ''पोलंडविरुद्ध उपांत्य फेरीचा सामना तर आम्ही खूप आव्हानात्मक परिस्थितीत जिंकला. पहिला राऊंड आम्ही ४ विरुद्ध २ अशा फरकाने हरल्यावर दुसऱ्या राऊंडमध्ये ४.५ विरुद्ध १.५ अशा फरकाने आम्ही

जिंकलो. उपांत्य सामना हा अंतिम सामन्यापेक्षा थोडा जास्त आव्हानात्मक होता, असे मी म्हणेन.'' भारतीय संघाच्या सांघिक कामगिरीची विदितने विशेष स्तुती केली. तो म्हणतो, ''पुरुष अथवा महिला खेळाडू, ज्युनिअर किंवा सीनियर, प्रत्येकाने मोक्याच्या वेळी कामगिरी उंचावली. आमचा सांघिक प्रयत्न खूप सुरेख होता म्हणूनच आम्ही हे यश मिळवू शकलो.'' नेतृत्वाबद्दल बोलताना विदित म्हणतो, ''भारतीय संघाचे नेतृत्व करणे हे एक स्पेशल फीलिंग होते, खूप काही शिकायला मिळाले. विशेष करून अवघड परिस्थिती कशी हाताळावी, निर्णयक्षमता आदीबाबतीत छान अनुभव मिळाला.''

विदितने आपल्या आजवरच्या कारकीर्दीत बुद्धिबळात फेडररसारखी कामगिरी करणाऱ्या मॅग्नस कार्ल्सनला तीनपैकी दोन लढतीमध्ये बरोबरीत रोखण्यात यश मिळवलंय. त्याची कार्ल्सनबरोबर एक लढत तर तब्बल ७ तास चालली, कार्ल्सनच्या कारकीर्दीतील सर्वाधिक काळ खेळल्या गेलेल्या सामन्यांपैकी हा एक. अगदी अलीकडे म्हणजे गतवर्षी त्याने टाटा स्टील बुद्धिबळ ब्लिट्झ स्पर्धेत १४व्या फेरीत आनंदलादेखील हरविले आहे!

विदितच्या या आजवरच्या यशस्वी वाटचालीत त्याच्या कुटुंबीयांच्या त्यागाचाही खूप मोठा वाटा आहे. आजकाल ग्लॅमरस खेळांमध्ये 'सपोर्ट स्टाफ'चा खूप बोलबाला असतो; पण खरं तर, मध्यमवर्गीय खेळाडूला खरी गरज असते 'घरच्या सपोर्ट स्टाफची'. तुलनेने कमी लोकाश्रय लाभलेल्या खेळांतील खेळाडूंना तर अशी गरज अंमळ जास्त भासते! हा सपोर्ट स्टाफ जर भरभक्कम असेल तर अशा खेळाडूचे मनोधैर्य सहसा उंचावलेलेच राहते! विदितची आई डॉ. निकिता होमिओपॅथी डॉक्टर, तर वडील डॉ. संतोष आयुर्वेदिक डॉक्टर. आईने विदितच्या करिअरसाठी काही काळ प्रॅक्टिस बंदही ठेवली. कारकीर्दीच्या पहिल्या टप्प्यात, जो खूप महत्त्वाचा असतो आणि भारतात याच टप्प्यावर कोणीही पुरस्कर्ते पुढे येत नाहीत, अशा वेळी विदितच्या आईवडिलांनी अतिशय ठामपणे विदितच्या मागे उभे राहण्याचा निर्णय घेतला. काळाच्या ओघात कारकीर्द स्थिरावल्यावर काही प्रमाणात आर्थिक भार हलका झाला; पण घरात उगवता खेळाडू असल्यावर, प्राथमिक स्तरावर, सुरुवातीचे दिवस कोणत्याही मध्यमवर्गीय कुटुंबास आर्थिकदृष्ट्या जड जातात आणि गुजराथी कुटुंबीय याला अपवाद नव्हते. मात्र सुशिक्षित पार्श्वभूमी असताना आणि बुद्धिबळासारख्या तुलनेने कमी पैसे, प्रसिद्धी मिळणाऱ्या खेळातील करिअर करण्यासाठी आपल्या मुलाच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभे राहणारे आईवडील अपवादात्मकच आणि म्हणूनच गुजराथी दाम्पत्याची विदितच्या कारकीर्दीतील भूमिका अभिनंदनीय आणि कौतुकास्पद आणि पथदर्शीदेखील! विदितची बहीण वेदिका फिजिओथेरपीचा अभ्यास करीत असून भावाच्या 'सपोर्ट स्टाफ'मध्ये तिचाही मोलाचा वाटा असतो, तो अगदी भावाला जेतेपद मिळाल्यादिवशी, त्याचा आवडता पास्ता करून देईपर्यंत! गेल्या काही वर्षांमध्ये विदितच्या कारकीर्दीत ओएनजीसी व लक्ष्य फाऊंडेशन यांनी पुरस्कर्त्यांच्या रूपात महत्त्वपूर्ण कामगिरी केली होती. अगदी अलीकडे 'ब्लॅक लोटस' या आध्यात्मिक ॲपने विदितला ५ वर्षांसाठी ब्रँड ॲंबेसेडर म्हणून करारबद्ध केले आहे. ओम स्वामी हे या ॲपचे उच्चशिक्षित प्रवर्तक आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार विदित त्यांच्या ॲपसाठी अतिशय सुयोग्य असे व्यक्तिमत्त्व आहे. त्याला करारबद्ध करायचे या ॲपच्या व्यवस्थापनाने काही काळापूर्वीच ठरविले होते. अगदी अलीकडे त्यांनी अंतिम करार केला. हे ॲप जगातील सर्वाधिक वेगाने ग्राहक वाढणारे आध्यात्मिक ॲप असून स्वतः विदित गेली दोन वर्षे ते वापरत आहे.

विदितला बुद्धिबळपटू झाला नसता तर कोण व्हायला आवडले असते, असे विचारले असता अगदी बुद्धिबळाशी अप्रत्यक्ष संबंधित असेच, पण आगळेवेगळे उत्तर आले. तो म्हणाला, ''मला न्यूरो सायंटिस्ट व्हायला आवडले असते!'' विदितला भारतीय तसेच इटालियन खाद्यपदार्थ खूप आवडतात, तर बॅडमिंटन व बास्केटबॉल हे त्याचे इतर आवडते खेळ आणि मनाला भावलेले पुस्तक आहे- 'इफ ट्रुथ बी टोल्ड'. या बेस्ट सेलर पुस्तकाचे लेखक आहेत ओम स्वामी.

सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावरील अर्जुन पुरस्कार देण्यात येतो. २०१३ सालानंतर आजपर्यंत अर्जुन पुरस्कार विजेत्यांच्या यादीत एकाही बुद्धिबळपटूचा समावेश झालेला नाही. या देदीप्यमान कामगिरीनंतर आगामी काळात बुद्धिबळपटू पुन्हा या मानाच्या यादीत दिसतील, अशी आशा क्रीडारसिक आता करत आहेत!

response.lokprabha@expressindia.com

*(छायाचित्र : नितीन मुजुमदार*

# ऐश्वर्य-कर्तृत्वाचा मनगटी मापदंड

अविस्मरणीय

आशुतोष उकिडवे

'भोसले', 'होळकर', 'रास्ते', 'पुरंदरे', 'आंग्रे', 'देशपांडे' 'घोरपडे' एकत्रितपणे येणारी ही आडनावे मराठी साम्राज्याचा, तेजस्वी शिवशाहीचा एक शौर्यशाली, विजिगीषु इतिहास समोर उभा करतात. दिल्लीचे तख्त हादरवून सोडणाऱ्या मराठी राज्यकर्त्यांना तितकीच तडफदार साथ लाभली ती अशा या वीर, बाणेदार सरदारांची. केवळ लढाया वा राजकारणच नव्हे तर सामाजिक कार्य आणि कलाप्रांतातही सरदार घराण्यांचे, कर्तव्यदक्ष राजे आणि संस्थानिकांचे महत्त्वाचे योगदान आहे. या मर्द-मराठी परंपरेतले आणखी एक उल्लेखनीय नाव म्हणजे 'शिंदे'. १८व्या शतकात पेशवाई उदयास आली आणि तिच्या राजाश्रयाखाली, स्वामिनिष्ठ आणि भीमपराक्रमी शिंदे घराणे भरभराटीस आले. पुढे केवळ साताऱ्यापुरतीच सत्ता मर्यादित न राहता ग्वाल्हेर-गादी मिळण्याइतकी त्यांची प्रगती झाली. आणि याच शिंदे-साम्राज्यात, आपल्याच मूळ घराण्याचे नाव घेऊन-लेवून जन्माला आला भारदस्त अंगाचा आणि देदीप्यमान वर्णाचा, दणकट मनगटाचा 'महाराणा' 'शिंदेशाही तोडा'.

'शिवाजी सरज्यानं इनाम घोडा बक्षीस दिला, शेरभर सोन्याचा तोडा हातात घातला.' आगीनदासाने रचलेल्या पोवाड्यातून तोडा नामक अलंकाराची सामाजिक आणि राजकीय पतही लक्षात यावी. युद्धात मर्दमुकी गाजवून आलेल्या सेनापतीला वतन, घोडा आदी बक्षिसे तर दिली जातच. पण खुद्द 'छत्रपतींचे' हातून, आपल्या हातात सोन्याचा कडा चढवून घेणे ही प्रतिष्ठेची परिसीमा होती. नुसते मिरवण्यापुरतेच कामी येणाऱ्या अन्य दागिन्यांच्या तुलनेत, शिंदेशाही तोडा मात्र, या दृष्टीने 'राजसन्मानाची मिरवणूक' ठरला.

अंगीभूत कर्तृत्वाची 'शाही ग्वाही' ठरलेला शिंदेशाही तोडा, जनमानसात मात्र एक आख्यायिकाच ठरला तो विविध कारणांमुळे. हा घडवण्यासाठी कमीत कमी एक शेर (२२ तोळे) सोने कामी यायचे. अगदी आजही, नवीन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने, यंत्रावर तयार करायचे म्हटले तरी किमान १० तोळे सोने तरी याच्या एका नगासाठी लागतेच. साहजिकच, १०० नंबरी अर्थात २४ कॅरेटच्या चोख सोन्यात घडणारा शिंदेशाही तोडा हा पूर्वीपासूनच आम जनतेच्या आवाक्याबाहेरच राहिला. मुळात हा पुरुषांनी घालायचा डाग असल्याने, रुंद मनगटाला पेलेल आणि शोभेल असेच त्याचे पुरुषी रूपडे होते. सोन्याच्या दणकट कड्या एकमेकांत अडकवून

त्यांचा अंगठ्याएवढा जाड-रुंद मर्दानी पिळा, मजबूत, केसाळ मनगट घट्ट वेढून राही. कुस्तीतल्या, एखाद्या उन्मत्त मल्लाने आपला स्नायून्स्नायू फुलवून तटतटलेले शरीरसौष्ठव दाखवावे तसा चटकन उठून दिसणारा सणसणीत बांधेसूदपणा हे शिंदेशाही तोड्यांचे एक महत्त्वाचे व्यवच्छेदक लक्षण होते. अंगावरच्या प्रत्येक कमानीचा, गोलाईचा पीळदारपणा तर स्पर्श न करताही नुसत्या नजरेने जोखता यायचा. शृंखलात्मक रचनेमुळे, प्रत्येक बाकदार पिळाची अर्धकमान जिथे संपायची तिथे दळदार टाका घातल्याप्रमाणे नक्षी उमटायची. थोडक्यात, अंबाड्यावरच्या गेंदेदार वेणीत, मधोमध टपोरी फुले नि दोन्ही बाजूने खालच्या अंगाला कलाबुती जरीची किनार असते तसे अतिशय देखणे रूप या तोड्याचे होते. हा तोडा थेटपणे हातात घालायचा नसून त्याच्या चौकीवर एक खीळ असायची. (यालाच 'मोगरा' असेही नाव आहे). ही जाड फिरकी संपूर्ण फिरवली की मगच हा सर्पवेढा तटकन दुभंगल्यासारखा उघडायचा आणि नंतरच त्याच्या वासलेल्या मुखातून, जखडलेले मनगट मोकळे व्हायचे. पूर्वी हमरीतुमरीवरच्या लढायांत, वेगात दांडपट्टा फिरवताना, भाला परजताना वा तलवार चालवताना तोडा, घरंगळून पडू नये म्हणून त्याची अशी योजनाबद्ध बांधणी केली गेली असावी. पण एकदा का मनगटापासून विलग झाला की, मूळचा घट्ट आकृतिबंध संपून, या रुबाबदार मदनाचे रूपांतर पिळपिळीत साखळीत व्हायचे. मग मात्र, शिंदेशाही तोड्याचे ते विशविशीत, विस्कळीत विदीर्ण विरूप पाहावयाचे नाही. बांगडी वाकते तसा हा तोडा चक्क उलट्या बाजूने काही विशिष्ट कोनापर्यंत फाकवताही यायचा. भारतीय स्वर्णकारागिरीची ही 'उफराटी' करामत थक्क करून टाकणारी आहे.

पुढे कालौघात, हा रुबाबदार तोडा, केवळ शूरवीरच नव्हेत तर शौकिन श्रीमंतांनासुद्धा हवाहवासा वाटू लागला. तमाशा बघायला आलेल्या एका रंगेल-गुलजार रावजींचं वर्णन एका जुन्या लावणीत सापडतं. 'मुखी पानाचा रंगला विडा, पायात नामी पठाणी जोडा, मनगटी शोभे शिंदेशाही तोडा.' शिंदेशाहीत जरी हा तोडा प्रामुख्याने मशहूर झाला असला, तरी 'पिळा-वळा'ची नक्षी असलेले रुंद कंगण आणि विशेषतः पायातले कडे हे दागिने भारतात कित्येक शतकांपासून प्रचलित होते. अगदी सिंधुसंस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या मूर्ती, शिल्पे व अन्य धातूंच्या दागिन्यांत अशा स्वरूपाचे डिझाइन दिसून येते. 'तोडर' या मूळ प्राकृत शब्दावरून 'तोडा' आला. भिल्ल व आदिवासी समाजात आजही जाडजूड तोडे पायात घातले जातात. हातात आणि पायात घालायचा तोडा हा म्हणूनच एकमेव दागिना असावा. 'आम्ही दोघी बहिणी जोडीच्या, हातात पाटल्या तोडीच्या' या फुगडी गीतात येणाऱ्या 'तोडीच्या पाटल्या' केवळ यमक-जुळणी म्हणून योजलेल्या नाहीत वा 'तोडीस-तोड' या अर्थानेही त्या येत नाहीत. तर खरोखरच 'तोडीच्या पाटल्या' हा नक्षीचा स्वतंत्र दागिनाप्रकार म्हणून अस्तित्वात होता. पोची, कडी, सलकडी हे हातातले दागिने तर साखळी, वाळे, तोरड्या हे पायातले दागिने म्हणजे तोड्याचाच 'गात्र-विस्तार' आहेत. याअर्थी, तोड्याने आपले 'हात-पाय' फार प्राचीन काळापासूनच पसरले होते असे म्हणायला हरकत नाही.

शिंदेशाही तोड्याचे राजबिंडे रूप, आभूषणप्रेमी स्त्रियांच्या नजरेतून सुटणे शक्यच नव्हते. यथावकाश, पुरुषी मक्तेदारीतून बाहेर पडून तोडा स्त्रीराज्यातही दाखल झाला. अर्थात स्त्रीवश झाला म्हणून स्त्रीवेश त्याने कधीच धारण केला नाही. उलट आपला रांगडा मर्द-बाणा त्याने तहहयात जपला. अस्सल जातिवंत शिंदेशाही तोड्यावर म्हणूनच ना कधी मीनाकारी जडली ना कधी फुले-वेलबुट्टी चढली. स्त्रियांच्या नाजूक, तुकतुकीत मनगटांवर रुळायचे, म्हणून याचा एरवीचा पुरुषी घेर-विस्तार जरी थोडासा आक्रसला तरी आपल्या शेरभर सोन्यातले तसूभरही सोने त्याने कमी होऊ दिले नाही. उलट प्रत्येकी २२ तोळे अशा ४४ तोळ्यांचा हा विशुद्ध सुवर्ण-मरीच, दोन्ही मनगटांत तेजाळ तळपत राहिला. तसं पाहिला गेलं तर इतके जड तोडे अन्य दागिन्यांबरोबरं सदासर्वकाळ वागवणे शक्यच नव्हते. म्हणून नित्याच्या दागिन्यांत, गोठ-पाटल्या राहिल्या पण तोडे मात्र काही खास सणासमारंभात घालण्याचीच प्रथा पडली. मनगटात रुतणारे त्वचेला काचणारे जडशीळ तोडे तरीही स्त्रीच्या खास मर्जीतले राहिले. जात्यावरची एक ओवी आठवते, 'शिंदेशाही तोडं, सीताबाईला कवा केलं? सीताबाईच्या तोड्यासाठी राम इंदोराला गेलं.' अस्तुरीचा स्त्रीहट्ट पुरवण्यासाठी, खुद्द रामाला इंदोरच्या सुवर्णपेठा धुंडाळायला लागल्या तर मंगळागौर जागवणारी 'घुमा', 'या गावचा त्या गावचा, सोनार नाही आला, तोडे नाहीत मला, नाचू मी कशी?' असा सवाल करत रिंगणातच खोळंबून उभी राहिली. थोडक्यात, सामर्थ्याची पुरुषी अदा दाखवणाऱ्या या दांडग्या नरपुंगवाने, स्त्रीच्या भावविश्वातही तिचा 'प्रिय-पट्ट' दागिना म्हणून स्थान मिळवले.

असा हा उभयलिंगी (स्त्री-पुरुष वापरातला)

नि उभयगात्री (हस्त-पद्य धार्जिणा) 'तोडा' घोड्याशीही संधान बांधून राहिला. 'पाठीवरती जीन मखमली पायी रुपेरी तोडा' अशा डौलदार टापांच्या घोड्याचे यथार्थ वर्णन शांता शेळके यांनी एका बालगीतातून केले आहे. पूर्वी राजे-महाराजांच्या पदरी मोठे अश्वदळ असे. लढाईत विजय मिळवण्यासाठी, तसेच रपेटीसाठीही, तैनातीला असलेले असे उत्तम, उमदे, अबलख वारू त्याच्यावरच्या स्वाराची शान वाढवायचे. युद्धात विजयी झालेल्या वीराच्या पराक्रमी मनगटात, राजा सोन्याचा तोडा चढवायचा तर ज्याने धुमश्चक्रीतही, पाठीवरच्या आपल्या धन्याची भक्कम मांड सैलावू न देणाऱ्या त्या सदासज्ज, इनामी घोड्याच्या ताकदवान पायांत, हा वीर त्याच कृतज्ञ भावनेतून चांदीचा तोडा अडकवायचा. स्फूर्ती, चापल्य नि बळाचं मूर्तिमंत प्रतीक असलेल्या 'अश्वशक्ती'ला शृंगारण्यासाठी, शौर्य-साहसाचेच द्योतक असलेल्या शिंदेशाही तोड्याचा वापर व्हावा हा योगायोग नक्कीच नाही.

खरं तर बंगाल व केरळचे सोनार, सोन्याची अतिशय बारीक तार काढून त्यापासून विविध नाजूक व नक्षीदार दागिने घडवण्यासाठी मशहूर. पण रांगड्या महाराष्ट्रात मात्र 'घसघशीतपणा' व जडत्व हेच दागिन्यांच्या, विशेषतः हस्ताभूषणांच्या सौंदर्याचे प्रथम निकष ठरले. सर्वात आधी हातात दाटणारी रुंद पाटली वा पिछेडी, नंतर बांगड्या वा नक्षीदार बिल्लोर अर्थात बिलवर, त्यानंतर, सोन्याची कांब शोभावेत तसे जाडजूड गोठ (काही वेळा जोड-गोठदेखील) आणि सर्वांत पुढे, या मनगटावरच्या 'मांदियाळीचा म्होरक्या' शोभावा तसा शिंदेशाही तोडा. मराठी स्त्रीच्या हातात चढणाऱ्या आभूषणांचा हा क्रम पिढ्यान्पिढ्या तसाच अपालट राहिला. आमची आई या तोड्यांना 'मुरुडशेंगेचे तोडे' म्हणायची. पुढे कधी तरी, बाळघुटीत उगाळली जाणारी 'वळसेदार' मुरुडशेंग प्रत्यक्ष पाहायला मिळाली तेव्हा आईचा हा 'उपमा अलंकार' मूळ तोड्यांपेक्षा जास्त लखलखला. 'पिरगळीचे तोडे' असेही याचे असेच एक सार्थ नाव होते.

शिंदेशाही तोड्यालाच समकालीन असलेले त्याचे भाऊबंदही, हलक्या वजनामुळे व तुलनेने परवडणारे असल्यामुळे तितकेच किंबहुना अंमळ जास्त लोकप्रिय होते. महाराष्ट्रीय अलंकारातला 'खुणेचा दागिना' म्हणून ओळखले जाणारे 'मोत्याचे तोडे' यात अग्रक्रमी येतात. चौकीवर लालचुटूक खडे आणि अंगात तेजस्वी दळदार मोती असे रूपडे असलेले मोत्याचे तोडे बहुतेकदा चांदीत घडवले जात. तर सधन घरांमध्ये या मौत्यतोड्यांना सोन्याचेही अंग लाभे. तळणीच्या तेलात सरसरून्न उमलून आलेल्या नी हुबेहूब तोड्यांसारख्या दिसणाऱ्या बेगमीच्या 'साबुदाण्याच्या चकल्यांना' आमची शकूनआते 'मोत्याचे तोडे' म्हणायची. स्त्रियांच्या ठायी असलेल्या समृद्ध भाषावैभवाचे हे आणखी एक चपखल उदाहरण. पाठारे प्रभू समाजातला 'रुइफुला' हा मोत्याचा तोडा नितांतसुंदर दागिना. तर 'हिरकणीचे तोडे' म्हणजे लावण्याची खाण. याव्यतिरिक्त 'गहूतोडे', 'गादीवरचे तोडे' 'गजमुखी-व्याग्रमुखी तोडेही वापरात होते. शिवाय, मनगटातला सर्वात पुढचा दागिना अर्थात 'आगोडी' म्हणून येणारे 'जवे' (जव्याचे तोडे) हा नाजूक व सुंदर पर्याय होताच. 'बिलवरांपुढे घालण्यासाठी, बांधावे दवाचे जुवे' असा इंदिरा संत यांच्या एका कवितेत या जुव्यांचा (ऊर्फ जव्यांचा) फार गोड उल्लेख येतो. मला स्वतःला पाहायला आवडायचे ते आईचे 'सुरंगी तोडे'. गोव्याच्या देवभूमीवर घमघमत अमाप फुलणारी 'सुरंगी' चक्क तोड्यालाच लगडल्ये अशी कल्पना कल्पून ती दागिन्यातून मूर्त रूपात आणणाऱ्या त्या प्रतिभावंत गोवेकर कारागिराला करावा तेवढा कुर्निसात थोडाच आहे.

परंतु स्वातंत्र्योत्तर काळात सोन्याचे भाव जसे आणखी चढे झाले, तसे कमीतकमी जोडकाम असलेले पर्यायाने फार कमी हीण (भेसळ) घेणारे शुद्ध भरभक्कम तोडेही नरमले. शिंदेशाही तोड्याचा तोंडावळा असलेले पण प्रत्येकी पाच-सहा तोळ्यांत बसतील असे 'अनारकली तोडे' कानामागून आले आणि लोकप्रिय ठरले. मग, संस्थाने खालसा झालेल्या संस्थानिकांप्रमाणे, शिंदेशाही तोडेही राज्यपद सोडून पायउतार झाले. आजही सधन हौशी गिऱ्हाईकांसाठी शिंदेशाही तोडे घडवले जातात. ते जास्त चमकावेत म्हणून त्यावर तास पाडले जातात. कमानदार गोलाईऐवजी, पिरगळीवर थोडा त्रिकोणीपणा दिसतो. परंतु जुन्या काळच्या अस्सल, नुसत्या हाताने घडवलेल्या गोडस 'शिंदेशाही तोड्याला' खरोखरच तोड नाही.

पंढरपूरला, विठ्ठलाच्या घोट्याला वेटाळून राहिलेले हे अद्भुत तोडे पाहताना आजही दिठी विस्मयाने विस्फारते. मनगटी कर्तृत्व आणि खानदानी वैभवाचा मापदंड ठरलेल्या शिंदेशाही तोड्यांची भुरळ खुद्द विठूमाउलीलाही पडावी यात नवल ते काय. खरं तर हाच सन्मान आहे शिंदेशाही तोड्यांचा, ते घडवणाऱ्या 'शिंदेशाहीचा' आणि कणखर तरीही कलाप्रेमी महाराष्ट्राचा.

response.lokprabha@expressindia.com



छोटा पडदा

राधिका कुंटे

# मालिका वापसी

खरंतर करोनापूर्व, करोनाकाळ आणि करोनासोबत असे आपल्या जगण्याचे तीन भाग झाले आहेत. ते काही एकदम घट्टमुट्ट नाहीत. म्हणजे म्हटलं तर कालगणना, व्यावहारिक गोष्टींसाठी आहेतच. पण मनोव्यापार आणि मनोरंजन यांच्यासाठी त्यामध्ये थोडं अलीकडे-पलीकडे होऊ शकतं. आपलं मन आणि आपलं शरीर हे एकसाथ या करोनावस्थेला तोंड देत आहे. त्याला आपणच समजून घेणार नाही तर दुसरं कोण? करोनाच्याच बातम्या, करोनाचं सावट आणि करोनाखेरीज पूर, आर्थिक घसरण, घुसखोरी इत्यादी तितक्याच महत्त्वाच्या पण मन खंतावू शकतील अशा घटनांपासून चार घटकांचा विरंगुळा म्हणून छोट्या पडद्याकडं पाहिलं जातं. सर्वसामान्य प्रेक्षकांची हीच मानसिकता ओळखून आणि एक मोठी उलाढाल असणारा उद्योग म्हणून छोट्या पडद्यावरच्या वाहिन्यांनी-कलाकार, तंत्रज्ञ आणि एकूणच सगळ्या वाहिन्यांच्या चमूंनी मनाचा हिय्या केला. शासनानं परवानगी दिली आणि मालिकांचं चित्रीकरण सुरू झालं. सर्वतोपरी काळजी घेत असतानाही काही मालिकांमधील कलाकार किंवा तंत्रज्ञांना करोनाची लागण झालीच. मालिकेचं चित्रीकरण थांबवावं लागलं. मात्र इतरांनी घाबरून न जाता आपापल्या जबाबदाऱ्या नीट निभावल्या. नवीन मालिकांचे आराखडे आखले गेले. पॉझ घेतलेल्या मालिका पुढं सरकल्या, काही मालिका चक्क संपल्या आणि काही मालिका नव्यानं आल्या नि काही आकारल्यादेखील!

स्वतः आणि कुटुंबीयांवरचं करोनाचं संकट झेलत आणि निभावत बिग बी अर्थात अमिताभ बच्चन पुन्हा सेटवर परतले आणि सोनी टीव्हीवर 'केबीसी१२' सुरू होणार याची द्वाही समाजमाध्यमांवर फिरली. 'इट्स कमिंग बॅक... केबीसी... बिकॉज एव्हरी सेटबॅक नीड्स टू बी आन्सर्ड विथ ए कमबॅक' असं या मालिका वापसीचं वर्णन स्वतः बिग बींनी केलं आहे. त्यामुळे अर्थातच केबीसीच्या साइटवर पुढच्या पर्वासाठीची नोंदणी, प्रश्न, ऑडिशन इत्यादींबद्दलची माहिती उपलब्ध आहे.

सोनी मराठीवर 'आई माझी काळूबाई' ही मालिका १४ सप्टेंबरपासून सुरू होते आहे. 'जो माणुसकी जपतो, त्याला देव जपतो' ही टॅगलाइन असलेल्या मालिकेच्या प्रोमोमध्ये अलका कुबल काळूबाईच्या भूमिकेत दिसत असून प्राजक्ता गायकवाड आणि शरद पोंक्षे यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. तर स्टार प्रवाहवर 'मुलगी झाली हो' आणि 'फुलला सुगंध मातीचा' या मालिका अगदी नुकत्याच सुरू झाल्या आहेत. मुलगी होण्याचा व मुलगी असण्याचा अभिमान आणि समजूतदार जोडीदार असेल तर कोणतीही गोष्ट करणं अशक्य नाही असं या मालिकेची झलक दर्शवते आहे. तर झी मराठीवर 'लाडाची मी लेक गं' ही मालिका १४ सप्टेंबरपासून सुरू होत असून स्मिता तांबे आणि मिताली मयेकर या मालिकेच्या प्रोमोमध्ये दिसत आहेत.

नॅट जिओ वाइल्ड या वाहिनीवर गेल्या आठवड्यात तीन दिवस तीन भागांमध्ये 'लिव्हिंग विथ प्रिडेटर्स' हा मलायका वाझने दिग्दर्शित केलेला माहितीपट दाखवण्यात आला. सिंह, बिबट्या आणि वाघ या भक्षकांबरोबर लोक कसे राहतात, त्यांना कसं तोंड देतात, प्रसंगी त्यांच्याशी कसे दोन हात करतात किंवा कधी त्यांना देव मानतात, कधी त्यांच्यामुळे पर्यटन व्यवसायाला कशी चालना मिळते, तरुणाईला रोजगार कसा मिळतो आणि या सगळ्या मुद्द्यांमुळे या तीनही म्हटलं तर भक्षक म्हटलं तर रक्षक अशा जीवांचं संरक्षण होणं हे आज घडीला किती आणि कसं आवश्यक आहे, त्यासाठी कोणते प्रयत्न होत आहेत या सगळ्या त्यांच्याभोवती फिरणाऱ्या, रचल्या गेलेल्या जगाची झलक या माहितीपटातून दिसते.

सध्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक गोष्ट कायम आहे आणि ती असावीच अशी प्रत्येकाचीच अपेक्षा आहे. ती गोष्ट म्हणजे मास्क. हा मास्क कसा असावा, त्याचा उपयोग कुणी केव्हा नि कसा करावा वगैरे गोष्टींवर भरपूर माहिती लिहून आलेली आहे. त्याचे प्रकार, आकार-उकार, मटेरिअल वगैरे वगैरेविषयीही आपल्याला माहिती असते. अनेकदा माध्यम आणि समाजमाध्यमांवर काही फॅशनेबल मास्कची माहितीही मिळते. त्याखेरीज खुद्द नामवंत फॅशन डिझाइनर्सनी तयार केलेल्या मास्कविषयी आणि त्यांच्या लॉकडाऊनकाळातल्या उपक्रमांविषयी जाणून घ्यायचं असेल तर टीएलसी वाहिनीवर सध्या १५ मिनिटांची एक लघुमालिका सादर होत आहे, ती बघायला हवी. तरुण ताहिलियानी, अनिता डोंगरे, गौरव गुप्ता, मनीष मल्होत्रा, राहुल मिश्रा या फॅशन डिझाइनर्सच्या कल्पना आणि संकल्पनेच्या मिलाफातून साकारलेले मास्क आपण वापरू किंवा नाही हा भाग वेगळा पण ते बघायला काहीच हरकत नाही. हे मास्क 'मिंत्रा'वर उपलब्ध आहेत. थोडक्यात मालिकांच्या वापसीमुळे करोनाच्या नैराश्यजनक वातावरणाला कंटाळलेल्या प्रेक्षकांना थोडासा विरंगुळा नक्कीच मिळू लागला आहे.

response.lokprabha@expressindia.com

**वेबसिनेमा**

वैशाली चिटणीस

# आपण आणि ते

'अखुनी' हा नेटफ्लिक्सवर असलेला सिनेमा दिल्लीत राहणाऱ्या पूर्वोत्तर राज्यांमधल्या विद्यार्थ्यांचं जगणं मांडतो. आपल्याच देशात चिनी, नेपाळी अशी केली जाणारी संभावना, वेगवेगळ्या कारणांसाठी इतर नागरिकांच्या रोषाला सामोरं जावं लागणं, कधी त्यांच्याकडून होणारी मारपीट या सगळ्याला तोंड देत आपल्या पद्धतीने ही मुलं कशी जगतात हे मांडताना दिग्दर्शक निकोलस खारकोंगर यांनी विनोदाच्या अंगाने जात उर्वरित भारतीयांच्या मनोवृत्तीवर नेमकं बोट ठेवलं आहे. दिग्दर्शक स्वतः नागालॅण्डच्या खासी समाजामधला आहे. आपण आपल्याच कोषात जगताना या देशातल्या सांस्कृतिक वैविध्याचं भान बाळगत नाही, सांस्कृतिक वैविध्य हे आपल्या देशाचं वेगळेपण आहे हेच समजून घेत नाही आणि सांस्कृतिक सपाटीकरणाच्या आग्रहाला सरसकट बळी पडतो म्हणजे नेमकं काय हे अखुनीमधून समोर येतं. आपल्याला जे म्हणायचं आहे त्याबद्दल एक अवाक्षरही न काढता हा दिग्दर्शक प्रेक्षकांच्या डोळ्यात अंजन घालून जातो.

अखुनी हा नागालॅण्डमधल्या सुमी भाषेमधला शब्द आहे. अखु आणि नी असे ते दोन शब्द आहेत. अखु म्हणजे वास आणि नी म्हणजे उग्र. त्यामुळे अखुनी म्हणजे उग्र वास. पण अखुनी हा नागा लोकांचा विशेषप्रसंगी मेजवानीत करायचा खास पदार्थ आहे. पोर्क करताना त्यात अखुनी नावाचा मसाल्याचा पदार्थ घालतात. त्याचा अतिशय उग्र वास येतो. या पदार्थाला बहुधा अखुनी म्हणत असावेत. हा पूर्वोत्तर राज्यांमध्ये लग्नप्रसंगी केला जाणारा लोकप्रिय असा विशिष्ट पदार्थ. पूर्वोत्तर राज्यातल्या नागरिकांना त्या वासाची सवय असेल, पण इतरत्र लोकांना तो वास सहन होत नाही.

दिल्लीत शिक्षणासाठी येऊन राहिलेल्या पूर्वोत्तर राज्यातल्या काही विद्यार्थ्यांपैकी एकीचं लग्न आहे. आपल्याकडे जसं लग्न म्हटलं की जेवणात काही विशिष्ट पदार्थ पाहिजेतच, तसंच त्यांच्याकडे लग्न म्हटलं तर अखुनी केलीच पाहिजे. त्याप्रमाणे ही जेमतेम विशीमधली पूर्वोत्तर राज्यातली मुलं आपल्या मैत्रिणीच्या लग्नानिमित्त तिला सरप्राइज देण्यासाठी अखुनीचा घाट घालतात. त्या वासामुळे त्यांना दहा ठिकाणांहून हाकललं जातं. पण शेवटी युक्त्या लढवून ते आपला बेत तडीस नेतात असं या सिनेमाचं साधारण कथानक आहे. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या साहाय्याने ती मुलगी आणि तिचे मित्र-मैत्रिणी दिल्लीतून या लग्नात सहभागी होतात. गंमत म्हणजे ज्या मुलीचं लग्न आहे ती दिल्लीतच आहे. गावी तिच्या लग्नासाठी लोक जमले आहेत आणि तिच्या जागेवर डमी म्हणून लग्नासाठी तिच्या बहिणीला बसवलं आहे. पण प्रत्यक्षात लग्न मात्र दिल्लीत असलेल्या या मुलीचं झालं असं जाहीर केलं जातं. हे बघितल्यावर आपल्या देशातल्या विविध जातीजमाती, त्यांच्या प्रथा परंपरा, त्यातलं

वैविध्य, लवचीकता यांची मनापासून गंमत वाटल्याशिवाय राहात नाही.

एका दिवसातील काही तासांच्या कालावधीत हा सिनेमा घडतो. आसाम, मिझोराम, सिक्कीम, नागालॅण्ड इथून दिल्लीत आलेली ही मुलं दिल्लीत साधारणपणे पूर्वोत्तर राज्यांमधली मुलं जिथे बहुसंख्येने राहतात त्याच हुमायुनपूर भागात राहतात. त्यांच्या खाद्यपदार्थांवरून त्यांना सतत टोकलं जातं आहे. सिनेमात एकही स्टार कलाकार नाही. आहेत ती बरीचशी पूर्वोत्तर राज्यांमधली मुलंमुली. त्या राज्यांमध्ये मातृसत्ताक पद्धत आहे. सिनेमातही मुलींचं प्रमाण अधिक आहे. त्यांचंच वर्चस्व दाखवलं आहे. अर्थात एकत्र वावरणाऱ्या या मुलांचा एकमेकांमध्ये भेदभाव आहे. त्यांच्यात वावरणाऱ्या उपासनाला ती नेपाळी असल्यामुळे ते पूर्णपणे त्यांच्यामधली समजत नाहीत. तिला त्यांचे बरेच पदार्थ माहीत नाहीत. तिलाही अखुनीचा वास आवडत नाही. अशा पद्धतीने अन्न हा भारतीय समाजाला एकाच वेळी जोडणारा आणि तोडणारा घटक कसा आहे हा मुद्दा दिग्दर्शकाने या सिनेमातून अतिशय संवेदनशील रीतीने मांडला आहे. त्याला विनोदाची डूब दिल्यामुळे खरं तर त्याचं गांभीर्य अधिक टोकदार झालं आहे.

सिनेमा सुरू होतो तेव्हा मणिपुरी चंबीला आणि उपासना या तिच्या नेपाळी बेस्टफ्रेण्डला त्यांची घरमालकीण चिडून विचारते की घाणेरडा वास येईल असा पदार्थ तयार करायचा नाही, असं तुम्हाला आधीच सांगितलं होतं की नाही, मग काय चाललंय तुमचं आत्ता? का हा घाण वास येतोय? पण याच घरमालकाचा शिव हा म्हटलं तर वेंधळा दिसणारा वागणारा मुलगा या पूर्वोत्तर राज्यातल्या मुलांना त्यांच्या प्रत्येक अडचणीत सगळ्या प्रकारची मदत करतो. एकीकडे या मुलांना सगळ्या जागी होणारा विरोध आणि दुसरीकडे या मुलांच्या जवळ येऊ पाहणारा, त्यांना सर्व त्या प्रकारची मदत करू पाहणारा त्यांच्याच वयाचा तरुण भारतीय मुलगा सिनेमात दिसतो. शिवबद्दल या मुलांच्या मनात तटस्थता आहे. त्याला त्यांच्यात, त्या लग्नसमारंभात सामावून जायचं आहे, पण या मुलांना एरवी इथल्या लोकांचे अनुभव असे आहेत की त्यांना शिवकडून मदत घ्यायची आहे, पण त्याला आपल्यात अजिबात सामावून घ्यायचं नाहीये. त्यांना मदत करताना शिवची एक मजेशीर अट आहे की मला एक पूर्वोत्तर राज्यामधली गर्लफ्रेण्ड मिळवून द्या. कारण अशी गर्लफ्रेण्ड मिळणं हा त्याच्या भागातला, त्याच्या वयाच्या मुलांचा स्टेट्स सिम्बॉलही आहे. बेदांग त्याला 'यू ००० इंडियन्स' अशी शिवी देतो तेव्हा शिव त्याला अगदी सहजपणे विचारतो की, 'अरे, तुम्ही स्वतःला इंडियन्स समजत नाही का?' अशा साध्या साध्या प्रसंगांमधून सिनेमा बरंच काही मांडून जातो. झोरम, उपासनासारख्या व्यक्तिरेखा दोन्ही बाजू नीट समजून घेऊ पाहतात.

सिनेमात मार्था नावाची व्यक्तिरेखा आहे. या पूर्वोत्तर राज्यातल्या मुलीने एका पंजाबी शीख मुलाशी लग्न केलं आहे. मार्थाने पूर्वोत्तर राज्यातल्या मुलांना या शहरात काय काय सोसावं लागतं ते अनुभवलेलं आहे आणि ती या मुलांना सतत कशाकशामुळे त्यांची लोकांशी भांडणं होऊ शकतात ते सांगत राहाते. चंबी मार्थाला विचारते की, आम्हाला इथं हवं ते अन्न शिजवण्याचा अधिकार आहे की नाही? तिला मार्थाने दिलेलं उत्तर मोठं मार्मिक आहे. ती म्हणते, दे हॅव राइट नॉट टू सफर अवर फूड. नाऊ हूज राइट इज मोअर राइट, टेल मी.

आपण सांस्कृतिक वैविध्याचा आणि एकतेचा कितीही जयघोष करत असलो तरी आपल्याच देशातल्या आपल्यापेक्षा वेगळ्या प्रथा परंपरा असलेल्या लोकांना आपण सहन करू शकत नाही यावर 'अखुनी' अगदी अलगद बोट ठेवतो. यातल्या प्रत्येकाची एक कहाणी आहे. चंबीच्या बॉयफ्रेण्डला बेदांगला दिल्लीत एका समुदायाने चिनी म्हणून पिटलं आहे. तो त्यातून मरता मरता वाचला आहे. त्याची वेदना त्याच्या चेहऱ्यावर शेवटपर्यंत दिसत राहते. 'मै इस शहर से नफरत करता हूँ, तू आहेस म्हणून मी इथं आहे' असं तो चंबीला रडतरडत सांगतो. तेव्हापासून तो त्याची मित्रमंडळी वगळता कुणाही भारतीय नागरिकाशी बोललेला नाही. पण चंबीही त्याला सांगते की इतक्या वर्षांत तूदेखील इथं एक वेगळं पूर्वोत्तर राज्यच तयार केलं आहेस. तू तरी इथं कुणाशी मैत्री केली आहेस? आहे तुला एक तरी इथला मित्र? त्यांच्यातले काही जण आपल्याशी वाईट वागतात हे खरं आहे. पण बाकीचे सगळेच जण आपल्याशी चांगले वागतात. म्हणूनच आपण सगळे इथे आहोत. बेदांगची ही व्यक्तिरेखा सत्य घटनेवरून घेतली असावी. निडो तानिझम नावाच्या अरुणाचल प्रदेशमधल्या मुलाला २०१४ मध्ये दक्षिण दिल्लीमध्ये एका समूहाने ठार केलं होतं. तेव्हापासून देशात ठिकठिकाणी अशा प्रकारांना सामोरे जाणारे पूर्वोत्तर राज्यातले विद्यार्थी आवाज उठवायला लागले आहेत.

मेजवानीसाठी एक पदार्थ तयार करण्यासाठी या मुलांना इतक्या लोकांच्या मिन्नतवाऱ्या करत फिरावं लागतं की आपोआपच दुय्यम नागरिकत्व असल्यासारखं त्यांचं वागणं होत जातं. हुमायुनपूरच्या चिंचोळ्या गल्ल्यांमधून वावरताना या मुलींना नेहमीच पुरुषी तसंच वंशवादी कॉमेंट्स ऐकून घ्याव्या लागतात. एखादी त्याविरुद्ध उभी राहिली तर बाकीचा समाज त्यांच्याशी आकस ठेवून वागतो. दिग्दर्शक काही काळ दिल्लीत वावरलेला असल्यामुळे हे सगळं तो अनुभवातून सांगतो आहे हे लक्षात येतं.

सयानी गुप्ता, लीन लीआश्रम, विनय पाठक, डॉली अहलुवालिया, तेनजीन डेल्हा आणि इतर कलाकार सिनेमात आहेत. सयानी गुप्ता, विनय पाठक, डॉली अहलुवालिया वगळता बहुतेक सगळे कलाकार अनोळखी आहेत. पण त्यांची कामं चांगली झाली आहेत. त्यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखा सामान्य मुलांच्या आहेत. कसल्याच मोठ्या महत्त्वाकांक्षा नसलेली, एका मोठ्या शहरात येऊन राहिलेली ही साधी मुलं आहेत. त्यामुळे सिनेमा आपोआपच नॉन ग्लॅमरस होतो. सगळ्या गोष्टी आपल्यासमोरच घडत आहेत असं वाटत राहातं. सिनेमाला एक अंगभूत वेग आहे. भराभर घटना आपल्यासमोर येत जातात. कुठेही रेंगाळत नाही.

गेल्या काही काळात मुंबईतदेखील मांसाहार करणाऱ्यांविरोधात वाद निर्माण झाला होता. एका समुदायाला मांसाहाराचा वास सहन होत नसल्याने असे लोक आपल्या इमारतीत नकोत अशी चर्चा सुरू झाली होती. त्याच शहरात राहणाऱ्या लोकांबाबत असा विचार केला जात असेल तर देशाच्या वेगळ्या राज्यांतून आलेल्या, वेगळ्या लूकमुळे उठून दिसणाऱ्या नागरिकांना कशाकशाला सामोरं जावं लागत असेल, त्यांचे खाद्यपदार्थ घरी तयार करून खाणं हा त्यांचा हक्क नाही का?

देशात कुठेही सामावून घेतलं जाणं आणि भारतीय घटनेने दिलेला देशात कुठल्याही राज्यात, शहरात वावरण्याचा अधिकार या मुद्द्यांवर 'अखुनी'ने बोट ठेवलं आहे. आवर्जून पाहावा असा हा सिनेमा आहे.

response.lokprabha@expressindia.com

# कॅमेऱ्याची स्वामिनी

पडद्यामागचे

विजया जांगळे

चित्रपट असो वा मालिका, त्यातल्या प्रत्येक दृश्याचे पहिले प्रेक्षक असतात सिनेमॅटोग्राफर किंवा छायाचित्रण दिग्दर्शक (डीओपी). एखादं दृश्य पडद्याच्या चौकटीत जिवंत करण्याची, ते अधिक सुंदर आणि समर्पक करण्याची जबाबदारी त्यांना समर्थपणे पेलावी लागते. दृश्य अधिकाधिक परिणामकारक करण्यात, प्रेक्षकाला प्रत्यक्ष घटनास्थळी असल्याचा अनुभव मिळवून देण्यात त्यांची भूमिका अनन्यसाधारण असते. अशाच अनेक हिंदी-मराठी मालिका, चित्रपट आणि जाहिरातींतून प्रेक्षकांना वास्तवदर्शी अनुभूती देणाऱ्या कलाकार आहेत, कस्तुरी शेलार. सध्या स्वामिनी या कलर्स मराठीवरच्या लोकप्रिय मालिकेतून पेशवाईचं वैभव पडद्यावर जिवंत करण्याची धुरा त्यांच्या खांद्यावर आहे. मनोरंजन क्षेत्रात कॅमेऱ्यामागे महिला आजही अभावानेच दिसतात, पण कस्तुरी मात्र गेली १८ वर्षं अतिशय आत्मविश्वासाने आणि समरसून सिनेमॅटोग्राफी करत आहेत.

९ ते ६ नोकरी करायची नाही, हे कस्तुरीने अगदी सुरुवातीलाच ठरवलं होतं. घरात कलेची पार्श्वभूमी होती. खेळांची आवड होती. शाळा-कॉलेजमध्ये ती वर्गात कमी आणि मैदानावरच अधिक काळ असे. आपल्या कॉलेजमधल्या दिवसांविषयी कस्तुरी सांगतात, 'बीएमएम कॉलेजमध्ये इंटिरिअर डिझायनिंग शिकत होते. मला एनसीसी जॉइन करायचं होतं. पण तेव्हा मी अतिशय हाडकुळी होते. त्यामुळे उन्हातान्हातलं ट्रेनिंग तुला झेपणार नाही, असं सांगून शिक्षकांनी मला सहभागी करून घ्यायला नकार दिला. मग मी दुसरा पर्याय शोधला आणि रोड सेफ्टी पेट्रोल जॉइन केलं. खो-खो, रनिंग वगैरे सुरू होतंच. कॉलेजसाठी राष्ट्रीय स्तरावरच्या क्रीडा स्पर्धा जिंकणारी विद्यार्थिनी म्हणून सर्व जण ओळखायचे. पण या सगळ्या खेळांच्या नादात अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष होत होतं. एकदा वर्गशिक्षकांनी बोलावलं आणि विचारलं की, आयुष्यात काय करायचं आहे, हे ठरवलं आहेस का? तुला स्पोर्ट्समध्येच करिअर करायचं असेल, तर आर्ट्सला ॲडमिशन घे. इंटिरिअरचा अभ्यास भरपूर असतो. दोन्ही एका वेळी जमणार नाही... त्यांचा प्रश्न मला वास्तवात घेऊन आला. मी विचार केला. खेळांची आवड कितीही असली तरी त्यात करिअर होणं कठीण आहे, हे माहीत होतं. त्यामुळे मग त्यानंतर अभ्यासावर लक्ष केंद्रित केलं. मॉडेल मेकिंग, सेट डिझायनिंगचे कोर्स केले.'

कस्तुरीचं शिक्षण तर इंटिरिअरमध्ये झालं होतं, पण त्या क्षेत्रात तिचं मन काही रमेना. छायाचित्रण शिकून पाहावं असं वाटू लागलं. दादरमधल्या एका संस्थेतून त्या

संदर्भातला एक डिप्लोमा कोर्स केला आणि प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर दीपक मालवणकर यांची साहाय्यक म्हणून काम करू लागली. कॅमेऱ्यामागची ही नवी भूमिका तिला आवडू लागली. 'क्यूं की सास भी कभी बहू थी', 'कहानी घर घर की', 'पवित्र रिश्ता', 'संजीवनी' अशा त्या काळात गाजलेल्या अनेक हिंदी मालिकांसाठी तिने काम केलं.

राजू मवानी यांच्या 'अनुराधा' चित्रपटाचं काम मालवणकरांकडे होतं. गुजरातमध्ये चित्रीकरण होतं आणि त्यासाठी कस्तुरी यांना पाठवण्यात आलं. त्यांचं काम मवानींना खूप आवडलं आणि त्यांनी आपल्या 'लाखो है यहाँ दिलवाले' या चित्रपटाच्या सिनेमॅटोग्राफीची धुरा कस्तुरी यांच्यावर सोपवली. त्यांचं पहिलं स्वतंत्र काम एक मालिका किंवा जाहिरात नसून थेट एक हिंदी चित्रपट होता.

छायाचित्रणाचं इतकं जुजबी औपचारिक शिक्षण घेतलं असताना, कामात काही अडथळे आले नाहीत का, असं विचारलं असता कस्तुरी सांगतात, 'गाडी चालवणं जसं पुस्तकात वाचून शिकता येत नाही, समोर खड्डा आल्यावर काय करायचं, ट्रॅफिकमधून कशी काढायची हे जसं चालवता चालवताच शिकावं लागतं, तसंच सिनेमॅटोग्राफीचंही आहे. मी प्रत्यक्ष काम करता करता अनुभवातून शिकले. त्यामुळे आज कोणतीही समस्या उद्भवली तरी काम अडत नाही. त्यातून मार्ग कसा काढायचा हे माहीत असतं.'

कॅमेऱ्यामागच्या व्यक्तीला एडिटिंगपासून म्युझिकपर्यंत चित्रीकरणाशी निगडित प्रत्येक गोष्टीचं ज्ञान असणं आवश्यक असतं. कोणत्या प्रसंगासाठी कशा प्रकारचा प्रकाश हवा, प्रकाशाचा योग्य वापर करून मुख्य व्यक्तिरेखा कशी अधोरेखित करता येईल, हे ओळखता यायला हवं. 'स्वामिनी'चं उदाहरण द्यायचं झालं तर गोपिकाबाईंवर पडणारा प्रकाश आणि त्यांच्या दासीवर पडणारा प्रकाश सारखाच असून चालणार नाही. किंवा बाजीराव पेशवे दाखवताना त्यांची संपूर्ण शरीरयष्टी, पगडी, कपडे, त्यांच्याभोवतीचं वलय, शनिवारवाडा हे त्यांच्या अस्तित्वाशी संबंधित सर्व घटक दर्शवले तरच योग्य परिणाम साधला जातो. सिनेमॅटोग्राफीमध्ये गणित आणि विज्ञानाचा मेळ साधावा लागतो. कॅमेरा किती अंतरावर हवा, कोणत्या स्वरूपाच्या दृश्यासाठी कोणती लेन्स वापरावी हे लगेच लक्षात यायला हवं. प्रत्येक कृती करताना ती आपण का करत आहोत हे आधी आपल्याला पक्कं माहीत असलं पाहिजे, समोरच्या व्यक्तीला समजावून सांगता आलं पाहिजे. नाही तर गृहीत धरणं, आपल्यावर प्रभुत्व गाजवण्याचा प्रयत्न करणं असे प्रकार सुरू होतात,' असं त्या सांगतात.

या क्षेत्रात महिलांची संख्या फारच कमी आहे, त्यामुळे कॅमेरामागे महिलेला पाहणं अद्याप अनेकांच्या अंगवळणी पडलं नसल्याचं त्या सांगतात. 'सिनेमॅटोग्राफी हे काही एकट्या व्यक्तीचं काम नाही. तुम्हाला तुमचे साहाय्यक, प्रकाशयोजना करणारे, लेखक, दिग्दर्शक, वेशभूषाकार सर्वांशीच संवाद साधावा लागतो. आजही अनेक पुरुषांना बाईकडून सूचना येणं सहन होत नाही. तिला न जुमानण्याचे, ते नाही जमलं तर कामात अडथळे आणण्याचे प्रयत्न केले जातात. हे सगळं नियंत्रणात ठेवलं नाही तर त्याचा परिणाम कामाच्या दर्जावर दिसू शकतो. त्यामुळे योग्य वेळी कठोर भूमिका घ्यावीच लागते. प्रत्येकाला त्याच्या जबाबदारीची जाणीव करून द्यावी लागते. आपल्याला हवं तसं काम होत नसले, तर ते स्वतःच करण्याऐवजी, समोरच्या व्यक्तीला कधी समजावून तर कधी कठोर शब्दांत सांगून करून घेता यायला हवं. खरोखरच आणीबाणीचा प्रसंग असेल, तर स्वतःही पडेल ते काम करण्यासाठी तयार राहायला हवं. आपल्या कामात आपण उत्तमच असायला हवं. आपण हे सगळं करू शकलो, तर समोर १०० पुरुष असले, तरी ते तुम्हाला कमी लेखू शकत नाहीत. त्यांना तुमचं म्हणणं ऐकावंच लागतं,' असं त्या सांगतात.

सध्या कोविडमुळे सेटवर पूर्वीसारखे खूप कर्मचारी बोलावता येत नसल्यामुळे अनेक मालिकांच्या चित्रीकरणात आव्हानं येत आहेत. पण कस्तुरी यांना मात्र ही संकटातली संधी वाटते. 'माझ्याकडे अमुक एक कॅमेरा नाही, अमुक प्रकारची लेन्स नाही, लाइट्स नाहीत, म्हणून कुरबुर करण्यापेक्षा उपलब्ध साधनसामुग्रीत सर्वोत्तम काय देता येईल, याचा विचार केला की सगळंच सोपं होऊन जातं, असं मला वाटतं. स्वामिनीच्या सेटवर सध्या आमची निम्मीच टीम उपस्थित राहू शकते. आमच्या सहा लाइटमनपैकी केवळ तीनच चित्रीकरणाला उपस्थित असतात. पण तरीही प्रकाशयोजनेत फारसे अडथळे आलेले नाहीत. मला नैसर्गिक प्रकाशाचा उपयोग करणं आवडतं. त्यामुळे माझ्यासाठी ही संधीच ठरली आहे. गेले काही दिवस आम्ही प्रकाशयोजनेत अनेक प्रयोग करत आहोत आणि त्यांचा उत्तम परिणाम मिळत आहे. अनेकदा विनाकारण खूप कृत्रिम लाइट्स वापरून चांगल्या दृश्याचं मातेरं केलं जातं. नैसर्गिक प्रकाशाएवढा उत्तम परिणाम कशातूनच मिळत नाही.'

वाईटातूनही चांगलं शोधण्याचा हा गुण कस्तुरीमध्ये त्यांच्या आईकडून आला आहे. त्याविषयी त्या सांगतात, 'मी महत्त्वाकांक्षी आहे. त्यामुळे आपल्याकडे नेहमी लहानच कामं का येतात, संजय लीला भन्सालींसारखे उत्तम, मोठे प्रोजेक्ट आपल्याला का मिळत नाहीत, असा प्रश्न मला नेहमी पडत असे. त्यावरून मी अनेकदा निराश होत असे. एकदा आई म्हणाली, मोठं काम मिळत नाही म्हणून काय झालं, तू तुझं प्रत्येक

लहान-मोठं काम खूप मोठं आणि अतिशय महत्त्वाचं आहे, असाच विचार करून करत राहा. मग ही लहान कामंच तुला मोठं यश मिळवून देतील... माझ्यासाठी तो अक्षरशः साक्षात्कारासारखा क्षण होता. तेव्हापासून मी प्रत्येक काम पूर्ण झोकून देऊन करू लागले. कामातून आनंद मिळू लागला. माझे बाबा नेहमी सांगायचे, वक्तशीरपणा खूप महत्त्वाचा आहे. आपल्याकडे अनेकांना असं वाटतं, कोणत्याही मीटिंगला किमान अर्धा तास तरी उशिराच जायला हवं. तरंच आपण खूप महत्त्वपूर्ण व्यक्ती असल्यासारखं वाटतं. पण मी कधीही मीटिंगच्या १०-१५ मिनिटं आधीच संबंधित ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे ऐनवेळी होणारी घाई-गडबड आणि त्यातून प्रत्यक्ष मीटिंगमध्ये बोलताना होणारे घोळ टाळता येतात. मझ्याकडे माझी कौशल्यं आणि पालकांनी केलेले संस्कार एवढीच शिदोरी आहे. आजवर जे काही मिळवलं आहे ते केवळ तेवढ्याच गोष्टींच्या जोरावर मिळवलं आहे,' असं कस्तुरी अभिमानाने सांगतात.

या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांना सांगतात, 'आपली कौशल्यं सतत टोकदार करत राहिलं पाहिजे. उत्तमोत्तम कलाकृतींचा सखोल अभ्यास करण्याला पर्याय नाही. इंटरनेटने ज्ञान-तंत्रज्ञानाचं मोठं भांडार खुलं केलं आहे. अभ्यासासाठी त्याचा पुरेपूर उपयोग करून घ्या. इथे येऊ इच्छिणाऱ्या मुलींनी एक पक्कं लक्षात ठेवावं, अनेक लोक सांगतात, की इथे थोडं कॉम्प्रोमाइज करावंच लागतं. पण असं काही नाही. तुमच्यात कौशल्यं असतील, मेहनत करण्याची तयारी असेल, तर अशा तडजोडींची अजिबात गरज नाही. हे शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अतिशय थकवणारं आणि वाटेत सतत नवनवी आव्हानं उभी करणारं क्षेत्र आहे. त्यामुळे तशी मानसिक तयारी ठेवा. तुम्हाला तासन्तास उन्हातान्हात, थंडी-वाऱ्यात कॅमेरामागे उभं राहायचं आहे. त्यामुळे प्रकृती उत्तम हवी. आहार-व्यायामाकडे लक्ष दिलंच पाहिजे. सिनेमॅटोग्राफी म्हणजे केवळ ग्लॅमर नाही, त्यामागे रात्रन्दिवस करावी लागणारी मेहनत आहे, याची जाणीव त्या उदयोन्मुख सिनेमॅटोग्राफर्सना करून देतात.

कस्तुरी यांनी विविध प्राकरची कामं केली आहेत. सलमान खान, हार्दिक पंड्या यांच्या जाहिरातींचं चित्रीकरण केलं आहे. 'संत ज्ञानेश्वर' ही कलर्स वाहिनीवरची पहिली एचडी मालिका केली आहे, 'उल्लू' या ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी 'प्रभा की डायरी' ही काहीशा बोल्ड विषयावरची वेबमालिका चित्रित केली आहे. 'माय विश' या लघुपटातून त्यांनी दिग्दर्शनाच्या क्षेत्रातही पदार्पण केलं आहे. आई आणि तरुण मुलाच्या नात्याविषयीचा हा लघुपट आहे. आपल्या या लघुपटाची अनेकांनी प्रशंसा केल्याचं आणि त्याला विविध चित्रपट महोत्सवांत पुरस्कारही मिळाल्याचं त्या सांगतात.

कस्तुरी यांना भविष्यात दिग्दर्शनाच्या क्षेत्रात यायचं आहे. 'माय विश' हे त्या दिशेने टाकलेलं पहिलं पाऊल! त्याविषयी त्या सांगतात, 'मला आज ना उद्या दिग्दर्शन करायचं आहेच. त्यामुळे मी त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत. चित्रपटाशी संबंधित प्रत्येक लहान-मोठ्या बारकाव्यांचा सखोल अभ्यास केल्याशिवाय उत्तम दिग्दर्शक होता येणं अशक्य आहे. त्यामुळे त्या दृष्टीने अभ्यास सुरू केला आहे. एखादा चित्रपट मी पहिल्यांदा केवळ आनंदासाठी पाहते. पण तो आवडला तर परत एकदा केवळ त्यातल्या दिग्दर्शनासाठी, आणखी एकदा त्यातल्या सिनेमॅटोग्राफीसाठी, एकदा वेशभूषेसाठी, एकदा अभिनयासाठी, एकदा पटकथेसाठी असा पुन्हा पुन्हा पाहते. त्या वेळी मी त्याच्या अन्य पैलूंकडे लक्ष न देता केवळ तेवढ्याच एका पैलूचं निरीक्षण करते. त्यातून त्या कलाकृतीत नेमकं काय आहे, ज्यामुळे ती आपल्याला का आवडली, हे लक्षात येतं. आपल्या कामात आपण काय सुधारलं पाहिजे, काय टाळलं पाहिजे, हे कळू लागतं.'

आज मागे वळून पाहताना सिनेमॅटोग्राफर होण्याचा आपला निर्णय अतिशय योग्य होता, असं कस्तुरी यांना वाटतं. 'काम करतानाचा प्रत्येक क्षण हा भरभरून आनंद देणारा असतो. सेटवर गेल्यावर काम सोडून काहीही सुचत नाही. तिथे गेले की नटराज दोन्ही हात पुढे करून माझं स्वागत करतोय असं वाटतं,' असं त्या सांगतात. एका कलाकाराला यापेक्षा वेगळं आणखी काय हवं!

response.lokprabha@expressindia.com

# आंधळा डोळा, काजळाने साजरा

वैशाखाच्या काहिलीत पावसाची आतुरतेने वाट पाहणारं मन भाद्रपदात ओल्या कापडांच्या कुबट वासाने गुदमरायला लागतं. हा पावसाळा सरतोय की नाही असं वाटत असतानाच कार्तिकाची सुखद हवा सुरू होते. हा बदल किंवा परिवर्तन निसर्गाचा स्थायिभाव आहे, तसा तो भाषेचाही आहे. प्रत्येक जिवंत भाषेत असे बदल सातत्याने होत असतात. मराठीत अशा अर्थबदलाची म्हणजे अर्थपरिवर्तनाची किती तरी उदाहरणे सांगता येतील. अलीकडे मराठीतील 'संपन्न' शब्द हिंदीच्या अर्थाने वापरण्याकडे मराठी भाषकांचा कल वाढताना दिसतोय. काही वर्षांपूर्वी मराठीत सणांप्रमाणे वर्धापन दिन किंवा मराठी भाषा दिन यांसारखे कार्यक्रमही 'साजरे' केले जायचे. अलीकडे मात्र हिंदीप्रमाणे मराठीतही कार्यक्रम 'संपन्न' होऊ लागलेले आपण मोठ्या प्रमाणात ऐकतो, वाचतो आहोत. हा बदल किती मोठ्या प्रमाणात होतोय यासाठी गूगलची साक्ष घेता येईल. गूगलवर 'संपन्न झाला' हे शब्द टंकून शोध घेतल्यास एक-दोन नव्हे तब्बल दहा पानी परिणाम आढळून येतात. पैकी एखाददुसरा परिणामच हा मराठीतील 'संपन्न'चा मूळ अर्थ दर्शवणारा आहे.

मराठी आणि हिंदी दोन्ही भाषांतील 'संपन्न'चे मूळ संस्कृतमध्ये असले तरी दोन्ही भाषांनी आपापल्या प्रकृतीनुसार त्याचे भिन्न अर्थ स्वीकारल्याचे दिसते. 'संपन्न' शब्दाचे मूळ संस्कृतमधील 'समापन्न' शब्दात आहे. संस्कृतमध्ये त्याचा अर्थ युक्त, सहित, पूर्णत्व, समाप्त असा होतो. पैकी युक्त, सहित या अर्थच्छटा स्वीकारून वैभवसंपन्न, प्रतिभासंपन्न असे शब्दप्रयोग मराठीत केले जाऊ लागले. मात्र वैभवाच्या संदर्भात त्याचा वापर अधिक वाढून हळूहळू श्रीमंत, वैभवशाली असा अर्थसंकोच झाला असावा. हिंदी भाषेत 'समापन्न' शब्दाच्या पूर्णत्व, समाप्त या अर्थच्छटेवर भर दिला जातो. अलीकडे मराठीनेही हिंदीतील याच अर्थाने 'संपन्न' शब्द वापरण्यास सुरुवात केलेली दिसते. यातायात, उदंड हे शब्दही मराठी आणि हिंदीत अशा प्रकारे भिन्न अर्थाने वापरले जातात.

हिंदीचं अनुकरण करण्याच्या आधी मराठीत कार्यक्रमासाठी 'साजरा झाला/केला' असे शब्दप्रयोग सर्रास रूढ होते. या 'साजरा'ची विविध शब्दप्रयोगांत गुंफलेली रूपं पाहणं मोठं गमतीचं आहे. 'हासरा नाचरा जरासा लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला' या कुसुमाग्रजांच्या कवितेतून किंवा 'एक लाजरा अन् साजरा मुखडा, चंद्रावानी खुलला गं' या जगदीश खेबूडकरांच्या गीतातून 'साजरा - लाजरा' यांचा अनुप्रास मनात इतका घट्ट रुजलाय, की एक उच्चारला की दुसरा शब्दही आठवतोच! साजरा शब्दाचा सुंदर, देखणा या अर्थांपर्यंत झालेला प्रवास पाहण्यासाठी आपल्याला सज - साज - सजणे ही साखळी लक्षात घ्यावी लागते. कृ. पा. कुलकर्णी यांच्या मते सजणे, साजरा या शब्दांचे मूळ 'सज्ज - सस्ज' या संस्कृत शब्दांत आहे. त्याचा मूळ अर्थ धनुष्याची दोरी वगैरे ताणून लढण्याच्या तयारीत असणे असा आहे. कालांतराने त्याचे सामान्यीकरण होऊन कोणत्याही गोष्टीसाठी तयार होणे असा अर्थ प्राप्त झाला. तयार होण्यासाठी अनेक साहित्यांची जुळवाजुळव करावी लागते यावरून आज साज म्हणजे शोभा आणणारे साहित्य, वाद्यसामग्री, सरंजाम, दागिने अशा अर्थच्छटा या शब्दाला प्राप्त झालेल्या आहेत. सजणे, सजवणे ही क्रियापदे सुरुवातीला कोणत्याही तयारीसाठी आणि कालांतराने नटणे, शृंगार अशा विशिष्ट अर्थाने वापरली जाऊ लागली. सण, समारंभ, कार्यक्रम यांच्यासाठी साजरा क्रियापदाचा वापर याच अर्थाने केला जातो. फारसीतही शृंगार या अर्थाने साझ् शब्द आहे, हे लक्षणीय आहे.

अलीकडे मात्र देखणा, सुंदर या अर्थाने साजरा शब्दाचा वापर होईनासा झाला आहे. पूर्वी या अर्थाने त्याचा वापर किती विविधांगी केला जात होता हे दर्शवणाऱ्या काही म्हणी - वाक्प्रचार मराठीत आहेत. वरवर झकपक करून एखादा दोष, व्यंग लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा 'आंधळा डोळा काजळाने साजरा' असं म्हटलं जाई. या संदर्भात 'ऐन वेळी युक्तीने प्रसंग साजरा केला' असे वाक्प्रयोगही केले जातात. एखादी गोष्ट दूर आहे तोवरच चांगली दिसते, जवळ आली की तिच्यातील दोष दिसू लागतात या अर्थाने 'दुरून डोंगर साजरे, जवळ गेले की काटे भेटे' ही म्हण आताही मोठ्या प्रमाणात वापरली जाते. दुसऱ्याच्या वैभवावर उड्या मारणे या अर्थाने 'पुणतांब्याच्या म्हशी आणि ढोणगाव साजरा' हा शब्दप्रयोग वापरला जाई.

साजेल ते ल्यावे आणि आणि पचेल ते खावे हा मराठी माणसाचा स्वभाव आहे. तर मग हा 'साजरा - साज नव्याने रुजवायला काय हरकत आहे?

शब्दवेध

साधना गोरे

response.lokprabha@expressindia.com

# अंटार्क्टिका आणि मिथेन

विज्ञान

डॉ. किशोर कुलकर्णी

अंटार्क्टिका खंड म्हटले की प्रचंड पाणी तितकाच बर्फ आणि न उडणारे पेंग्विन पक्षी आपल्या डोळ्यासमोर येतात. अंटार्क्टिकाचा आणखी एक परिचय झाला तो त्या बेटावर असलेल्या ओझोनच्या थराला पडलेल्या फार मोठ्या छिद्रामुळे. सुदैवाने करोनामुळे जी टाळेबंदी झाली त्यामुळे जगभरातील बहुतेक मोठ्या शहरातील कारखाने काही महिने बंद होते तसेच वाहने रस्त्यावरून धावायची थांबली होती त्यामुळे वातावरणात ओझोन वायूचा नाश करणारे हरितगृह वायू कमी प्रमाणात सोडले गेल्याने हे छिद्र कमी झाले, असे वैज्ञानिकांनी सांगितले.

अंटार्क्टिका हा उंच पठाराच्या स्वरूपातला प्रदेश आहे. पठारांची सरासरी उंची सुमारे अडीच किलोमीटर इतकी आहे. सर्वात उंच सुमारे ५ किलोमीटर असून भोवतालचा समुद्र म्हणजे जमिनीला चौफेर वेढणारे पाण्याचे रिंगण आहे. या भागात सर्वात जास्त उसळलेला समुद्र दिसतो. वारा जोरात वाहात असल्याने १०-१२ मीटर उंचीच्या लाटा निर्माण होत असतात. अंटार्क्टिकाचा काही भाग जागतिक तापमान वाढीमुळे उष्ण होत चालला आहे. पृथ्वीवरच्या इतर भागांपेक्षा हा प्रदेश पाच पटीने अधिक उष्ण होत चालला आहे.

अंटार्क्टिकाचा प्रदेश अतिशीत असल्याने इथले तापमान ५ अंश सेल्शियसने वाढले तरी इथे फारसा फरक पडणार नाही, असे वैज्ञानिकांचे मत आहे. सन २०१२ ते २०१४ या काळात अंटार्क्टिकावरील बर्फाचे आच्छादन तिथल्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे वाढले होते, परंतु आता ते पुन्हा कमी होऊ लागले आहे. समुद्र तळ सहज दिसेल अशी स्थिती निर्माण झाली आहे.

अंटार्क्टिकाच्या समुद्र तळातून प्रथमच मिथेन वायूची गळती संशोधकांनी शोधून काढली आहे. आपल्याला माहीतच आहे की मिथेन एक त्रासदायक हरितगृह वायू असून पृथ्वी गरम व्हायला मदतरूप ठरतो आहे. अगदी कार्बनडाय ऑक्साइडपेक्षाही तो अधिक कार्यशील आहे. संशोधकांनी मिथेन वायू खाणारे सूक्ष्म जीवसुद्धा शोधून काढले आहेत. असे म्हटले जाते की, मिथेन वायू खाणारे सूक्ष्मजीव तिथे असूनही मिथेन वायूची गळती होते ही बाबच मुळी चमत्कारिक आहे. वैज्ञानिकांच्या मते ही वाईट बातमी असून त्यातल्या त्यात दुःखात सुख हेच की या प्रकारातून मिथेन कुठून आणि कसा वातावरणात सोडला जातोय आणि त्यामुळे आपल्या पृथ्वीच्या तापमानात किती भर पडतेय ते कळणे शक्य होणार आहे. पण एक मात्र निश्चित की या घटनेमुळे तापमानात वृद्धी ही होणार आहे आणि भविष्यातील वैश्विक तापमानवाढीला हेही एक कारण असू शकेल. आजपर्यंत समज असा होता की, समुद्रतळातून मिथेन निसटला तरी समुद्रात अनेक असे सूक्ष्मजीव आहेत जे मिथेन खाऊन फस्त करतात. त्यामुळे समुद्रतळातून मिथेन बाहेरच येणार नाही, परंतु या विचाराला या घटनेने छेद दिला आहे, असे काही वैज्ञानिकांचे मत आहे. एका वृत्तानुसार मिथेन वायूची समुद्र तळातील गळती प्रथम २०११

साली लक्षात आली होती, परंतु सूक्ष्म जीवांनी हा वायू खाऊन फस्त केला होता आणि पाच वर्षांपर्यंत त्याचा मागमूस लागला नव्हता. आता मात्र वैज्ञानिक म्हणतात की, हे सूक्ष्मजीव तिथे असूनही वायूची गळती होते आहे तेव्हा हे एक प्रकारचे संकटच आहे.

डॉ. अँड्र्यू थर्बर हे अमेरिकेच्या ऑरेगॉन स्टेट युनिव्हर्सिटीत सागरीतज्ज्ञ असून त्यांच्या मते सागरी बर्फाखाली मिथेनचा प्रचंड मोठा साठा आहे. जगातील  सागरात जेवढा मिथेन आहे त्याच्या १/४ मिथेन अंटार्क्टिकामध्ये आहे आणि तो जर बर्फ वितळून अशाप्रकारे बाहेर पडायला लागला तर वैश्विक तापमानात खूप वाढ होईल. नासाने २०१८ साली इशारा दिला होता की, अशाप्रकारे बर्फ वितळून मिथेन बाहेर पडू लागला तर हवामान बदलाला गती प्राप्त होईल आणि वाढणारे तापमान थांबवणे माणसाच्या हातात राहाणार नाही. सुदैवाने अजून तरी प्रत्यक्ष गळती कोणी पाहिलेली नाही ही त्यातल्यात्यात जमेची बाजू आहे. थर्बर यांच्या मते मिथेन वायूची गळती वैश्विक तापमानवाढीमुळे नसावी, कारण ज्या भागात हे घडते आहे असे मानले जाते तो भाग रॉस समुद्राचा असून इथले तापमान अद्याप तरी म्हणावे तितके वाढले नाही की जेणेकरून बर्फ वितळून मिथेन वायू वातावरणात जाईल अशी स्थिती नाही. त्यामुळे हा मिथेन नेमका कुठून येतोय त्याचे ठिकाण माहीत झालेले नाही.''

एका अहवालानुसार यापूर्वी अंटार्क्टिकात अशी मिथेन गळती कधीच आढळून न आल्याने वैज्ञानिक बुचकळ्यात पडले आहेत. त्यामुळेच नेमके कोणत्या पद्धतीने या गळतीकडे पाहावे, हा त्यांच्यासमोर प्रश्न पडला आहे. उकल कशी करावी, धागेदोरे कसे शोधावेत हे कळेनासे झाले आहे. त्यासाठी सूक्ष्मजीव कशाप्रकारे मिथेन वायू खाऊन फस्त करतात हे तंत्र माणसाला कळले तर गळती होणाऱ्या वायूचा बंदोबस्त करता येईल, असे वैज्ञानिकांना वाटते. पूर्वी हे सूक्ष्मजीव संपूर्ण मिथेन शोषून घेत होते आणि आता ते घेत नसावेत म्हणूनच ही गळती होतेय, असे काही वैज्ञानिकांना वाटते. सूक्ष्मजीवांत हा बदल का झाला याचे मूळ शोधणे गरजेचे आहे असेही त्यांना वाटते. आणि खरोखरच असा काही बदल त्यांच्यात घडून आला असेल तर त्यांची मिथेन रोखण्याची प्रक्रिया इतर सूक्ष्म जीवांत निर्माण करून हा प्रश्न नव्याने सोडवता येइल, असा विश्वास त्यांना वाटतो. थोडा वेळ लागेल परंतु एक योग्य प्रक्रिया हाती लागण्याची शक्यता आहे असे वैज्ञानिकांना वाटते. या संबंधीची माहिती प्रोसीडिंग्ज ऑफ द रॉयल सोसायटी बी या नियतकालिकात २२ जुलै २०२०ला प्रसिद्ध झाली आहे.

मिथेन वायू वातावरणात अनेक मार्गांनी सोडला जातो. उदाहरणंच द्यायची तर, १- खनिज तेलांच्या ज्वलनातून, २- दलदलीच्या भूमीतून, ३- अनेक प्रकारच्या वायू माध्यमांतून, ४- भात शेतीतून, ५- जनावरांच्या मल-मूत्रातून आणि ६- सागरी वातावरणातून. असे म्हटले जाते की, सागरात फार मोठ्या प्रमाणावर मिथेन वायू साठलेला असून तो अनेक प्रक्रियेतून बाहेर पडत असतो. अंटार्क्टिकातील समुद्रात जगातील मिथेन साठ्याच्या १/४ मिथेन साठा अडकलेला आहे असे मानल जाते. हा सगळा मिथेनचा साठा गळतीद्वारे वातावरणात गेला तर जगाचे काय होईल, या विचारच भयावह आहे. तापमानाच्या महास्फोटाला सामोरे जाण्याशिवाय दुसरा पर्याय या मर्त्य मानवाकडे राहाणार नाही. आताच अंगाची लाही लाही होतेय. ५० अंश सेल्शियसच्या पुढे गेलेल्या तापमानाला वसुंधरेची काय स्थिती असेल आणि माणसाची काय स्थिती होईल, याचा विचारच न केलेला बरा.

response.lokprabha@expressindia.com

# जनसंपर्काचा सुसंवाद

उद्योजक व्हायचंय?
डॉ. गिरीश वालावलकर

एखादी व्यक्ती, कंपनी किंवा संस्था यांच्याबद्दलची माहिती त्या व्यक्ती, कंपनी किंवा संस्थेला फायदेशीर होईल आणि लोकांना उपयुक्त ठरेल अशा प्रकारे अतिशय नियोजनबद्ध रीतीने लोकांपर्यंत पोहोचवणे म्हणजे 'जनसंपर्क'. जनसंपर्कामध्ये स्वतःबद्दलची माहिती इतरांपर्यंत पोहचवू इच्छिणारी व्यक्ती, कंपनी किंवा संस्था, सर्वांगीण आणि सखोल विचार करून ती माहिती ज्या लोकांपर्यंत पोहोचवायची आहे त्या जनसमूहाशी, योजनापूर्वक संवाद साधते. जनसंपर्क करणाऱ्या व्यक्ती किंवा कंपनीची जनमानसातील प्रतिमा उंचावून त्या व्यक्तीची कारकीर्द अधिक पुढे जावी, कंपनीची विक्री आणि समभागांचे भाव वाढावेत किंवा संस्थेला अधिक देणग्या व सोयी-सवलती मिळाव्यात हे जनसंपर्काचे स्पष्ट उद्देश असतात.

आज संवादाची नवी नवआधुनिक माध्यमं उपलब्ध होत आहेत. या माध्यमांचा उपयोग करून घेत कंपनीची उत्पादनं, महत्त्वाचे निर्णय, आणि एकूण प्रगती यासंबधीची माहिती लोकांपर्यंत सत्याने पोहोचवणं आवश्यक झालं आहे. त्यामुळेच अलीकडे सर्वच बहुराष्ट्रीय आणि महत्त्वाकांक्षी भारतीय कंपन्यासुद्धा जनसंपर्कावर विशेष भर देऊ लागल्या आहेत. काही कंपन्या स्वतःचा अंतर्गत 'जनसंपर्क विभाग' सुरू करतात तर इतर बऱ्याच कंपन्या एखाद्या व्यावसायिक जनसंपर्क कंपनीकडे आपल्या जनसंपर्काची जबाबदारी सोपवतात. व्यावसायिक जनसंपर्क कंपनी वृत्तपत्रं, नियतकालिकं किंवा दूरचित्रवाणी वाहिनी किंवा तत्सम माध्यमांवर आपल्या कंपनीच्या एखाद्या महत्त्वाच्या अधिकाऱ्याची मुलाखत आयोजित करणं, कंपनीचा कारखाना असलेल्या छोट्या शहरात काही लोकोपयोगी उपक्रम राबवून तिथल्या स्थनिकांचं सहकार्य मिळवणं, कंपनीला उपयोगी ठरतील अशा राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांशी जवळचे संबंध निर्माण करणं, आपल्या कंपनीच्या प्रतिमेला पूरक ठरेल अशी एखादी क्रीडास्पर्धा किंवा करमणुकीचा कार्यक्रम प्रायोजित करणं, यांसारख्या अनेक आघाड्यांवर काम करते. इंटरनेटवर खेळले जाणारे 'फॅन्टसी गेम्स' बनवणाऱ्या 'ड्रीम इलेव्हन' या भारतीय कंपनीने बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया (बीसीसीआय) या आयपीएल क्रिकेट स्पर्धा आयोजित करणाऱ्या संस्थेला २२२ कोटी रुपये देऊन २०२० ची आयपीएल स्पर्धा प्रायोजित केली आहे. आयपीएलसारख्या क्रिकेट स्पर्धेशी संलग्न झाल्यावर आपले आभासी खेळ संपूर्ण जगभरातल्या लोकांपर्यंत पोहचतील अशी त्यांची भूमिका आहे. संपूर्ण जगात आपली प्रतिमा उंचावत, जगभरातल्या क्रीडाप्रेमींशी संपर्क साधण्याचा हा दूरगामी फायदे देणारा उत्तम मार्ग आहे.

पारंपरिक जाहिरातीसुद्धा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचून त्यातून कंपनीसाठी फायदा मिळवायचा प्रयत्न करतात. या बाबतीत जनसंपर्काचं 'जाहिराती'शी साधर्म्य आहे. परंतु जाहिराती प्रसारित करण्यासाठी माध्यमांना थेट पैसे दिले जातात तर जनसंपर्कामध्ये संबंधित व्यक्ती किंवा कंपनीबद्दल, लोकांना पाहायला किंवा वाचायला आवडतील, त्यामुळे माध्यमांना प्रसारित करण्यात रस वाटेल अशा बातम्या किंवा लेख तयार केले जातात. मग माध्यमं स्वतःहून त्या बातम्या आणि लेख प्रसारित करतात. त्याबद्दल त्यांना कोणतंही थेट शुल्क दिलं जात नाही. म्हणूनच यशस्वी 'जनसंपर्क' साधण्यासाठी विशेष कौशल्य आणि सफाई आवश्यक असते.

या उद्योगात येऊ इच्छिणाऱ्या उद्योजकांकडे

कल्पकता, भाषांवर प्रभुत्व आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व असावं लागतं. जनसंपर्क कंपनी सुरू करण्यासाठी कोणत्याही मोठ्या साधनसामुग्रीची गरज नसते. त्यामुळे जनसंपर्क कंपनी कोणत्याही मोठ्या गुंतवणुकीशिवाय सुरू करता येते आणि काही नियमित क्लायंट्स मिळाल्यावर, आपले दैनंदिन खर्च भागवून, ती फायद्यातसुद्धा येते. त्यामुळे अनेक कल्पक तरुण या व्यवसायाकडे वळत आहेत. 'एडलमॅन', 'ऑग्लीव्ही' या अमेरिकन, 'एमएसएल ग्रुप' ही फ्रेंच तर इंग्लंडची 'ब्रन्सविक ग्रुप' यासारख्या कंपन्या जनसंपर्क उद्योगामध्ये अग्रेसर मानल्या जातात. २०१९ साली चीनच्या 'ब्लूफोकस कम्युनिकेशन ग्रुप' या कंपनीने जागतिक जनसंपर्क कंपन्यांच्या यादीत नववं स्थान मिळवून चीनसुद्धा या उद्योगात पुढे येत आहे हे दाखवून दिलं. 'कम्युनिकेट इंडिया' किंवा २०१९ साली आशियामधील सर्वाधिक वेगाने वाढणारी दुसऱ्या क्रमांकाची जनसपंर्क कंपनी हे पारितोषिक मिळवणारी 'मीडिया मंत्र' यासारख्या भारतीय कंपन्या जनसंपर्क क्षेत्रात यशस्वी होत आहेत. त्याखेरीज अनेक तरुण उद्योजकांनी मोठ्या, मध्यम शहरांत स्थानिक पातळीवर सुरू केलेल्या जनसंपर्क कंपन्यासुद्धा कमीअधिक प्रमाणात यश मिळवत आहेत. आज कॉर्पोरेट कंपन्यांबरोबरच कलावंत, खेळाडू आणि राजकीय नेतेसुद्धा आपल्या प्रगतीसाठी व्यावसायिक जनसंपर्क कंपन्यांची मदत घेऊ लागले आहेत.

भारतामध्ये जनसंपर्क उद्योगातून गेल्या वर्षी म्हणजे २०१९ साली एक हजार ६०० कोटी रुपये इतकं उत्पन्न मिळालं. येत्या दोन वर्षांत ते एक हजार ८०० कोटींपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे. जनसंपर्क व्यवसायाची सध्याची जागतिक बाजारपेठ सुमारे ७४ हजार कोटी रुपये आहे आणि २०२४ पर्यंत ती ९८ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल अशी अपेक्षा आहे .

सर्वच उद्योगांतल्या कंपन्यांचा ग्राहक, समभागधारक, सरकार, माध्यमं आणि सामान्य जनसमुदाय या सर्वांशीच कमी-अधिक प्रमाणात संबंध येत असतो. त्या सर्वांच्याच मनात कंपनीचे उद्देश, कार्यतत्परता आणि प्रामाणिकपणा याविषयी चांगली प्रतिमा निर्माण करून सर्वांशी अधिकाधिक सौहार्दाचे संबंध प्रस्थापित करणं कंपनीच्या व्यवहार आणि प्रगतीसाठी आवश्यक असतं. कंपनीला आवश्यक ते परवाने, अनुमती किंवा अनुदानं देण्याचा अधिकार असलेले मंत्री, राजकारणी किंवा प्रशासकीय अधिकारी यांच्या मनात त्या कंपनीची योग्य प्रतिमा निर्माण करून अपेक्षित परवाने देण्यासाठी ती कंपनी सुयोग्य आहे हे संबंधित अधिकाऱ्यांना पटवून देणं, हासुद्धा जनसंपर्काचाच एक महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी त्या राजकारणी किंवा अधिकाऱ्यांबरोबर वैयक्तिक संबंध निर्माण केले जातात. अधिकाऱ्यांवर वेगेवेगळ्या प्रकारे प्रभाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो. ते उचित प्रकारे आणि योग्य मर्यादेत घडलं तर ते जनसंपर्क व्यवसायाचा भाग म्हणून स्वीकारलं जातं. या सर्वांचा वापर करून कंपनीसाठी आवश्यक ते परवाने मिळवणाऱ्या जनसंपर्क व्यावसायिकाचं व जनसंपर्क कंपनीचं त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल कौतुकसुद्धा केलं जातं. परंतु जर मर्यादा ओलांडली गेली तर ती जनसंपर्क कंपनी, तिचे क्लायंट्स, संबंधित प्रशासकीय अधिकारी, राजकीय नेते आणि अगदी मंत्री व सरकारवरसुद्धा त्याचे परिणाम होतात.

नीरा राडिया या अतिशय उत्कृष्ट जनसंपर्क व्यावसायिक होत्या. त्यांची 'वैष्णवी कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स' ही कंपनी जनसंपर्क व्यवसायातील अत्यंत कार्यक्षम कंपनी मानली जात असे. अनेक मोठ्या कंपन्यांच्या जनसंपर्काचं काम त्या कंपनीकडे होतं. २००८ च्या सुमारास भारत सरकार मोबाइल संभाषणासाठी आवश्यक असलेला '२ जी स्पेक्ट्रम' वापरण्याचे परवाने मोबाइल फोन कंपन्यांना देणार होतं. '२ जी स्पेक्ट्रम'च्या वाटपाचे अधिकार केंद्रीय दूरसंचार मंत्रालयाच्या अखत्यारीत होते. अनेक कंपन्या तो स्पेक्ट्रम मिळवण्यासाठी प्रयत्नशील होत्या. नीरा राडिया त्या वेळी दूरसंचार मंत्रालयाच्या संपर्कात होत्या आणि एक दिवस अचानक राडिया यांच्या काही मंत्री आणि अधिकाऱ्यांबरोबरच्या '२ जी स्पेक्ट्रम'संदर्भातल्या संभाषणाच्या टेप्स उघड झाल्या. त्यातून देशभर वादळ उठलं. सरकारवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. काही मंत्री, अधिकाऱ्यांची चौकशी झाली. या सगळ्या प्रकरणात गैरव्यवहार झाला नसल्याचा निर्वाळा पुढे न्यायालयाने दिला. तरीही २०१४ च्या निवडणुकीत संयुक्त पुरोगामी आघाडीचं सरकार पडण्यामध्ये '२ जी स्पेक्ट्रम' आणि नीरा राडिया यांच्या संभाषणाच्या उघड झालेल्या टेप्स हे महत्त्वाचं कारण होतं असं मानलं जातं. यावरून जनसंपर्क व्यवसायाची व्याप्ती आणि त्या व्यावसायिकांवरची जबाबदारी याची कल्पना येते.

जनसंपर्काची एखादी अत्यंत कल्पक आणि अभिनव कल्पना अपयशात घुटमळत असलेल्या कंपनीला त्यातून बाहेर काढून पाहता पाहता यशाच्या शिखरावरसुद्धा पोहोचवू शकते. 'स्टारबक्स' ही कॉफी शॉपची शृंखला २००८ च्या सुमारास अचानक तोट्यात आली. कंपनीला जगभरातली जवळपास एक हजार कॉफीशॉप्स बंद करावी लागली. त्या वेळी कंपनीचा मालक हॉवर्ड शुल्ट्झ याने आपल्या सर्व सल्लागारांना आणि कर्मचाऱ्यांना आर्थिक बाबी बाजूला ठेवून जनसंपर्कावर, म्हणजे 'स्टारबक्स'ला जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यावर, लक्ष केंद्रित करण्याची सूचना दिली. त्यासाठी कंपनीने 'माय स्टारबक्स आयडिया' नावाची मोहीम सुरू केली. त्याअंतर्गत सर्वसामान्य माणसांकडून 'स्टारबक्स'मध्ये काय सुधारणा कराव्यात यासंबंधी सूचना मागवण्यात आल्या. जनसंपर्काच्या या अभिनव कल्पनेला लोकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. जवळपास ९० हजार लोकांनी आलेल्या सूचना स्टारबक्सकडे पाठवल्या. त्या सर्व सूचना समाजमाध्यमं आणि इतर माध्यमांद्वारे सर्व लोकांपर्यंत पोहोचवल्या जाऊ लागल्या. दर महिन्याला जवळपास ५० लाख लोक त्या सूचना वाचत होते. आलेल्या सूचनांपैकी जवळपास १०० सूचना स्टारबक्सने प्रत्यक्षात अमलातसुद्धा आणल्या. ही मोहीम पुढील काही महिने उत्स्फूर्तपणे चालत राहिली. स्टारबक्सचा जनसंपर्क वाढत राहिला. त्यातून स्टारबक्सला नवे ग्राहक मिळत गेले. स्टरबक्सची यशस्वी घोडदौड पुन्हा एकदा सुरू झाली. आज स्टारबक्सची जवळपास २८ हजार कॉफीशॉप्स संपूर्ण जगात पसरली आहेत.

आपल्याबरोबर विविध प्रकारांनी थेट संपर्क साधत, आपल्या आयुष्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव टाकणाऱ्या, कंपन्या, उत्पादनं, संस्था आणि व्यक्ती यांच्यासंबंधी माहिती पुरवणारा हा जनसंपर्क उद्योग येत्या काळात वाढत्या प्रमाणात आणि नव्या नव्या स्वरूपात आपल्याशी सुसंवाद साधत राहणार आहे.

response.lokprabha@expressindia.com

रोमानी रस्ते

प्राची साटम

# पाणी आणि आपण

आताशा खिडकीतून बाहेर नजर टाकली की आकाशाच्या राखाडी फुग्यातून फुटून कोसळणारा पाऊसच समोर येतो. वर उचललेली ती नजर त्या सरींबरोबर हळूहळू खाली येत जाते. जसजसं पाणी रस्त्यावर स्थिरावतं, तसतसं ढगात असणारे आपण, रम्य दुनियेमधून वास्तवात फेकले जातो. वरून कोसळणारा, मंत्रमुग्ध पाऊस जेव्हा रस्त्यावर उतरल्यावर जागोजागी तुंबलेलं पाणी होतं, तेव्हा खिडकी बंद करून निमूटपणे आपण आपली कामं करायला जातो. कारण कसंय, खिडक्या बंद केल्या की आपसूकच आपले सगळे प्रॉब्लेम्स सुटतात.

पाण्याचं आणि आपलं नातं कधी तपासून पाहिलंय का आपण? म्हणजे प्रश्न जरा विचित्र आहे. उत्तरही आडवळणाचं असूच शकतं. पण नातं असतं हे नाकारू शकत नाही आपण. म्हणजे नव्या ठिकाणी राहायला गेलो की भाडं किती याआधी आपण पाणी आहे का व्यवस्थित असंच विचारतो. शहरात राहणाऱ्या बहुतेकांचा पाण्याशी संबंध हा फक्त त्यांच्या पाण्याच्या टाकीपुरता असतो. आजकाल तो दारोदार साचणाऱ्या डबक्यांपर्यंत वाढलाय म्हणा.

शहरी माणसाचं पाण्याशी असलेलं नातं व्यस्त होत चाललंय. जेव्हा मी पहिल्यांदा या शहरात राहायला आले तेव्हा इथे राहून गेलेल्या आणि या शहराबद्दल ऐकलेल्या प्रत्येकाने मला इथल्या पावसाची भीती घातली होती. बदाबदा कोसळतो पाऊस, सुमारच नाही काही याला आणि दिवसभर नुसतं मळभ. अगदी मलूल वातावरण. पाणी प्रचंड साचतं. खूप कमी जागा उरल्यात जिथे पावसाचं पाणी साचत नाही. सांभाळून राहा. हे शहर पाण्याखाली जायचा धोका वाढतच चाललाय म्हणे. हे सगळं ऐकून मीसुद्धा जीव मुठीत घेऊन इथे राहायला आले. इथला माझा पावसाळा धास्तीतच निघून गेला आणि त्या तीन-चार महिन्यांत बऱ्यापैकी सवय होऊन गेली. वेड्यासारखा कोसळणारा पाऊस, रात्रीच्या अंधारात विजेच्या

कडकडाटाबरोबर तितकाच मुसळधार पडून भीतीचे शहारे आणणारा पाऊस आणि कधी कधी लाडात येऊन अगदी हलकेच नाजूकशा सरी घेऊन रस्त्यावर रेंगाळणारा पाऊस. सगळं सगळं अनुभवलं मी इथे. आता भीती इथल्या पावसाची नाही तर प्रगतीच्या भाराखाली निश्चल पडलेल्या शहराचीच वाटते.

इथे समुद्रसुद्धा आहे. नद्या आहेत. पण शहराच्या लखलखाटात हरवून गेलेल्या समुद्राची गत जत्रेत साखळदंडाने बांधून ठेवलेल्या हत्तीसारखी आहे. लोकांच्या मनोरंजनासाठी एक पाय दुमडून सोंडेने सलाम करणारा हत्ती. नद्यांचं अस्तित्व माणूस म्हणेल त्यावर अवलंबून आहे इथे. त्याने म्हटलं तर त्या आहेत, नाही म्हटलं तर त्या लुप्त होतात, कसल्याशा ढिगाखाली. शहरातलं पाणी हे वेठबिगारीला जुंपलेल्या मजुरासारखं आहे. अडवून, बांधून ठेवलेलं. शहराच्या गरजा भागवण्यापुरतं आणि करमणुकीचं साधन असलेलं.

त्यामुळेच की काय, मोकळं वाहणारं पाणी पाहिलं की हरखून जायला होतं आपल्याला. असं कसं हे स्वतःच्या मर्जीनुसार वाहतं. कुठेतरी धरणं बांधा, पाणी अडवा, पाणी जिरवा याबद्दल काही माहीत नाही का याला. खूप वर्षांपूर्वी एका शहरवजा गावात गेले होते राहायला. गावातल्या माणसांचं यांत्रिकीकरण होण्याची वेळ येते तेव्हा लोक त्याला शहर म्हणायला लागतात. अशाच उंबरठ्यावर असलेलं ते गाव. तिथून वाहणारी ती नदी. तिची अशी वेगळी ओळख असलेली. अजूनही ती स्वतःच्या मर्जीने वाहत होती. कधी कधी तिच्या काठाशी येऊन बसावंसं वाटे. या अशा गोष्टी आम्हा शहरी माणसांना फार चैनीच्या भासतात. तर तिथे जाऊन उगीचच बसायचं. तीच गत एका अजून छोट्या गावात असलेल्या समुद्रकिनाऱ्याची. अजूनही व्यापारीकरण न झालेल्या त्या किनाऱ्याची शुभ्र वाळू, निळंशार पाणी आणि शांत, संथ किनारा डोक्यात रुंजी घालत असतो.

यांच्यामध्ये काही जादूई शक्ती असते का माहीत नाही. पण त्यांच्यासोबत असल्यावर त्यांचे स्वभावधर्म आपल्यात उतरत जातात. त्या नदीकडे बसल्यावर विचारांचा कोलाहल एकदम अंगावर यायचा आणि समुद्रकिनारी तिथलं क्षितिजापर्यंत पसरत गेलेलं मुक्त आणि स्वस्थ निवांतपण. नदी आणि समुद्राचा हाच फरक असावा कदाचित. नदीच्या शांत वाहण्यातसुद्धा एक खळखळ असते आणि समुद्राच्या बेधडक लाटांमध्येसुद्धा एक 'ठहराव' असतो.

एकदा एका नदीवरल्या पुलावर उभी होते. कुठे कोणत्या कसं हे महत्त्वाचं नाही. महत्त्वाचं होतं ते त्या नदीचं, किंबहुना, दोन नद्यांच्या संगमाचं दर्शन. दणकट तरीही झुलता असलेला तो पूल वारा नेईल तसा अक्षरशः बागडत होता आणि खालून वाहणाऱ्या त्या दोन नद्या... त्यांच्या वाहत्या पाण्याचे सूर वाऱ्याच्या सुरावटीत मिसळत होते. पुलाच्या या पल्याड असलेली निळीशार नदी वेगात पुढे जात होती, तर पुलाच्या त्या पल्याड विरुद्ध दिशेने येणारी दुसरी नदी तिच्या संयत हिरव्यागार पाण्याला अलगद त्या नदीच्या पाण्यात मिसळून समुद्रात विलीन होण्यासाठी पुढे जात होती. उगाच मी किती समर्पित आहे, त्यागी आहे याचा बडेजाव नाही. आपण वाहतो आणि आपल्याला वाहायचंय या निसर्गनियमाने वाहणाऱ्या त्या दोन नद्या. सगळं सोपं आणि सुटसुटीत. मानवी गुंता आणि अवघडलेपणाचा लवलेशही नाही. आणि हे सगळं त्या झुलत्या पुलावरून पाहणारी मी मात्र तोंड वासून पाण्याचं हे अद्भुत रूप उगाच डोळ्यांत साठवण्याचा प्रयत्न करत होते.

आपलं नातं असतं पाण्याशी. अगदी वैयक्तिक पातळीवर. रात्रभर कोसळणाऱ्या पावसाला पाहून डोक्यावर उमटणाऱ्या आठीत. त्याच पावसाच्या धुमाकुळामुळे साचलेल्या ढोपरभर पाण्यात चालताना घरी पोहाचायच्या विवंचनेत. अगदी एखाद्या डोंगराच्या कड्यावर उभं राहून समोर दरीत कोसळणाऱ्या धबधब्याकडे पाहून वाटणाऱ्या कमाल आश्चर्यात. नदीकाठीच्या दगडावर पाण्यात पाय सोडून बसल्यावर वाटणाऱ्या आपलेपणात, त्याच नदीने रौद्र रूप घेतल्यावर होणाऱ्या उद्ध्वस्ततेची रूपं पाहणाऱ्या आपल्या भेदरलेल्या नजरेत. अथांग पसरलेल्या त्या समुद्राशी हितगुज करताना, पायाखालची वाळू सरकत असतानाही, समोर पसरलेल्या त्याचा, खंदा आधार वाटणाऱ्या आपल्या निर्धास्त नजरेत. नातं असतंच आपलं पाण्याशी. पाण्याचं आपल्याशी...

response.lokprabha@expressindia.com

# शब्दकोडे-१३५

सरिता वेंगुर्लेकर



**आडवी विधाने :**

१) चंद्राचे चांदणे, चंद्रप्रकाश
३) हातांच्या स्पर्शाने केलेली तपासणी
६) धाडस
८) खग, विहंग
९) वेल, वल्लरी
१०) शरीर, देह
११) चकचकीत, फिकटच्या विरुद्ध
१३) पालखी, डोली
१४) गोशा
१६) फळाचे कठीण आवरण
१७) लोखंडावर येणारी तांब
१८) घमेंड
१९) उत्तेजन देणारा
२१) मेहुणा
२३) शिक्का, छाप
२४) शत्रू; बंडखोर
२५) अगतिक झालेला; दीन
२७) महिना, माह
२९) झुकलेला, कलंडलेला
३१) कणखर, बळकट
३३) खोळ, आच्छादन
३५) खडकाळ जमीन, नापीक भूभाग
३७) हरणाचा बछडा
३९) थोडे; वृद्धत्व
४०) लोक, प्रजा
४१) करार, दिलेला शब्द
४२) नामांकित
४५) चिवट, लवकर न तुटणारे
४७) पुरावा, नमुना; प्रमाणपत्र
४९) अस्वलाचे खेळ करून दाखवणारा
५१) मस्ती, गुर्मी
५२) प्रघात; रीत, पद्धत
५३) दुर्दशा, हाल
५४) फळातील गाभा

**उभी विधाने :**

१) एक रत्न; विष्णूच्या गळ्यातील एक अलंकार
२) दिवा
४) मनाची चंचलता, अनिश्चितता
५) ध्वज, केतन
६) समुद्र
७) सार; कस
१०) कमळ, पंकज
१२) बांधकाम करताना इमारतीच्या पायात भरायची दगडमाती
१३) शिवरायांची राजवट
१५) आचारी
१९) नाटक-सिनेमा पाहण्यास आलेले, दर्शक
२०) पद्यरचना, काव्य
२२) कथानकास अचानक मिळालेले वळण; स्थित्यंतर
२६) चक्र
२८) परवाना, अधिकारपत्र
३०) लुच्चा, अप्रामाणिक
३१) गुरे बांधायचा दोर
३२) बैल, खोंड
३४) अवजड, भारी
३५) आदरयुक्त सलामी
३६) इंद्राचे आयुध
३७) अंत, शेवट; मर्यादा
३८) मोकळा वेळ, फुरसद
४०) व्यवस्था; मेळ
४२) ओढा; गटार
४३) होडी, मचवा
४४) विलंब, देर
४६) टिकाव, निभाव
४८) मेहनत, त्रास
५०) गती

response.lokprabha@expressindia.com

## शब्दकोडे क्र. १३४ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| किं | चि | त | ■ | जो | षा | स | ना | ■ | उ | द | क |
| क | था | ■ | को | म | ट | ■ | मो | ल | क | री | ण |
| र | व | स | ड | ■ | व | रा | ह | ■ | ल | ■ | ख |
| ■ | णी | ■ | गा | ढ | ■ | त | र | स | ■ | वा | र |
| बे | ■ | ल | ■ | ग | ट्टी | ■ | म | ल | मा | स | ■ |
| बं | ड | खो | र | ■ | ■ | को | ■ | वा | व्या | ■ | च |
| द | ■ | टा | ■ | क | म | ला | क | र | ■ | स | र |
| शा | खा | ■ | पिं | ■ | न | ह | र | ■ | ध | म | क |
| ह्री | ■ | सं | ग | र | ■ | ल | क | ब | ■ | यो | ■ |
| ■ | हु | म | व्य | ■ | अं | ■ | री | ■ | उ | चि | त |
| ल | ज्ज | त | ■ | हि | त | चिं | त | क | ■ | त | ग |
| ता | त | ■ | क्षे | म | ■ | ता | ■ | न्या | रा | ■ | र |

# राशिभविष्य

सोनल चितळे

## दि. ४ ते १० सप्टेंबर २०२०

### मेष

**मंगळ-बुधाच्या** षडाष्टक योगामुळे वादविवादाचे प्रसंग येतील. शब्दांवर ताबा ठेवा. नोकरी-व्यवसायात वरिष्ठांचे म्हणणे ऐकून घ्या. सहकारीवर्गाकडून जास्त अपेक्षा ठेवल्यास अपेक्षाभंग होईल. जोडीदाराचे कामकाज सुरळीत चालू राहील. त्याच्या कामात वैचारिक लुडबुड करू नका. मुलांकडून चांगली बातमी समजेल. कौटुंबिक वातावरण आनंदी आणि उत्साही ठेवण्याचे काम जोडीदार करेल. पचनसंस्थेची विशेष काळजी घ्यावी लागेल. वेळेवर पथ्य पाळा.

### वृषभ

**चंद्र-नेपच्यूनच्या** केंद्र योगामुळे विविध विचारांनी मन व्यापून राहील. विचारचक्र थांबवण्याची आवश्यकता भासेल. नोकरी-व्यवसायात वरिष्ठांचे पाठबळ मिळेल. सहकारीवर्गाच्या समस्यांना वाचा फोडाल. न्यायाची मागणी कराल. जोडीदाराला आपले विचार, मत सध्या पटले नाही तरी त्याच्यावर ते लादू नका. धीर धरा. कौटुंबिक वातावरण उत्साही राहील. घरात शिस्तीचे व नियमांचे पालन केले जाईल. त्वचेवर फोड येणे, त्यात पू होणे असे त्रास सहन करावे लागतील.

### मिथुन

**रवी-चंद्राच्या** नवपंचम योगामुळे हाती घेतलेल्या कार्यात यश मिळेल. आरोग्य चांगले राहील. नोकरी-व्यवसायात वरिष्ठांशी सविस्तर बोलून त्यांचा विश्वास संपादन कराल. सहकारीवर्गातील काहींना त्यांच्या वागणुकीचे सडेतोड उत्तर द्याल. जोडीदाराला आपले मुद्दे पटवून देणे कठीण जाईल. तसेच त्याची मते समजून घेणेही जड जाईल. कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य मदतीला धावतील. मुलांमुळे घरातील वातावरण हलके राहील. कामापुरेसे छोटे प्रवास कराल.

### कर्क

**बुध-शुक्राच्या** लाभ योगामुळे कल्पकता, बुद्धिचातुर्य आणि व्यवहार यांचा त्रिवेणी संगम होईल. नोकरी-व्यवसायात वरिष्ठांची बोलणी जिव्हारी लागतील. सहकारीवर्गाकडून चुका होण्याची शक्यता आहे. सतर्क राहणे गरजेचे आहे. जोडीदाराला त्याच्या कार्यात मेहनतीने स्वतःला सिद्ध करावे लागेल. नैराश्यापासून त्याला दूर ठेवा. कुटुंबात आनंदी, उत्साही वातावरण ठेवणे आपले कर्तव्य आहे. रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवा. व्यायाम आणि आहार याकडे लक्ष द्यावे.

### सिंह

**गुरू-चंद्राच्या** नवपंचम योगामुळे यशाकडे वाटचाल कराल. ज्येष्ठ मंडळींचे मार्गदर्शन उपयोगी ठरेल. नोकरी-व्यवसायात आर्थिक घडी नीट बसवाल. सहकारीवर्गातील गरजवंतांना मदतीचा हात पुढे कराल. जोडीदाराच्या कष्टाचे चीज होईल. त्याच्या आनंदात सहभागी व्हाल. वैचारिक ओझे कमी होईल. समस्यांची उत्तरे सापडतील. कौटुंबिक वातावरण संमिश्र राहील. घरच्यांवर कडक पहारा नको. पाठ धरणे, शिरेवर शीर चढणे यांसंबंधी त्रास होतील.

### कन्या

**चंद्र-शुक्राच्या** लाभ योगामुळे आर्थिक उन्नतीसह मानसिक आनंद, समाधान मिळेल. नोकरी-व्यवसायात परदेशासंबंधित कामांना गती मिळेल. सहकारीवर्गाची योग्य साथ मिळेल. त्यांच्यातील गुणांचा चांगल्या प्रकारे उपयोग करून घ्याल. प्रसंगावधान राखून आस्थापनेच्या हिताचे निर्णय घ्याल. जोडीदाराच्या मतांची कदर कराल. दोघे मिळून कौटुंबिक बाबींचे निर्णय घ्याल. स्वयंशिस्तीचे पालन करूनच अपचनाच्या तक्रारी दूर करता येतील.

### तूळ

**कृतिशील व** ऊर्जाकारक मंगळ आणि भावभावनांचा कारक शुक्र यांच्या केंद्र योगामुळे राग आणि मोह या दोन्ही भावनांवर ताबा ठेवावा लागेल. नोकरी-व्यवसायात आपले मतपरिवर्तन करण्याचे प्रयत्न होतील. सहकारीवर्गाच्या भक्कम आधारामुळे कार्यपूर्ती शक्य होईल. जोडीदाराच्या कामाच्या व्यापामुळे त्याची चिडचिड वाढेल. परंतु याचा परिणाम आपल्या कौटुंबिक वातावरणावर होऊ देऊ नका. रक्तातील काही घटकांचे प्रमाण कमी-अधिक होण्याची शक्यता भासते.

### वृश्चिक

**रवी-गुरूच्या** नवपंचम योगामुळे यशाच्या पायऱ्या चढाल. समाजात मानसन्मान मिळेल. हातून सामाजिक कार्य घडेल. नोकरी-व्यवसायात अधिकाराचा योग्य उपयोग कराल. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. सहकारीवर्ग बुद्धिमत्तेची चुणूक दाखवेल. अंतिम निर्णय घेताना जोडीदाराची मदत होईल. कौटुंबिक जबाबदाऱ्या धीराने पार पाडाल. नातेवाईकांच्या समस्या सोडवाल. त्यांना आर्थिक मदत कराल. डोके दुखणे, पित्त होणे, छातीत जळजळणे हे त्रास संभवतात.

### धनू

**चंद्र-मंगळाच्या** युती योगामुळे आपल्या कृतीतून इतरांना आनंदित आणि उत्साहित कराल. नोकरी-व्यवसायात महत्त्वाचे निर्णय घेताना वरिष्ठांचे पाठबळ मिळेल. सहकारीवर्ग नव्या समस्या पुढे मांडेल. अधिकारीवर्गाची मदत मागावी लागेल. जोडीदाराच्या साथीने हितशत्रूंना सडेतोड उत्तर द्याल. स्वीकारलेली जबाबदारी मेहनत घेऊन पार पाडाल. कौटुंबिक वातावरण संमिश्र राहील. सर्द हवेमुळे व दमटपणामुळे त्वचेवर फंगल इन्फेक्शन होण्याची शक्यता!

### मकर

**चंद्र-शनीच्या** नवपंचम योगामुळे चंद्राच्या क्रियाशीलतेला शनीच्या मेहनतीची व चिकाटीची जोड मिळेल. एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास कराल. नोकरी-व्यवसायात वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. त्यांचा सल्ला आपल्या कार्यक्षेत्रात तसेच वैयक्तिक जीवनातही उपयोगी ठरेल. सहकारीवर्गातील आपापसातील मतभेद त्रासदायक ठरण्याची शक्यता आहे. जोडीदाराची उत्तम साथ लाभेल. श्वसनसंस्था आणि पचनसंस्था यांचे आरोग्य सांभाळावे.

### कुंभ

**चंद्र-नेपच्यूनच्या** लाभ योगामुळे नव्या संकल्पना साकार कराल. अंतर्मनाचा आवाज ऐकाल. नोकरी-व्यवसायात नवे करार कराल. धाडसी निर्णय घ्याल. वरिष्ठ आणि सहकारीवर्ग यांतील दुवा बनाल. जोडीदार त्याच्या कार्यक्षेत्रात उत्तम कामगिरी बजावेल. त्याचे श्रेयही त्याला मिळेल. मित्रमंडळींकडून चांगले मार्गदर्शन मिळेल. यशाने हुरळून जाऊ नका. स्वतःवर संयम ठेवा. कौटुंबिक वातावरण आनंदी राहील. आरोग्य चांगले राहील.

### मीन

**गुरू-चंद्राच्या** केंद्र योगामुळे मोठ्यांचे पाठबळ मिळेल. रखडलेली कामे धिम्या गतीने मार्गी लागतील. नोकरी-व्यवसायात यश व कीर्ती मिळण्याचे योग आहेत. मेहनतीला पर्याय नाही. सहकारीवर्गाच्या चिकाटीमुळे बऱ्याच प्रमाणात कामाचा उरका पडेल. जोडीदाराच्या व्यवहारचतुर्याने आणि स्पष्टवक्तेपणामुळे येऊ घातलेले संकट टळेल. कामाच्या धावपळीत मणक्याचे आरोग्य जपावे.

response.lokprabha@expressindia.com

# इम्फाळमधल्या डोंगरावर...

निमित्तमात्र

तोरा अगरवाल

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मणिपूरमधल्या डोंगरकपारींत अनेक ब्रिटिश आणि जपानी सैनिक शहीद झाले. पण जग त्यांना विसरलेलं नाही. इम्फाळमधला एक गट या युद्धभूमींचं उत्खनन करून शहिदांचे अवशेष, त्यांच्या वस्तूंचा शोध घेत तो परिसर खणून काढत आहे. आपल्या जिवलगांच्या बाबतीत या परक्या प्रदेशात नेमकं काय घडलं, याचं उत्तर त्या योद्धयांच्या जिवलगांना अद्याप मिळालेलं नाही. त्यांच्या प्रश्नांची उत्तर शोधण्याचा प्रयत्न हा गट करत आहे.

मणिपूरमधल्या एका डोंगराच्या माथ्यावर पौर्णिमेच्या रात्री युमनाम राजेश्वर सिंग मृतांची नावं वाचून दाखवत होते. या जवानांच्या मृत्यूला आता साधारण ७६ वर्षं झाली असतील. पण राजेश्वर यांना त्यामुळे काहीही फरक पडत नाही. कारण त्यांच्यासमोर आहे एक निश्चित उद्दिष्ट आणि डझनावारी नकाशे... त्यांच्या हातात १९४४च्या नकाशाची एक ए-फोर आकाराची प्रत होती. ते सहकाऱ्यांना सांगत होते, 'इथे... इथे जपानी बंकर होते. तिथून ते गोळीबार करत.' आज सकाळी प्रेशर कुकर, धातुशोधकं (मेटल डिटेक्टर), तंबू आणि गोठवलेले मासे घेऊन आम्ही याच मार्गाने चालत आलो होतो. १९४४ मध्ये इम्फाळला वेढा घालण्यात आला होता. मार्च आणि जुलैमध्ये जिथे घनघोर युद्ध झालं, अशा अनेक ठिकाणांपैकी ही एक युद्धभूमी... इम्फाळपासून १५ किलोमीटरवर असलेली! तीन मोबाइल फोनच्या फ्लॅशलाइटच्या उजेडात राजेश्वर यांचं यादी वाचन सुरूच होतं. तेवढ्यात ते एका नावापाशी थांबले. 'प्रायव्हेट टोड डी. आपण यांचाच शोध घेत आहोत.'

मार्चच्या आरंभी राजेश्वर मला डेव्हिड टोडचे (युद्धात शहीद झालेल्या एका ब्रिटिश सैनिकाचे) अवशेष शोधायला घेऊन गेले. आकाश स्वच्छ होतं आणि दिवस प्रसन्न होता. चीनमधून कोणता तरी एक

विषाणू भारतात शिरल्याच्या बातम्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाल्या होत्या. राजेश्वर ४३ वर्षांचे आहेत. इम्फाळमधल्या दूरसंपर्क क्षेत्रातल्या एका कंपनीसाठी ते काम करतात. त्यांचा कार्यक्रम व्यवस्थित आखलेला होता. २८ मार्चपासून ते ब्रिटन, फ्रान्स आणि बेल्जियमच्या दौऱ्यावर जाणार होते.

दुसऱ्या महायुद्धाशी संबंधित असलेल्या त्यांच्या या उत्खनन मोहिमेवर त्यांनी मलाही न्यावं म्हणून मी कित्येक महिने प्रयत्न करत होतो. ते आपल्या मित्रांबरोबर मणिपूरच्या डोंगराळ भागांतल्या गावांत फिरतात. इम्फाळ आणि कोहिमामध्ये झालेल्या युद्धांशी संबंधित अवशेष, कथा, आठवणी इत्यादींचा शोध घेतात. त्यांच्या नोंदी करतात. ते मला सहभागी करून घ्यायला तयार नव्हते कारण त्यांना ते काम अतिशय गुप्तपणे, प्रसिद्धीमाध्यमांपासून दूर राहून करायचं आहे. 'तुमचा विचार आता तरी बदलला आहे का,' असं विचारण्यासाठी मी दर महिन्याला त्यांना एक व्हॉट्सॲप मेसेज पाठवत असे. या वेळीही पाठवला. पण या वेळी उत्तर वेगळं होतं. 'कृपया नेमकं ठिकाण उघड करू नका,' असं सांगत त्याने मोहिमेत सहभागी करून घेण्यास होकार दर्शवला होता.

मला सहभागी करून घेतानाच विचारलं होतं, 'तू पुरेसा तंदुरुस्त आहेस ना?' त्यामागचं कारण मला १० मिनिटांत कळलं. माझे धावण्याचे बूट त्या भूभागासाठी योग्य नव्हते. मी घसरत होतो. धडपडत होतो आणि काही भागांत तर अक्षरशः रांगत होतो. अशा ठिकाणी बंदुका, संगिनी हाती घेऊन शत्रुपक्षाचा निःपात करणारे सैनिक हे दृश्य कल्पनेच्या पलीकडचं होतं. पण आमच्याच गटातले एक ७२ वर्षांचे गृहस्थ हाती काठी घेऊन माझ्या बरेच पुढे चालत असलेले पाहून आश्चर्याचा धक्काच बसला.

राजेश्वर मात्र त्याच्या इथवरच्या प्रवासाविषयी सांगत मला सोबत देत होता. इतर अनेकांप्रमाणेच तोसुद्धा बराच काळ दुसऱ्या महायुद्धातल्या या युद्धभूमीविषयी अनभिज्ञ होता. सात दशकांपूर्वी ब्रिटिश आणि जपानदरम्यान झालेल्या संघर्षात इम्फाळमधल्या अनेक ठिकाणांप्रमाणेच ही टेकडीही होरपळून निघाली होती. जपानचे ३० हजारांहून अधिक सैनिक शहीद झाले. हा पराभव एवढा दारुण होता, की त्यानंतर जपानने आशियात आपलं साम्राज्य विस्तारण्याचा विचारच सोडून दिला. २०१३ मध्ये जेव्हा ब्रिटनच्या राष्ट्रीय सैनिकी संग्रहालयाने इम्फाळ आणि कोहिमातल्या युद्धाचा उल्लेख 'ब्रिटनने लढलेलं सर्वांत मोठं युद्ध' असा केला, तेव्हा या वास्तवावर प्रकाश पडला.

पण तोपर्यंत या युद्धाच्या खाणाखुणा ईशान्य भारतातल्या डोंगरकपारींत गाडल्या गेल्या होत्या. त्या केवळ संरक्षण क्षेत्राशी संबंधित तज्ज्ञ, काही वीर योद्धे आणि इतिहासकारांच्या साहित्यापुरत्याच सीमित राहिल्या होत्या. २००५मध्ये राजेश्वर यांच्या वाचनात एक पुस्तक आलं- 'द फरगॉटन आर्मीज बॉक्स ऑफ लायन्स - द टू स्टोरी ऑफ डिफेन्स अँड इव्हॅक्युएशन ऑफ द लार्जेस्ट सप्लाय डेपो ऑन द इम्फाळ प्लेन'. ख्रिस्तोफर दी जॉन्सन यांचं हे पुस्तक होतं. ते कांग्लाटोंगबीच्या युद्धावर आधारित होतं. राजेश्वर म्हणतात, 'आपल्याला याबद्दल काहीच कसं माहीत नाही, याचं मलाच मोठं आश्चर्य वाटलं. आमचे आजी- आजोबा केवळ एवढंच सांगायचे की इथे जपानचं युद्ध झालं होतं. आम्ही एवढंच ऐकत मोठे झालो.'

पुढच्या काही वर्षांत राजेश्वर हे जॉन्सन यांचे पेन फ्रेंड झाले. त्याबद्दल ते सांगतात, 'जॉन्सनचे वडील त्या युद्धात लढले होते. ख्रिस्तोफर मला संदर्भ पुस्तकं, युद्धाच्या दैनंदिनी पाठवू लागला. मी रात्रभर जागून त्यांचा फडशा पाडत असे.' एका वेगळ्या खंडात राहणाऱ्या मित्राच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रोत्साहनामुळे राजेश्वर पुस्तकांच्या बाहेर पडून प्रत्यक्ष युद्धभूमींपर्यंत पोहोचले. 'या युद्धभूमीएवढी वर्षं माझ्या आजूबाजूलाच होत्या. पण मला त्यांच्याविषयी काहीच माहीत नव्हतं,' राजेश्वर यांना त्यांचं आश्चर्य वाटतं.

आपल्या या कामाविषयी ते सांगतात, 'हळूहळू अनेक मित्र माझ्याशी जोडले गेले. आमचे सुट्टीचे दिवस इतिहासात कधी बुडून गेले ते आम्हालाही कळलं नाही. कुदळ-फावडं हाती घेऊन आम्ही एकामागून एक युद्धभूमी पालथ्या घालू लागलो. एवढा काळ लोटल्यानंतरही तिथे युद्धाच्या खाणाखुणा आढळत होत्या. हेल्मेट्स, शार्पनेल्स, काडतुसं, बकल्स, कंगवे अगदी शहीद जवानांची हाडंसुद्धा आढळत.'

एका विस्मृतीत गेलेल्या युद्धाचे अवशेष शोधण्याच्या या त्यांच्या सुट्टीतल्या उद्योगाला एक औपचारिक स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी राजेश्वर

यांचा मित्र अरम्बम बॉबी सिंग याने २०१३ मध्ये 'सेकंड वर्ल्ड वॉर इम्फाल कॅम्पेन फाउंडेशन'ची स्थापना केली. २०१७ पासून 'जपान असोसिएशन फॉर रिकव्हरी अँड रिपॅट्रिएशन ऑफ वॉर कॅज्युअल्टीज'ने त्यांच्याशी करार केला आहे. त्या युद्धात शहीद झालेल्या आपल्या जवानांचे आणि त्यांच्या चीजवस्तूंचे अवशेष मिळवण्यासाठी त्यांनी या फाउंडेशनचं साहाय्य घेतलं आहे. पण त्याविषयी बोलण्याची आपल्याला परवानगी नसल्याचं राजेश्वर सांगतात.

ज्या शहिदांच्या वंशजांकडून वैयक्तिक विनंती केली जाते, त्यांच्याविषयीची माहिती मात्र ते देतात. आपल्या जिवलगांच्या अखेरच्या दिवसांविषयी जाणून घेऊ इच्छिणारे अनेक शहिदांचे वंशज जॉन्सनच्या माध्यमातून राजेश्वरशी संपर्क साधतात. एका व्यक्तीने इम्फाळच्या दफनभूमीत आपल्या आजोबांना पुष्पचक्र वाहण्याची विनंती केली आणि तेव्हापासून राजेश्वर अशा व्यक्तींच्या संपर्कात आले. पुढे अधिक तपशीलवार विनंत्या केल्या जाऊ लागल्या. त्याविषयी राजेश्वर सांगतात, 'आमच्या आजोबांच्या रणगाड्याचा स्फोट नेमका कुठे झाला हे शोधून तिथे पुष्पचक्र ठेवू शकाल का, अशी विचारणा ब्रिटनमधल्या एका व्यक्तीने केली होती. मृत्युशय्येवर असलेल्या एका ७८ वर्षांच्या व्यक्तीची शेवटची इच्छा होती की त्यांच्या वडिलांचे इम्फाळमध्ये असलेले अवशेष शोधले जावेत. मी ते सगळं काही केलं. डोंगर चढून गेलो. त्या ठिकाणी एक क्रॉस लावला. पुष्पचक्र ठेवलं.' या साऱ्या कामासाठी कोणत्याही प्रकारचं शुल्क आकारलं जात नाही. मागच्या जूनमध्ये एडिनबर्गमधल्या ४० वर्षीय नर्सने राजेश्वर यांच्याशी संपर्क साधला. तिला तिच्या पणजोबांविषयी माहिती हवी होती आणि ती शोधण्यासाठी ती फक्त त्यांचं नाव आणि एक फिकट झालेलं कृष्णधवल छायाचित्र देऊ शकली होती. राजेश्वर तिला म्हणाले. 'काहीच हरकत नाही. तुमच्यासाठी ही खूप मोठी गोष्ट आहे पण आमच्यासाठी ते काही फार मोठं काम नाही. आम्ही करू. '

बोलता बोलता आम्ही डोंगरमाथ्यावर पोहोचलो. राजेश्वर आणि त्यांचा गट कामाला लागला. धातूशोधक आणि कुदळी बाहेर काढल्या गेल्या. तंबू ठोकले गेले. जेवण शिजवण्यासाठी लाकडं गोळा केली जाऊ लागली आणि तात्पुरत्या स्वरूपातलं प्रसाधनगृहही उभारलं गेलं. निघालो तेव्हा डोंगराच्या पायथ्याशी लख्ख ऊन होतं. असं प्रसन्न वातावरण सोडून आपण डोंगरावर पावसात कडाक्याच्या थंडीत येऊन काम करतोय, याची कोणतीही खंत त्यांच्या चेहऱ्यावर नव्हती. ब्रिटश लोक या डोंगराला 'पिंपल' म्हणत, कारण तो चेहऱ्यावरच्या मुरुमाप्रमाणेच दिसतो. त्यामुळे राजेश्वर आणि त्यांचे मित्रही त्याला त्याच नावाने संबोधत होते.

या भूभागाचा त्यांनी कित्येक वर्षं अभ्यास केला आहे. सुरुवातीला ब्रिटिश लायब्ररीत उपलब्ध असलेली पुस्तकं वाचून. नंतर ड्रोनद्वारे आणि त्यानंतर इथे प्रत्यक्ष भेटी देऊन. त्याविषयी ते सांगतात, 'आम्ही ब्रिटिशांच्या युद्ध दैनंदिनीत सांगितलेल्या मार्गाचा तंतोतंत मागोवा घेतला. मित्रराष्ट्रांचे १६ जवान या पिंपलवर धारातीर्थी पडल्याचं त्यात नमूद आहे. त्या वेळी शिष्टाचाराप्रमाणे त्यांना दफन करण्यात आलं होतं आणि त्या ठिकाणी क्रॉस लावण्यात आले होते. त्यांचे अवशेष गोळा करण्यासाठी दोन वर्षांनंतर इम्पेरियल वॉर ग्रेव्ह्ज कमिशन भारतात आलं. पण तोपर्यंत तिथे घनदाट जंगल माजलं होतं. तिथल्या ओळखीच्या खुणा नाहीशा झाल्या होत्या. त्यामुळे १६ पैकी केवळ १२ मृतदेहांचेच अवशेष हाती लागले आणि उर्वरित चार जवानांचे अवशेष मात्र मागेच सोडून जावं लागलं.'

टॉड गिब्सनचे पणजोबा त्या मागे राहिलेल्या चार जवानांपैकीच एक होते. 'हे युद्ध ब्रह्मदेश मोहिमेअंतर्गत असल्यामुळे त्यांच्या नातेवाईकांना वाटलं की ते ब्रह्मदेशातल्या जंगलांत बेपत्ता झाले असावेत. पण या युद्धभूमी ब्रह्मदेशाच्या सीमेवरच्या होत्या हे त्यांच्या नंतर लक्षात आलं,' असं इम्फाळमधल्या माहिती आणि जनसंपर्क संचालनालयाचे कर्मचारी असलेले आणि राजेश्वरबरोबर काम करणारे जोसेफ लाँगजाम सांगतात.

'आमचे पणजोबा एखाद्या डोंगरावर शहीद झाले असतील, असं आम्हाला वाटलंच नव्हतं. आम्ही ब्रह्मदेशातलं जंगल गृहीत धरून चाललो होतो,' असं गिब्सन यांनी राजेश्वर यांना पाठवलेल्या ई-मेलमध्ये म्हटलं आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार गेल्या वर्षी तिच्या स्वप्नात तिचे पणजोबा आले आणि त्यांनी तिला 'ब्रह्मदेशातल्या जंगलात शोधा,' असं सांगितलं. त्यानंतर तिने युद्धातल्या शहिदांचे नातेवाईक, इतिहासकार, अभ्यासक आणि संशोधक यांचा एक फेसबुक ग्रुप जॉइन केला. पण त्यांच्या माध्यमातून ती ब्रह्मदेशाऐवजी इम्फाळमधल्या व्यक्तीपर्यंत पोहोचली. राजेश्वर यांनी त्या महिन्यात युद्धाच्या दैनंदिनी पालथ्या घातल्या, ब्रिटनमधल्या संशोधकांशी संपर्क साधला आणि टॉड कोणत्या रेजिमेंटमध्ये होते, हे शोधून काढलं. सातत्यपूर्ण प्रयत्न करून आणि गूगल अर्थच्या मदतीने त्यांनी

साधारण २५ यार्डांचा परिसर संभाव्य म्हणून निश्चित केला आणि नोव्हेंबर २०१९मध्ये ते पहिल्यांदा या डोंगरावर आले.

'आम्ही उत्खनन सुरू केलं आणि अचानक एका खड्ड्यात आम्हाला शहिदांच्या वस्तूंचे अवशेष सापडले. तो आमच्यासाठी अतिशय आनंदाचा क्षण होता. त्या चार शहिदांचे अवशेष त्याच परिसरात कुठेतरी असल्याचं ते चिन्ह होतं. टॉड ज्या ठिकाणी धारातीर्थी पडले असावेत, असा अंदाज होता तिथे गिब्सनच्या विनंतीनुसार त्यांची स्मृतिशिला स्थापन केली. क्रॉस लावला आणि हा संपूर्ण प्रसंग लाइव्हस्ट्रीम केला,' असं राजेश्वर सांगतात. 'तो प्रसंग एवढा भावपूर्ण होता की एखादा क्षण निसटेल या भीतीने पापणी लवण्याचीही मला भीती वाटत होती. राजेश्वर यांनी इतिहासावर साचलेली काळाची धूळ झटकली आणि इतिहास फारसा ज्ञात नसलेला भाग जगासमोर आणला. जगाच्या एका कोपऱ्यात राहणाऱ्या माझ्यासारख्या अनोळखी व्यक्तीसाठी त्यांनी जे काही केलं ते आश्चर्यकारक आहे,' अशा शब्दांत गिब्सन भावना व्यक्त करतात.

या कार्यासाठी राजेश्वर पहिल्यांदा डोंगर चढले तेव्हाही ते एका मुद्द्यावर ठाम होते, हे काम पैशांसाठी नाही. या उत्खननासाठी त्यांना अनेक डोंगर चढावे लागतात. (पिंपल हा तुलनेने सोपा डोंगर आहे.) संपूर्ण गटासाठी जेवणाची, राहण्याची आणि उत्खननासाठी आवश्यक अवजारांची सोय करावी लागते. पण हा सगळा खर्च गटाचे सदस्यच करतात. रात्री छोटीशी शेकोटी पेटवण्यात आली. रमचे काही ग्लास रिते झाले आणि सर्वांनी पोर्क, भात आणि उकडलेल्या भाज्यांचा आस्वाद घेतला.

माहिती आणि जनसंपर्क संचालनालयाचे कर्मचारी असलेले लाँगजाम सांगतात, 'माझ्यासाठी इतिहासातल्या तारखा फारशा महत्त्वाच्या नाहीत. जे झालं ते झालं, पण आमच्या कामामुळे कोणी इम्फाळमध्ये येण्यासाठी उद्युक्त होत असेल, तर त्यासारखी उत्तम गोष्ट नाही.' गेल्या काही वर्षांत मणिपूरमध्ये युद्ध पर्यटन ही नवीच संकल्पना उदयाला आली आहे. या संदर्भात संशोधक आणि लेखक हेमंत कटोच सांगतात, युरोपात दुसऱ्या महायुद्धाच्या युद्धभूमींना फार महत्त्वाचं स्थान आहे. त्या तुलनेत भारतातील अशा युद्धभूमी दुर्लक्षित राहिल्या आहेत. २०१३पासून कटोच यांनी इम्फाळ युद्धासंदर्भातले टूर सुरू केले. त्यांच्या या टूरमध्ये अनेक परदेशी नागरिक, विशेषतः शहिदांचे वंशज सहभागी झाले. त्यांच्यासाठी तो त्यांच्या कुटुंबाच्या इतिहासाशी जोडलं जाण्याचा भाग असतो. आपल्या आजोबा, पणजोबांप्रमाणेच काही जण आपल्या वडिलांचा मागोवा घेत उतारवयातही इथे येतात.

जॉन्सन हे कित्येक वर्षं त्यांच्या वडिलांच्या– जॉर्ज जॉन्सन यांच्या महायुद्धातल्या कार्याचा शोध घेत होते. त्यांच्या वडिलांबरोबर इम्फाळमध्ये ज्यांनी काम केलं होतं, अशा व्यक्तींच्या कुटुंबीयांचाही त्यांनी शोध घेतला. कालांतराने जॉन्सन यांना कळलं, की त्यांच्या आजोबांना त्यांच्या एका जखमी नोकराला – हार्वर्ड यांना नाइलाजाने ठार करावं लागलं होतं. तो इच्छामरणाचा प्रकार होता. 'आजोबांनी याविषयी कधीच कोणाला सांगितलं नाही, ते ओझं घेऊनच ते कायम जगले,' असं जॉन्सन सांगतात. जॉन्सन यांनी हार्वर्ड यांच्या कुटुंबीयांचा शोध घेतला. त्यानंतर इम्फाळ युद्धाच्या ७५व्या स्मृतिदिनी हार्वर्ड यांची वंशज असलेली एली इम्फाळमध्ये आली आणि तिने आपल्या पणजोबांचे प्रतीकात्मक अंत्यसंस्कारही केले.

सकाळ झाली तेव्हा मेटल डिटेक्टरची बिप बिप सुरू झाली होती. राजेश्वर सांगतात, हे काम म्हणजे गवताच्या ढिगाऱ्यात हरवलेली सुई शोधण्यासारखं आहे. आजवर त्यांनी त्यांच्या कामाचं डॉक्युमेंटेशन केलेलं नाही. पण आता या कामाविषयीचा एक व्हिडीओ तयार करून तो यूट्यूबवर अपलोड करण्याचा विचार असल्याचं राजेश्वर सांगतात. उत्खननाच्या अखेरीस त्यांच्या हाती लागली होती काही बकल्स, कंगवे आणि बंदुकीच्या गोळ्यांचे तुकडे. पण मानवी शरीराचे अवशेष काही आढळले नाहीत. दुपारी पिंपलवरून उतरताना कोणालाही कल्पना नव्हती, की करोनाचं एवढं गंभीर संकट भविष्यात वाढून ठेवलं आहे आणि त्यामुळे त्यांची पुढची उत्खनन मोहीम लांबणीवर पडणार आहे. राजेश्वर यांनी गिब्सनशी संपर्क साधला आणि उत्खनन अयशस्वी ठरल्याचं कळवलं. ती म्हणाली, 'काही हरकत नाही. किमान आता एवढं तरी माहीत आहे की पणजोबा कुठे आहेत. ते हरवलेले नाहीत!'

**(इंडियन एक्सप्रेसमधून साभार)**

**(शब्दांकन : विजया जांगळे)**

response.lokprabha@expressindia.com

# दात्री दुहीता

सुमन

वैभव माल्डे

एक्स्प्रेस हायवेवरून जाताना अचानक रस्त्याच्या दुतर्फा आकाशातल्या तेजाची असंख्य केशरीपिवळी रूपं वाऱ्यावर डोलत होती. नव्या दिवसाचं स्वागत जणू करायला सज्ज होती ती फुलं नी फुलझाडं – कॉसमॉसची. आजीकडे नागपूरला सर्वात आधी या फुलाशी ओळख झाली होती. हौसेने वाफे करून घेतले होते व विविध फुलझाडं हळूहळू हजेरी लावत होती तिथे. फाटकाच्या अगदी जवळ एक दिवस पिटुकलं रोप उगवलेलं दिसलं. आजीचं काहीना काही बिया टाकणं सुरू असायचं त्यामुळे आम्ही या रोपांना तिला विचारल्याशिवाय हात लावत नव्हतो. काही दिवसांत थोडी जास्त पानं फुटली त्याला, बारीक कातरलेली पण बोथट टोकाची. बरीचशी झेंडूसारखीचं. झेंडू तर अनेक होते म्हटलं आणखीन कशाला पण आजीने सांगितले की हे वेगळं झाड आहे, कॉसमॉसचं. छान फुलणारं. पाहाता पाहाता रोपटं मोठं होऊ लागलं. पानांच्या जोडीला फांद्याही फुटल्या. ठळक हिरव्या व तुकतुकीत पानांकडे आपोआप लक्ष जाऊ लागलं सर्वांच. दोन फुटांपर्यंत उंची सरळ वाढली असेल त्यानंतर फांद्या बहरू लागल्या. एक दिवस नीट पाहिल्यावर दिसले की, फांदीच्या प्रत्येक टोकाला हिरव्यागार तंतूमध्ये आच्छादलेल्या कळ्या आल्यात. मग त्या कळ्यांची वाढ सुरू झाली, छोट्या गुंड्यांच्या आकाराच्या कळ्यांनी बाळसं धरलं नि रायआवळ्याचा आकार धारण केला. किंचित पिवळट छटा उमटवत. अखेरीस काही कळ्या उमलल्या. किती देखणं फूल ते. सात-आठ पाकळ्या एकेरी रांगेत दाटीवाटी न करता हळुवार बहरलेल्या. काहीसा पारदर्शक पोत असलेल्या व थोड्या अलवार रेघा असलेल्या, किंचित कातरल्यासारख्या कडा असलेल्या पिवळट केशरी पाकळ्या नेत्रसुखद होत्या. फुलं झाडावरच वाळू दिली की मोठ्या जिऱ्याच्या आकाराच्या बिया येतात. त्या वाळून काळपट झाल्या की वाऱ्यासोबत पसरतात व फुलाच्या जन्माचं सार्थक होतं.

या फुलाचं वैशिष्ट्य म्हणजे, स्त्रीकेसर पुंकेसरासहित मधुकोष पाकळ्यांच्या वर ठळकपणे वेगळा असतो. परागीभवनासाठी आलेल्या कीटकांना ही दात्री खुलं आमंत्रण देते. त्यांचं पोट तर मधाने भरतंच पण प्रत्येक फुलातून असंख्य बिया निर्माण होतात. दुसऱ्यांचा विचार करतानाच स्वतःचं हित साधते ही दुहीता. प्रत्येक फुलातच परागीभवन होत असतं पण या मुक्त मधुकोषामुळे कीटक सहज व जास्त प्रमाणात आकर्षित होतात. बागेत कॉसमॉसची झाड असली की उरलेल्या झाडांनाही या कीटकांचा नक्कीच फायदा होतो. माझ्या आयुष्याचं सार्थक तर होतंय पण इतरांनाही माझ्यामुळे काही फायदा होतोय ही भावनाच किती सुंदर आहे.

आत्मनो मोक्षार्थं जगद्हिताय च हीच शिकवण कृतीतून देते ही दात्री दुहीता. आपल्याकडे जे आहे त्याचं दान केलं तर ती गोष्ट कमी न होता फळफळते. ज्ञानदानासारखं ठरावीक दान तर मुक्तपणे करावीत. आपल्या अनुभवातून आलेले ज्ञान वाटले तर उद्धार दोहोंचा होतो हे नक्की. केवळ आत्मकेंद्रित राहून स्वहिताचा केलेला विचार व कृती कधीच आपल्या आध्यात्मिक प्रगतीला साहाय्यभूत ठरत नाही. स्वामी विवेकानंदांना जेव्हा आत्मज्ञान प्राप्त झालं तेव्हा तासन्तास ते त्या अलौकिक अनुभवात स्वतःला अडकवून ठेवू लागले मात्र ठाकुरांनी त्यांना इतरांचा विचार करायला व ते ज्ञान जमेल तसं वाटायला सांगितले. त्यातूनच साकारला आधुनिक वेदांत. हीच शिकवण सर्वच बाबतीत आचरली तर आपलाच फायदा होताना दिसतो. कोतेपणाने हातचं राखून न ठेवता, आपल्याकडे जे मुबलक असेल ते, शांती, संवेदना, प्रेम, ज्ञान, जेव्हा आपण देतो ते अनेकविध मार्गांनी वाढून पुन्हा आपल्याकडेच येतं. मनुष्यजन्माचं सार्थक करायला यापेक्षा सोपा व नेमका मार्ग तो कुठला हो असणार ?

आपापला खारीचा वाटा उचलून या दात्रीसारखंच आपणही दुहीत साधूयात.

response.lokprabha@expressindia.com

## दृष्टिकोनच देतो व्यक्तिमत्त्वाला आकार

माहितीच्या प्रदूषणातून ज्ञानाकडे जाण्याचा सोपा मार्ग – 'लोकसत्ता' संपादकीय पाने. ती वाचणे म्हणजे विविध तज्ज्ञ व अभ्यासक यांच्या लेखनातून स्वतःला मोठे करणे.

जाणत्या जनांसाठी

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# "संपादकीय पानांतील लेख देतात माझ्या विचारांना चालना!"

**- रोहित देव**
(सहा. प्राध्यापक, पुणेस्थित
अभियांत्रिकी महाविद्यालय)

## दृष्टिकोनच देतो व्यक्तिमत्त्वाला आकार

माहितीच्या प्रदूषणातून ज्ञानाकडे जाण्याचा सोपा मार्ग – 'लोकसत्ता' संपादकीय पाने. ती वाचणे म्हणजे विविध तज्ज्ञ व अभ्यासक यांच्या लेखनातून स्वतःला मोठे करणे.

जाणत्या जनांसाठी

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती